सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
लातूर | शनिवार, ३० मे २०२६ | वर्ष ४ थे अंक ८२ | पाने १२ | किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com









CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# गाझाचा ७० टक्के भूभाग इस्रायलच्या ताब्यात

**● लष्कराचे राहणार नियंत्रण ● विरोध केल्यास हकालपट्टी**



पंतप्रधान नेतान्याहू यांची माहिती



◆ **तेल अवीव, २९ मे**

गाझा पट्टीतून हमास नामशेष होत असून, इस्रायली लष्कराच्या ताब्यात ७० टक्के भूभाग आहे. संरक्षण विभागाला गाझातील ७० टक्के भूभाग ताब्यात घेण्याचे आदेश देण्यात आले आहे. या भागावर इस्रायली लष्कराचे नियंत्रण राहणार आहे आणि विरोध करणाऱ्यांची तेथून हकालपट्टी करण्यात येईल, अशी माहिती पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी वेस्ट बँक येथील पत्रपरिषदेत दिली.

आम्ही हमासवर सर्व बाजूंनी दबाव आणत आहोत आणि बाकी राहिलेल्या लोकांनाही आदेशाचे पालन करावे लागेल. गाझातील एकूण ७० टक्के भूभाग लवकरच इस्रायलच्या नियंत्रणात असेल आणि तसे आदेश लष्कराला दिले आहेत. सध्या ६० टक्के भूभाग इस्रायली लष्कराच्या नियंत्रणात असल्याचे नेतान्याहू म्हणाले. शस्त्रसंधीच्या पहिल्या टप्प्यात, इस्रायलमध्ये ओलीस ठेवलेल्या पॅलेस्टिनींच्या बदल्यात, हमासने पकडलेल्या शेवटच्या कैद्यांची सुटका करण्यात आली, ज्यामुळे गाझामधील संघर्ष संपुष्टात आला. दुसऱ्या टप्प्यात हमासचे निःशस्त्रीकरण आणि इस्रायली सैन्याची टप्प्याटप्प्याने माघार यांचा समावेश होता, परंतु ही प्रक्रिया गेल्या अनेक महिन्यांपासून पूर्णपणे थांबली आहे. हमासने संघर्षविरामाचे उल्लंघन केल्यामुळे आम्ही गाझावर लष्करी नियंत्रण ठेवण्याचा निर्णय घेतल्याचे ते म्हणाले. दरम्यान गाझामध्ये दररोज हिंसाचार सुरू असून, दोन्ही बाजू १० ऑक्टोबर रोजी लागू झालेल्या शस्त्रसंधीचे उल्लंघन केल्याचा एकमेकांवर आरोप करत आहेत. ◂(वृत्तसंस्था)

### इस्रायली हवाई हल्ल्यात १० ठार

**गाझामध्ये गुरुवारी रात्री झालेल्या इस्रायली हवाई हल्ल्यात पाच मुले आणि एका हमास कमांडरसह १० जण ठार झाले आणि २० हून अधिक जण जखमी झाले. शिफा रुग्णालयाच्या प्रवक्त्याने सांगितले की, या हल्ल्यात २० हून अधिक लोक जखमी झाले, तर १० नागरिकांना मृत घोषित करण्यात आले. या हल्ल्यात हमास कमांडर इमाद इस्लाम ठार झाला.**

### ४८ तासांत प्रचंड विध्वंस

**गाझा आरोग्य मंत्रालयाच्या माहितीनुसार, गेल्या ४८ तासांत गाझा पट्टीत १६ जण ठार आणि ३९ जण जखमी झाले आहेत. मंत्रालयाच्या मते, गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये झालेल्या शस्त्रसंधीपासून गाझामध्ये ९२२ जण ठार आणि २,७८६ जण जखमी झाले आहेत.**

## जोधपूर मध्यवर्ती कारागृहात आसारामचे आत्मसमर्पण

◆ **जोधपूर, २९ मे**

आसारामने जोधपूर मध्यवर्ती कारागृहात आत्मसमर्पण केले. राजस्थान उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर तो गुरुवारी जोधपूरला पोहोचला. दुपारी २:५० वाजता आसारामच्या आगमनाची बातमी मिळताच, जोधपूर विमानतळावर त्याच्या समर्थकांची गर्दी जमली.



आसारामने आपल्या गाडीतूनच समर्थकांना आशीर्वादही दिला. आसाराम विमानतळावरून थेट पाल गावातील आपल्या आश्रमात गेला. तेथून तो एम्समध्ये गेला, तपासणी करून घेतली आणि सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास मध्यवर्ती कारागृहात आत्मसमर्पण केले. बुधवारी जोधपूर उच्च न्यायालयाच्या मुख्य खंडपीठाने अल्पवयीन मुलीवरील बलात्कार प्रकरणात आसारामची जन्मठेपेची शिक्षा कायम ठेवत त्याचा अंतरिम जामीन रद्द केला होता. तात्काळ अटक वॉरंट जारी करण्याच्या न्यायालयाच्या आदेशानंतर, आसाराम बुधवारी रात्री उशिरा हरिद्वारहून दिल्लीसाठी रवाना झाला. उच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात या प्रकरणातील इतर दोन सह-आरोपी, वसतिगृह वॉर्डन शिल्पी आणि गुरुकुलचे संचालक शरत चंद्र यांना आरोपांतून निर्दोष मुक्त केले. या दोन्ही सह-आरोपींविरुद्ध गुन्हेगारी कटात सामील झाल्याचा कोणताही ठोस पुरावा नसल्याचे न्यायालयाने मानले होते. ◂(वृत्तसंस्था)

# बंगालमध्ये ३३५ घुसखोर ताब्यात

**डिटेक्ट-डिलीट-डिपोर्ट' धोरणांतर्गत कारवाई, प्रशासन सतर्क**



◆ **कोलकाता, २९ मे**

पश्चिम बंगाल सरकारने अवैध घुसखोरांची ओळख पटविण्यासाठी आणि त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी राज्यभरात ११ कोठडी केंद्रे स्थापन केली आहेत. सध्या या केंद्रांमध्ये ३३५ संशयितांना ताब्यात ठेवण्यात आले आहे. ही कारवाई 'डिटेक्ट-डिलीट-डिपोर्ट' धोरणांतर्गत कारवाई केली जात आहे.

बांग्लादेशच्या सीमेला लागून असलेल्या उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील बसीरहाट परिसरात सर्वाधिक संशयित ओळखले गेले आहेत. येथे बांगलादेशी नागरिक आणि रोहिंग्या असण्याची शक्यता आहे. ही कोठडी केंद्रे विविध पोलिस जिल्हे आणि प्रशासकीय जिल्ह्यांमध्ये चालवली जात आहेत. यामध्ये बरुईपूर, सुंदरबन, बसीरहाट, बोंगाव, बारासात, मुर्शिदाबाद, जांगीपूर आणि कृष्णनगर यांचा समावेश आहे. मालदा, कूचबिहार आणि दक्षिण दिनाजपूर जिल्ह्यांमध्येही अशीच केंद्रे उभारण्यात आली आहेत.

सरकारी आकडेवारीनुसार, या केंद्रांमध्ये एकूण ३३५ जणांना ठेवण्यात आले आहे. यात १४८ पुरुष, ९९ महिला आणि ८८ मुलांचा समावेश आहे. त्यांची ओळख आणि कागदपत्रांची पडताळणी करण्याची प्रक्रिया सुरू आहे. राज्य गृह विभागाने जारी केलेल्या आदेशात जिल्हा प्रशासनाला परदेशी नागरिकांच्या प्रत्यार्पणाची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत त्यांना ठेवण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. ◂(वृत्तसंस्था)

### तात्पुरत्या निवाऱ्यात काय चालले आहे?

**या कारवाईसाठी मालदा जिल्हा एक प्रमुख केंद्र म्हणून उदयास आला आहे. इंग्लिश बाजार परिसरातील चंदन पार्कमध्ये पहिले तात्पुरते निवाऱ्याचे केंद्र उघडण्यात आले आहे. सध्या तेथे तीन महिला आणि सहा अल्पवयीन मुलांसह नऊ संशयित बांगलादेशी नागरिकांना ठेवण्यात आले आहे. केंद्रात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले असून, पोलिस, नागरी संरक्षण दल आणि इतर कर्मचारी २४ तास त्यावर लक्ष ठेवून आहेत. सध्या या लोकांच्या कागदपत्रांची आणि ओळखीची तपासणी केली जात आहे. तपास पूर्ण झाल्यावर पुढील कायदेशीर कारवाई केली जाईल.**

### सीमेवर बांगलादेशी नागरिकांची गर्दी वाढली

**पश्चिम बंगाल सरकार आणि प्रशासनाने कथित बेकायदेशीर स्थलांतरितांना ओळखण्याची मोहीम तीव्र केली आहे. मंगळवारी सकाळी उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील बसीरहाट भागातील हकीमपूर तपासणी नाक्यावर मोठ्या संख्येने बांगलादेशी पुरुष आणि महिला दाखल झाले. यापैकी बरेच लोक बऱ्याच काळापासून बंगालच्या विविध भागांमध्ये राहत असल्याचे सांगितले जाते. घुसखोरांना पकडणे, त्यांची ओळख पटवणे आणि त्यांना हद्दपार करण्याच्या अलीकडील वृत्तांमुळे सीमेवर गर्दी वाढली आहे.**

## रेल्वे स्थानकावरील शेड कोसळून तीन जखमी

◆ **लखनौ, २९ मे**

लखनऊमधील चारबाग रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक-५ वरील टीन शेड कोसळले. यात एक टीटीई आणि दोन प्रवासी गंभीर जखमी झाले. आरपीएफने बचावकार्य केले. तिन्ही जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

याच प्लॅटफॉर्मवर हावडा-डेहराडून एक्सप्रेस प्लॅटफॉर्मवर पोहोचली होती. तिला नंतर थांबवण्यात आले. अधिकाऱ्यांनी घटनास्थळी क्रेन मागवली. यामुळे टीन शेडचा खाली पडलेला भाग बाहेर काढला. प्लॅटफॉर्म रिकामा करण्यात आला. मशीन मागवून टीन शेड उचलले. प्लॅटफॉर्म क्रमांक-५ वर हावडा-देहरादून एक्सप्रेस पोहोचली होती. शेड कोसळण्याच्या जागेपासून काही अंतरावरच तिला थांबवण्यात आले. शेड कोसळल्याने टीटीई भूपेंद्रचे पाय अडकले. पोलिसांनी शेड उचलले, यानंतर टीटीईला बाहेर काढता आले. या घटनेत टीटीई भूपेंद्र यांचा पाय गंभीरपणे फ्रॅक्चर झाला. प्रवासी साहिलचा पायही शेडमध्ये दबला. सध्या सर्वांवर आलमबाग येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ◂(वृत्तसंस्था)

# भारताचा नेपाळला मदतीचा हात

**भूकंपग्रस्त जिल्ह्यांमध्ये बांधणार १४ शाळा**



◆ **काठमांडू, २९ मे**

नेपाळमधील भूकंपग्रस्त आठ जिल्ह्यांमध्ये १४ शाळांच्या पुनर्बांधणीसाठी भारताने ५६ कोटी २ लाख नेपाळी रुपयांची (अंदाजे ३५ कोटी भारतीय रुपये) आर्थिक मदत जाहीर केली आहे.

हिमालयाच्या कुशीत वसलेल्या शेजारी राष्ट्राच्या आपत्तीनंतरच्या पुनर्वसनासाठी आणि सामाजिक-आर्थिक विकासासाठी भारताने पुन्हा एकदा आपले कटिबद्धतेचे नाते अधोरेखित केले आहे. नेपाळच्या शिक्षण आणि क्रीडा मंत्रालयांतर्गत असलेल्या सेंट्रल लेव्हल प्रोजेक्ट इम्प्लिमेंटेशन युनिट-एज्युकेशनने या शाळांच्या बांधकामासाठी करारांवर स्वाक्षऱ्या केल्या आहेत. ही मोहीम भारत सरकारच्या ५६ कोटी २ लाख नेपाळी रुपयांच्या अनुदानांतर्गत राबवली जात असल्याची माहिती काठमांडूतील भारतीय दूतावासाने एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली. भारताच्या या पुढाकारामुळे भूकंपग्रस्त भागातील हजारो नेपाळी विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि आधुनिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध होणार असून, दोन्ही देशांमधील मैत्रीचे संबंध अधिक दृढ होण्यास मदत होणार आहे. ◂(वृत्तसंस्था)

## दुहेरी पासपोर्ट प्रकरणात अब्दुल्लाला दिलासा

◆ **रामपूर, २९ मे**

समाजवादी पक्षाचे नेते आणि माजी आमदार आझम खान यांचे पुत्र अब्दुल्ला आझम खान यांना दुहेरी पासपोर्ट प्रकरणात मोठा कायदेशीर दिलासा मिळाला आहे. खासदार-आमदार सत्र न्यायालयाने त्यांचे अपील स्वीकारून मॅजिस्ट्रेट न्यायालयाने सुनावलेली ७ वर्षांची शिक्षा रद्द करत या प्रकरणात त्यांची निर्दोष मुक्तता केली. या निर्णयानंतर, राजकीय वर्तुळात या प्रकरणाची पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. अब्दुल्ला आझम खान यांना नुकतेच मॅजिस्ट्रेट न्यायालयाने दुहेरी पासपोर्ट प्रकरणात दोषी ठरवून ७ वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली होती. ◂(वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### करण जोहरने केले कलाकारांना अनफॉलो



**मुंबई** : चित्रपट निर्माता करण जोहरने इंस्टाग्राम अकाउंटवरून शाहरुख खान, आलिया भट्ट आणि करीना कपूर यांच्यासह अनेक जवळच्या मित्रांना अनफॉलो केले. या बदलानंतर त्यांच्या फॉलोअर्सची संख्या १.८ कोटींवरून १.७५ कोटींवर आली आहे. त्यांनी याला डिजिटल डिटॉक्स असे म्हटले आहे. समाज माध्यमावर आपला वेळ आणि ऊर्जा कमी करण्यासाठी असे करत असल्याचे करणने लिहिले. करण जोहरने ज्यांना स्वतः चित्रपटसृष्टीत आणले, त्या कलाकारांनाही अनफॉलो केले. यात वरुण धवन आणि सिद्धार्थ मल्होत्रा यांचा समावेश आहे. याशिवाय जान्हवी कपूर, मलायका अरोरा आणि मनीष मल्होत्रा देखील त्याच्या फॉलो लिस्टमधून गायब

### श्रद्धाने केले मायकलच्या गाण्यावर नृत्य



**मुंबई** : बॉलिवूड अभिनेत्री श्रद्धा कपूरने नुकताच इंस्टाग्रामवर तिचा एक नृत्याचा व्हिडीओ शेअर केला. यामध्ये ती पायजामा घालून नृत्य करताना दिसते आहे. श्रद्धाने मायकल जॅक्सनच्या 'बॅड' गाण्यावर नृत्य केले. यात तिचे मजेदार आणि उत्साही डान्स मूव्हस दिसत आहेत. व्हिडीओसोबतच तिच्या कॅप्शननेही लोकांचे लक्ष वेधून घेतले. तिचा कथित बॉयफ्रेंड राहुल मोदीला टॅग करत, असा कोणीतरी शोधा, जो तुमच असे नृत्य बाहेर काढू शकेल, असे तिने लिहिले आहे. हा व्हिडीओ राहुल मोदीने रेकॉर्ड केला असल्याचा अंदाज यावरून लावला जात आहे.

### 'डॉन ३'च्या वादात सलमान करणार मध्यस्थी



**मुंबई** : सलमान खानचे रणवीर सिंग आणि फरहान अख्तर दोघांशीही चांगले संबंध आहेत. याच कारणामुळे त्याने या गंभीर होत असलेल्या वादामध्ये मध्यस्थी करण्याचा निर्णय घेतला. सलमानने दोघांशी फोनवर बोलणे केले आणि दोघांचीही बाजू ऐकून घेतली. अशा मोठ्या प्रोजेक्ट्समध्ये आपापसात मतभेद असणे ही काही नवीन गोष्ट नाही, असे त्यांनी दोघांनाही समजावले. चित्रपटसृष्टीत रचनात्मक मतभेद असणे ही खूप सामान्य गोष्ट आहे. यावरून वाद आणखी वाढवणे योग्य नाही, असे सलमान खानने फरहान अख्तरला सांगितले. हा वाद इथेच संपवावा आणि दोन्ही पक्षांनी आपले व्यावसायिक संबंध खराब करू नयेत, असे सांगितले.

# आता 'तारीख पे तारीख' चालणार नाही

**सर्वोच्च न्यायालयाचा देशभरातील उच्च न्यायालयांना निर्देश**

### तीन महिन्यांत निकाल देणे बंधनकारक

◆ **नवी दिल्ली, २९ मे**

सर्वोच्च न्यायालयाने राखून ठेवलेल्या प्रकरणांमध्ये निकाल देण्यास होणाऱ्या विलंबावर कठोर भूमिका घेत देशभरातील सर्व उच्च न्यायालयांसाठी सविस्तर आणि बंधनकारक मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. ज्या प्रकरणांमध्ये निकाल राखून ठेवला आहे, त्या प्रकरणांमधील निर्णय शक्यतो तीन महिन्यांच्या आत दिला गेला पाहिजे, असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

जामिनाच्या प्रकरणांवर आदेश त्याच दिवशी सुनावले जावेत. जर निकाल राखून ठेवला गेला, तर तो पुढच्या दिवशी नक्कीच सुनावला जावा, असे सरन्यायाधीश सूर्य कांत, न्यायमूर्ती विपुल एम पंचोली आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या न्यायासनाने सांगितले. प्रकरणांवरील वादविवाद आणि युक्तिवाद संपल्यानंतर निकाल राखून ठेवण्याची तारीख सर्व उच्च न्यायालये त्यांच्या वेबसाइटवर देखील प्रदर्शित करतील. शुक्रवारी पिला पहन आणि झारखंड सरकारशी संबंधित एक प्रकरण सरन्यायाधिशाच्या खंडपीठासमोर सुनावणीसाठी आले होते. उच्च न्यायालयाने निकाल अपलोड केला नव्हता, असे यात म्हटले होते. न्यायालयाने ज्या कच्च्या कैद्यांना जामीन मिळाला आहे त्यांची तुरूंगातून सुटका त्याच दिवशी जास्तीजास्त दुसऱ्या दिवशी झाली पाहिजे, असे देखील निर्देश दिले आहेत. तसेच वैयक्तिक स्वातंत्र्याशी संबंधित प्रकरणांमध्ये, जसे की नियमित जामीन, अटकपूर्व जामीन इत्यादी प्रकरणांमध्ये उच्च न्यायालयाने तत्परता दाखवावी, असे न्यायालयाने म्हटले आहे. खुल्या न्यायालयात सुनावलेला निकाल २४ तासांच्या आत उच्च न्यायालयाच्या वेबसाइटवर अपलोड केला पाहिजे. निकाल राखून ठेवल्यानंतर ३ महिन्यांनीही निकाल दिला जात नसेल, तर कोणताही पक्षकार निकाल जारी करण्यासाठी अर्ज करू शकतो. ◂(वृत्तसंस्था)

### सर्वोच्च न्यायालयाला विशेष अधिकार



**भारताच्या संविधानाने कलम १४२ अंतर्गत सर्वोच्च न्यायालयाला विशेष अधिकार दिले आहेत. याचा अर्थ या अंतर्गत सर्वोच्च न्यायालय संपूर्ण न्यायासाठी विशेष आदेश जारी करू शकते. म्हणजेच, एखाद्या प्रकरणात सामान्य कायदा त्वरित किंवा पूर्ण न्याय देऊ शकत नसेल, तर सर्वोच्च न्यायालय आपल्या विशेष अधिकाराचा वापर करू शकते.**

## गिरीबालासह समर्थला सीबीआय कोठडी

◆ **भोपाळ, २९ मे**

भोपाळ येथील त्विशा शर्मा मृत्यू प्रकरणाचा तपास गुरुवारी माजी न्यायाधीश गिरीबाला सिंह यांच्या अटकेनंतर अधिक तीव्र झाला. सीबीआयने गिरीबाला यांना अटक केल्यानंतर, शुक्रवारी गिरीबाला सिंह आणि त्विशाचे पती समर्थ यांना न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने सीबीआयला चौकशीसाठी पाच दिवसांची पोलीस कोठडी मंजूर केली. दोघेही आता २ जूनपर्यंत सीबीआयच्या कोठडीत राहतील. १२ मेच्या रात्री त्विशा शर्माच्या मृत्यूपूर्वी काय घडले हे जाणून घेण्यासाठी सीबीआयला आता गिरिबाला सिंग आणि समर्थ यांची समोरासमोर चौकशी करायची असल्याने, सीबीआय दोघांसाठी तीन ते सात दिवसांच्या कोठडीची मागणी करेल असे आधीच मानले जात होते. ◂(वृत्तसंस्था)

**राजश्री लॉटरीत मुंबई-नागपूर मध्ये 2 मोठ्या बक्षीसांचा धमाका दोन भाग्यवानांनी जिंकली लॉटरी!**

"लोक म्हणतात ना -'लॉटरी ने खरंच कुणाचं नशीब बदलतं का?' आज पुन्हा त्याचं उत्तर मिळालं...". मे 2026 हा महिना राजश्री लॉटरी प्रेमींसाठी भाग्यशाली ठरला आहे. गोवा राज्य सरकारची 'राजश्री लॉटरी' ने पुन्हा एकदा सिद्ध केले कि राजश्री लॉटरी चे तिकीट घेतले कि नशिबाची साथ मिळतेच.

पहिला भाग्यवान विजेता – मुलुंड, मुंबई येथून, 7 मे 2026 रोजी झालेल्या 'राजश्री 100 मंथली लॉटरी'च्या सोडतीमध्ये A-27978 या तिकीट क्रमांकाने ₹50 लाखांचे प्रथम बक्षीस जिंकले. हे भाग्यवान तिकीट मुंबईतील मुलुंड येथील मोहनलाल प्यारेलाल जयस्वाल या अधिकृत विक्रेत्याकडून विकले गेले होते.

दुसरा भाग्यवान विजेता – 23 मे 2026 रोजी जाहीर झालेल्या 'राजश्री 50 विकली लॉटरी'च्या सोडतीमध्ये 95/3628 या तिकीट क्रमांकाने ₹21 लाखांचे बक्षीस जिंकले. हे भाग्यवान तिकीट विक्रेता – नारायण लॉटरी सेंटर- इतवारी, नागपूर तसेच स्टॉकिस्ट – सिराज एन्टरप्रायझेस, नागपूर येथून विकले गेले होते.

"कधी कधी नशीब अशी दारं उघडतं...ज्याची कुणी कल्पनाही केलेली नसते. फक्त एका जिंकण्याने सगळंच बदलून जातं आणि एक साधा दिवस बनतो आयुष्यातला सर्वात सुंदर क्षण ! ज्याची कधी अपेक्षाही नव्हती..."

"आता प्रत्येकजण इथे आपलं नशीब आजमावण्यासाठी येत आहे...कारण राजश्री लॉटरीवरील विश्वास आणखी वाढला आहे! इथल्या ग्राहकांची गर्दीही दिवसेंदिवस वाढतच चालली आहे..."

"गव्हर्नमेंट लॉटरीचा विश्वास... पारदर्शकता, सरकारी नियमांनुसार सोडती आणि ग्राहकांचा भरोसा, हीच राजश्री लॉटरीची खरी ओळख आहे."

याच विश्वासामुळे राजश्री लॉटरी आज लाखो ग्राहकांची पहिली पसंती ठरत आहे. लाखो रुपयांची बक्षीसे जिंकणारे विजेते ही या विश्वासार्हतेची साक्ष देत आहेत. स्वप्नांना नवी दिशा देणारे यश ₹50 लाख आणि ₹21 लाख ही बक्षीसे विजेत्यांच्या आयुष्यात नवी आशा, नवी स्वप्ने आणि उज्वल भविष्य निर्माण करणारी आहेत. या विजयामुळे संबंधित कुटुंबांना आर्थिक स्थैर्य मिळणार असून त्यांच्या आयुष्याला नवी दिशा मिळणार आहे.

"मे २०२६चा हा दुहेरी विजय लॉटरी इतिहासात सुवर्णक्षण ठरला.'राजश्री लॉटरी'ने पुन्हा एकदा दाखवून दिलं — इथे नशीब बदलायला फक्त एका तिकिटाची गरज असते"

# भारतात लवकरच येणार 'प्लास्टिक'च्या नोटा?

◆ **मुंबई, २९ मे**

भारतातील सर्वसामान्य नागरिकांचा 'काका, ही नोट फाटलेली आहे, दुसरी द्या!' हा नेहमीचा संवाद आता लवकरच इतिहासजमा होण्याची शक्यता आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय) देशात कागदी नोटांऐवजी प्लास्टिक म्हणजेच 'पॉलिमर' चलनी नोटा आणण्याच्या तयारीत आहे. वाढत्या डिजिटल व्यवहारांनंतरही बाजारातील रोकड मागणी (कॅश डिमांड), कागदी नोटा छापण्याचा प्रचंड खर्च आणि जुन्या नोटा खराब होण्याचे मोठे प्रमाण यांमुळे आरबीआयने आपला दशकभरापूर्वीचा जुना प्रस्ताव पुन्हा एकदा पटलावर आणला असून, लवकरच यासाठी एक पायलट प्रोजेक्ट (प्रायोगिक प्रकल्प) जाहीर केला जाऊ शकतो.

पॉलिमर नोटा चलनात आणण्याबाबत आरबीआयच्या पाटणा आणि मुंबई येथे पार पडलेल्या मागील दोन संचालक मंडळाच्या बैठकांमध्ये सखोल चर्चा झाली आहे. सध्याच्या कागदी नोटांच्या तुलनेत या पॉलिमर नोटांचे आयुष्य तब्बल ३ ते ४ पटीने जास्त असते आणि त्यांची उत्पादन किंमतही दीर्घकाळासाठी फायदेशीर ठरते. आरबीआयशी संबंधित सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या नव्या प्लास्टिक नोटा वॉटरप्रूफ आणि टीअर-रेसिस्टंट (न फाटणाऱ्या) असतील. तसेच, देशातील एटीएम यंत्रणा या नोटा सहज ओळखू शकतील आणि वितरित करू शकतील, अशी अद्ययावत तांत्रिक पूर्वतयारी आता पूर्ण झाली आहे. ◂(वृत्तसंस्था)




### छपाईचा खर्च अवाढव्य

**आरबीआयच्या अधिकृत वार्षिक अहवालानुसार, आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये सुरक्षित कागदी नोटांच्या छपाईसाठी तब्बल ६,३७२.८ कोटी रुपयांचा अवाढव्य खर्च झाला आहे, जो मागील वर्षाच्या (५,१०१.४ कोटी रुपये) तुलनेत खूपच जास्त आहे. याच आर्थिक वर्षात जवळपास २३.८ अब्ज खराब आणि फाटलेल्या नोटा चलनातून बाद करण्यात आल्या. हे प्रमाण मागील वर्षापेक्षा १२.३ टक्क्यांनी अधिक असून, यात सर्वाधिक संख्या ५०० आणि १०० रुपयांच्या नोटांची होती. देशात डिजिटल व्यवहार वाढत असले तरी १५ मे पर्यंत देशातील एकूण चलनप्रवाह ४२.८६ ट्रिलियन रुपयांवर पोहोचला आहे, जो आतापर्यंतचा सर्वोच्च विक्रम आहे.**

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शनिवार, ३० मे २०२६
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प




समाज हेच आपले आराध्य दैवत आहे. आपली संस्था हे एक शरीर आहे, तर समाज तिचा आत्मा आहे. शरीर काम करीत असते शरीर-सुखासाठी. त्या नादात कित्येक वेळा आत्मसुखाची अवहेलना होत असते. आपल्याला संस्थेच्या माध्यमातून समाजाला सुखी, समृद्ध करायचे आहे.

**- स्व. लक्ष्मणराव भिडे**
रा. स्व. संघाच्या विश्व विभागाचे पूर्व संयोजक आणि दीनदयाल शोध संस्थानचे पूर्व अध्यक्ष

# मान्सूनचा प्रवास लांबला

**श्रीलंकेत अडथळा; अल निनोचा फटका बसणार | केरळमध्ये सात दिवसांनी पोहोचण्याची शक्यता | जून, जुलैतही बसतील उष्णतेच्या झळा**



**◆ नवी दिल्ली, २९ मे**
निसर्गातील असमतोलाचा मोठा फटका यावर्षी भारताला बसण्याची शक्यता आहे. गेल्या तीन वर्षातील सर्वाधिक कमी पाऊस यावर्षी होऊ शकतो. श्रीलंकेतील कमी दाबाच्या वादळी वाऱ्यांमुळे मान्सूनचा प्रवास लांबला आहे. मार्च महिन्यापासून सुरू असलेल्या उष्णतेच्या झळा जून,जुलैपर्यंत सहन कराव्या लागणार असून अल निनोच्या प्रभावामुळे मान्सून लांबला आहे. आता मान्सून सात दिवसांनंतरच केरळच्या किनारपट्टीवर पोहोचेल, अशी शक्यता हवामान विभागाने शुक्रवारी वर्तवली आहे.

हवामान विभागाने दिलेल्या ताज्या माहितीनुसार, यावेळी देशात सरासरी केवळ ७८ सेंटीमीटर पाऊस होऊ शकतो. १९७१-२०२० च्या आकडेवारीनुसार देशात सरासरी ८७ सेंटीमीटर पाऊस मानला जातो. यापूर्वी हवामान विभागाने १३ एप्रिलला यंदा ८० सेंटीमीटर पाऊस पडेल, असा अंदाज वर्तवला होता.

हवामान विभागानुसार, जूनमध्ये महाराष्ट्राच्या अनेक भागात सामान्यापेक्षा अधिक उष्णतेच्या लाटेची शक्यता आहे. यादरम्यान विदर्भ, मराठावाडासह अनेक भागात कमाल तापमान सामान्यापेक्षा अधिक राहील. तसेच जून-जुलैमध्ये उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब, बिहार, ओडिशा, छत्तीसगड, गुजरात आणि आंध्र प्रदेशमध्ये उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. सामान्यतः त्यावेळी तापमान ३०-३५ अंश सेल्सिअसपर्यंत असते. यावेळी तापमान ३ अंश सेल्सिअसने अधिक राहील, असा अंदाज आहे. ◂(वृत्तसंस्था)

### महाराष्ट्रात सरासरीपेक्षा कमी पाऊस

**» महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील बहुतांश भाग हे मान्सून कोअर झोनमध्ये येतात. हाच झोन देशातील बहुतांश कोरडवाहू शेतीचा कणा आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार यंदा या झोनमध्ये सामान्यपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे खरीप हंगामावर विपरित परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. मध्य प्रदेश, छत्तीसगड, झारखंड, ओडिशा, तेलंगणा, उत्तर प्रदेश आणि बिहार हेसुद्धा कोअर झोनमध्ये येतात. येथेही पावसाचे प्रमाण कमीच राहण्याची शक्यता आहे.** ■

### शेती, पाणी, वीजनिर्मितीवर होणार परिणाम

**» आयएमडीने आपल्या अहवालात नमूद केले की, सरासरीपेक्षा कमी पावसाचे दुष्परिणाम शेती, पाणीपुरवठा, जलविद्युत निर्मिती आणि पर्यावरणावर होऊ शकतात. महाराष्ट्रातत आधीच पाणीटंचाईची समस्या असलेल्या मराठवाडा आणि विदर्भातील जिल्ह्यांसाठी हा अंदाज अधिकच चिंताजनक आहे.** ■

गाझाचा ७० टक्के भूभाग इस्रायलच्या ताब्यात
भारतात लवकरच येणार 'प्लास्टिक'च्या नोटा?
वृत्त पान २ वर

# 'यूपीएससी'कडून नीट धडा घ्या

## पेपरफूट रोखण्यासाठी जबाबदारी निश्चित करणे आवश्यक

### सुप्रीम कोर्टाने 'एनटीए'ला फटकारले



**◆ नवी दिल्ली, २९ मे**
केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) परीक्षांमध्ये कधीही पेपरफुटीचा प्रकार घडलेला नाही. राष्ट्रीय परीक्षा संस्थेने (एनटीए) 'यूपीएससी'कडून धडा घ्यायला हवा. पेपर फूट दुर्भाग्यपूर्ण असून या घटनेचे वाईट वाटतेय, अशा शब्दात सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी 'एनटीए'ला फटकारले. तसेच नीट-यूजी पेपरफुटी प्रकरणात खऱ्या गुन्हेगारांना ओळखून जबाबदारी निश्चित करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले.

नीट-यूजी पेपरफूट प्रकरणी दाखल याचिकेवर झालेल्या सुनावणीत न्यायासनाने भविष्यातील परीक्षा कशा घेतल्या जातील, याबद्दल केंद्र सरकार आणि मनुष्यबळ विकास मंत्रालयाला प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले. एनटीएच्या कारभारावर ताशेरे ओढताना न्यायासनाने म्हटले की, जोपर्यंत या निष्काळजीपणा आणि पेपरफुटीसाठी थेट जबाबदार असलेल्या खऱ्या व्यक्तीची ओळख पटत नाही, तोपर्यंत परीक्षा पद्धतीतील सुधारणा निष्प्रभ ठरतील. केवळ कागदपत्रांमध्ये बदल केल्याने ही समस्या पूर्णपणे दूर होणार नाही. विविध सुरक्षा यंत्रणा आणि देखरेख समित्या कार्यरत असतानाही एवढी मोठी सुरक्षा त्रुटी कशी निर्माण झाली, असा सवाल उपस्थित केला. यूपीएससीसोबत तुलना करताना न्यायासनाने म्हटले की, देशातील सर्वोच्च नागरी सेवा परीक्षेत अशा प्रकारच्या घटना कधीही घडलेल्या नाहीत. त्यामुळे त्यांच्या कार्यपद्धतीतून धडा घेण्याची गरज आहे. संपूर्ण प्रकरण तरुणांच्या भविष्याशी संबंधित आहे. आम्ही परीक्षा पद्धतीतील कोणतीही अनियमितता सहन करणार नाही.

**प्रश्नांची सरबत्ती**

उच्च स्तरीय समितीच्या शिफारशींच्या अंमलबजावणीवर नेमकी किती देखरेख ठेवली, सुरक्षा उपायांचा अवलंब करूनही पेपरफूट कशी झाली, समितीने नेमका कोणत्या गोष्टींचा विचार केला नव्हता, अशी विचारणाही न्यायालयाने एनटीएकडे केली.

**पुन्हा चूक होणार नाही**

आता प्रश्नपत्रिका तयार करण्याची प्रक्रिया अधिक मजबूत केली जात आहे. परीक्षा पद्धतीत सुधारणेसाठी नवीन चौकट तयार करण्यात आली आहे. ओळखण्यात आलेल्या त्रुटी दूर करण्यात आल्या असून आगामी परीक्षेत अशी घटना पुन्हा घडणार नाही, अशी ग्वाही मेहता यांनी दिली. ◂(वृत्तसंस्था)

- **'एनटीए'मध्ये १६ नवीन वरिष्ठ पदे**
- **प्रश्नपत्रिका नेण्यासाठी वायुदलाची मदत**

(वृत्त शेवटच्या पानावर) ▸

# बाशी ईद साजरी करण्यासाठी गेला, अन् तलावात पडून जीवाला मुकला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ मे-**
बकर ईदच्या पार्श्वभूमीवर हिप्परगा तलाव येथे मित्रांसमवेत बाशी ईद साजरी करण्यासाठी गेलेल्या एका २८ वर्षीय तरुणाचा तलावात बुडुन मृत्यू झाल्याची घटना शुक्रवार, २९ मे २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता घडली. मोहसीन रफिक शेख (वय-२८, रा.विष्णुनगर, नई जिंदगी, सोलापूर) असे मयत तरुणाचे नाव आहे.

बाशी ईद साजरी करण्यासाठी शुक्रवारी गल्लीमधील काही मित्र रिक्षामधून हिप्परगा तलावाकडे गेले होते. मोहसीन हा म ोटरसायकलवरुन रिक्षाचा पाठलाग करत त्यांच्या मागे हिप्परगा तलाव येथे पोहोचला. तेथे सर्वजण डान्स केला, फोटो काढले, हॉटेलमध्ये जाऊन जेवण करण्याचे ठरले होते..



दरम्यान, काही स्थानिक लोकांनी या टॉवरजवळ पोहू नका, ७० ते ८० फूट पाण्याची खोली असल्याचे सांगताच इतर मित्र तेथून निघून जात असताना मोहसिन हा पोहण्यासाठी तलावात उतरु लागला तेव्हा इतर मित्रांनी त्यास विरोध केला. तरी देखील तो पाण्यात उतरला. पाणी खोल असल्याने तो पाण्यात बुडू लागला.

तेव्हा दोघा मित्रांनी त्याला वाचविण्यासाठी पाण्यात उतरले. परंतु तेही पाण्यात बुडू लागले. त्यावेळी काठावरील एका मित्राने हात देऊन दोघा मित्रांना बाहेर ओढले. यातील एकालाही पोहता येत नव्हते. त्यामुळे त्यांनी मोहसीनला पाण्यातून बाहेर काढण्यासाठी हिंमत केली नाही. तळे हिप्परगा येथील ग्रामपंचायत शिपाई बंटी पाटोळे यांनी सोलापूर तालुका पोलिसांना खबर दिली. सहाय्यक फौजदार बाणेकर घटनास्थळी पोहचत रुग्णसेवक लादेन यांच्या मदतीने मृतदेह पाण्यातून वर काढले. मृतदेह विच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आला. मोहसीन याच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले, चार भाऊ, दोन विवाहित बहिणी असा परिवार आहे. त्याची पत्नी सात महिन्यांची गरोदर आहे.

# पुण्यात विषारी दारूचे १५ बळी

**● पाच अतिदक्षता विभागात ● कठोर कारवाई करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश**

**◆ पुणे/पिंपरी, २९ मे**
विषारी दारू प्यायल्याने पुण्याच्या हडपसरमधील पांढरेमळा, ससाणेनगर तसेच पिंपरी-चिंचवड शहरातील फुगेवाडी परिसरातील १५ जणांचा मृत्यू झाला आहे. तर पाच जणांवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी हडपसर आणि दापोडी पोलिस ठाण्यात दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. २८ आणि २९ मे या दोन दिवसांत हे सर्व मृत्यू झाले आहेत.

२६ ते २८ मे या कालावधीत फुगेवाडी परिसरात हातभट्टीची विषारी दारू प्यायल्यामुळे काही नागरिकांची प्रकृती गंभीर झाली आणि काही जणांचा मृत्यू झाला. गुरुवारी २८ मे रोजी सायंकाळपर्यंत ५ जणांचा मृत्यू झाला होता. शुक्रवारी ही संख्या वाढून नऊवर पोचली. फुगेवाडीतील दारूच्या गुत्त्यावर विषारी दारू पिऊन राजेश राजपूत, अकबर पठाण, आनंद देसाई, आनंद निकाळजे, पांडुरंग फुगे, विजय राठोड आणि राजेंद्र राठोड या सात जणांचा गुरुवारी मृत्यू झाला तर शुक्रवारी अक्षय अवसरमल, सचिन नेटके, भीमण्णा नागराळ आणि सुरप्पा बंगारी या चौघांचा मृत्यू झाला.

हडपसरमधील राहुल क्षिरसागर, अरुण डाडर, दत्ता सूर्यवंशी, अशोक चव्हाण या चौघांचा मृत्यू झाला आहे. त्याचबरोबर विजय शर्मा, यशवंत पवार यांचाही मृत्यू झाल्याचा दावा कुटुंबीयांनी केला आहे. याप्रकरण आठ जणांना अटक केली आहे.

# मुंढेंच्या तीन दिवसांत ५३ धाडी

**भेसळ करणाऱ्यांचे धाबे दणाणले; कठोर कारवाई सुरू**

**◆ मुंबई, २९ मे**
अन्न व औषध प्रशासन आयुक्तपदाचा पदभार स्वीकारताच तुकाराम मुंढे यांनी राज्यभरात कठोर कारवाईची मोहीम सुरू करून अवघ्या तीन दिवसांत राज्यभरात ५३ धाडी टाकल्या आहेत.



तुकाराम मुंढे यांनी २५ मे रोजी आयुक्तपद स्वीकारल्यानंतर लगेचच मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, अमरावती आणि छत्रपती संभाजीनगरसह सर्व विभागांतील अधिकाऱ्यांना कठोर तपासणी आणि धाडी टाकण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानंतर अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी राज्यभर एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर छापे टाकून भेसळयुक्त आणि प्रतिबंधित पदार्थ विक्री करणाऱ्यांवर कारवाई सुरू केली.

या मोहिमेत एकूण ५३ आस्थापनांची तपासणी करण्यात आली असून त्यापैकी ३४ ठिकाणी प्रतिबंधित गुटखा आणि पान मसाल्याची अवैध विक्री आढळून आली. या प्रकरणात पोलिसांनी २५ एफआयआर दाखल करत ३३ जणांना अटक केली आहे. तसेच ५ वाहने जप्त करण्यात आली असून २७ आस्थापना सील करण्यात आल्या आहेत. या कारवाईदरम्यान सुमारे २० लाख रुपयांपेक्षा अधिकचा अवैध साठा जप्त करण्यात आला.मुंबई विभागात सर्वात मोठी कारवाई झाली असून येथे १९ आस्थापनांवर थेट सील ठोकण्यात आले आहे. या सर्व ठिकाणी गुटखा, पानमसाला आणि तंबाखूजन्य पदार्थांचा बेकायदेशीर साठा आणि विक्री आढळून आली. संबंधित १९ व्यक्तींविरुद्ध गुन्हे दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे. गुटखा आणि पानमसाल्याव्यतिरिक्त अन्न व औषध प्रशासनाने इतर २३ आस्थापनांचीही तपासणी केली आहे. यामध्ये पॅकबंद पाणी, दूध, तेल, मसाले, फरसाण, आईसक्रीम, तूप, पनीर, खवा आणि बेकरी पदार्थ यांसारख्या दैनंदिन वापरातील अन्नपदार्थांचा समावेश होता. ◂(वृत्तसंस्था)

### नियमबाह्य अन्नसाठा जप्त

या तपासणीत सुमारे २८ लाखांहून अधिक किमतीचा संशयास्पद आणि नियमबाह्य अन्नसाठा जप्त करण्यात आला असून सर्व नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. राज्यात सुरू झालेल्या या धडक मोहिमेमुळे भेसळखोरांमध्ये खळबळ उडाली असून तुकाराम मुंढेंच्या नेतृत्वाखाली एफडीए पुन्हा एकदा 'ॲक्शन मोड'मध्ये असल्याचे स्पष्ट झाले आहे. ■



उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे, नीट-यूजी परीक्षा आणि लेखपाल भरती प्रक्रियेतील कथित पेपरफूटी आणि अनियमिततेच्या निषेधार्थ सुरू असलेल्या आंदोलनाच्या पृष्ठभूमीवर अनुचित घटना टाळण्यासाठी पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला.

# दीदींचा किल्ला गटबाजीने अस्थिर

**११ ज्येष्ठ नेत्यांच्या बंडाने खळबळ**

**◆ कोलकाता, २९ मे**
पश्चिम बंगालच्या राजकारणात सत्ताधारी तृणमूल काँग्रेस (टीएमसी) पक्षातील अंतर्गत मतभेद, नेतृत्वावर वाढत असलेला असंतोष आणि काही ज्येष्ठ नेत्यांच्या नाराजीमुळे ममता बॅनर्जी यांच्या संघटनेसमोर गंभीर आव्हान निर्माण झाले असल्याचे चित्र दिसत आहे.



पक्षातील ज्येष्ठ नेत्यांमध्ये वाढलेल्या मतभेदांनी वातावरण अधिक तापले आहे. काही खासदार आणि माजी मंत्र्यांमध्ये नेतृत्वशैली आणि संघटनात्मक निर्णयांवरून असंतोष असल्याचे समोर येत आहे. यामुळे काही नेते पक्ष सोडण्याच्या तयारीत असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. टीएमसीतील अंतर्गत वादामागे संघटनेतील बदलते सत्ताकेंद्र हे प्रमुख कारण मानले जात आहे. अभिषेक बॅनर्जी यांचा वाढता प्रभाव आणि निर्णय प्रक्रियेत त्यांची भूमिका यामुळे जुने आणि अनुभवी नेते बाजूला पडत असल्याची भावना काही गटांमध्ये निर्माण झाली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, काही खासदार आणि माजी मंत्र्यांसह सुमारे ११ ज्येष्ठ नेते पक्षांतराचा विचार करत असल्याची चर्चा आहे. यापैकी काही नेते इतर राजकीय पर्याय शोधत असून, काही जण योग्य वेळेची वाट पाहत असल्याचे सांगितले जात आहे. पक्षाची एकजूट टिकवणे आणि नाराज नेत्यांना पुन्हा विश्वासात घेणे हे ममता बॅनर्जी यांच्यासमोर मोठे आव्हान ठरणार आहे. ◂(वृत्तसंस्था)

# 'एआय' क्रांतीचे जागतिक नेतृत्व करण्यासाठी महाराष्ट्र सज्ज : मुख्यमंत्री

## 'मुंबई टेक वीक २०२६' तंत्रज्ञान महोत्सवाचे उद्घाटन

**◆ मुंबई, २९ मे**
मुंबईची आर्थिक ताकद, अफाट तंत्रज्ञान कौशल्य आणि मजबूत स्टार्टअप परिसंस्था यांच्या बळावर आगामी काळात महाराष्ट्र केवळ भारतातच नव्हे, तर संपूर्ण जगात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) क्षेत्राचे नेतृत्व करेल, असा ठाम विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे व्यक्त केला.

मुंबईतील बीकेसी येथे आयोजित 'मुंबई टेक वीक २०२६' या भव्य तंत्रज्ञान महोत्सवाचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते दिमाखात उद्घाटन झाले, त्याप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाला मुंबईच्या महापौर रितू तावडे, मुंबई मनपा आयुक्त अश्विनी भिडे, महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी यांच्यासह देश-विदेशातील नामांकित उद्योजक, स्टार्टअप संस्थापक, गुंतवणूकदार आणि जागतिक तंत्रज्ञान कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



महाराष्ट्राला एआयची जागतिक पंढरी बनवण्यासाठी राज्य सरकारने कंबर कसली आहे. यासाठी शासनाने १० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक, दीड लाख रोजगार निर्मिती, सहा 'सेंटर ऑफ एक्सलन्स' आणि विशेष 'एआय इनोव्हेशन क्षेत्रे' उभारण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवले आहे. संशोधक आणि नवउद्योजकांना हाय-कंप्युटिंग सुविधा परवडत नसल्याने त्यांच्या नवकल्पना थांबू नयेत, यासाठी सरकार थेट पायाभूत सुविधा पुरवणार आहे. यासाठी 'कम्प्युट-ॲज-अ-सर्व्हिस' अंतर्गत २ हजार जीपीयू उपलब्ध करून दिले जात असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

**महाराष्ट्रासाठी काम करा; जगासाठी नवकल्पना घडवा!**

गुंतवणूक आणि स्टार्टअप्सच्या संख्येत महाराष्ट्र सलग तीन वर्षे देशात अव्वल राहिला आहे. देश-विदेशातील कंपन्यांना आवाहन करताना मुख्यमंत्री म्हणाले, तंत्रज्ञान क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी हा सर्वोत्तम काळ असून महाराष्ट्र ही सर्वोत्तम कार्यभूमी आहे. शासन केवळ मार्गदर्शन करणार नाही, तर 'फंड ऑफ फंड्स'च्या माध्यमातून थेट गुंतवणूक भागीदार म्हणून तुमच्या पाठीशी उभे राहील. ◂(तभा वृत्तसेवा)

### शासकीय कामकाजात 'एआय'

मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्य शासनाच्या विविध विभागांमध्ये सुरू असलेल्या एआयच्या प्रभावी वापराची काही उदाहरणे दिली. यामध्ये केंद्र सरकारने देशातील सर्वोत्तम शेतकरी उपाय म्हणून गौरविलेले 'महा-विस्तार' ॲप आता 'इंडिया-विस्तार' नावाने देशपातळीवर विकसित होत आहे. पूर्वी ज्या १५ हजार पानांच्या आरोपपत्रासाठी (चार्जशीट) ३ ते ४ महिने लागायचे, ते काम आता गुन्हे तपासात क्रांती ('क्राईम ओएस') या एआय प्रणालीमुळे अवघ्या १० ते १२ दिवसांत पूर्ण होणार आहे. ■

# अबब! एक हजार किलोमीटर रुंदीच्या लाटा!

**◆ वॉशिंग्टन, २९ मे**
युरोपियन स्पेस एजन्सीच्या एका उपग्रहाने पॅसिफिक महासागरात एक हजार किलोमीटर रुंदीची पाण्याची लाट पाहिली आहे. जे अल निनोच्या आगमनाचे एक प्रबळ संकेत आहे.

हवामानशास्त्रज्ञांच्या मते, अल निनोची घटना जून महिन्यात विकसित होऊ शकते. शास्त्रज्ञांच्या मते, पॅसिफिक महासागरातील खळबळ हे या वर्षी एक मोठी अल निनो घटना विकसित होत असल्याचे प्रबळ संकेत आहेत. या अल निनोचा परिणाम भारतासह जगाच्या मोठ्या भागातील पर्जन्यमान आणि तापमानावर होऊ शकतो. यूएस नॅशनल ओशनिक अँड एन्व्हायर्नमेंटल ॲडमिनिस्ट्रेशन वेदर प्रेडिक्शन सेंटरनुसार, ऑक्टोबर २०२६ ते फेब्रुवारी २०२७ दरम्यान सुपर अल निनो येण्याची सर्वाधिक शक्यता आहे. जूनपर्यंत अल निनो वादळ येण्याची शक्यता असल्याचे काही दिवसांपूर्वीच, ऑस्ट्रेलियाच्या हवामानशास्त्र ब्युरोने सांगितले. पॅसिफिक महासागराशी संबंधित हवामानातील बदलांवर लक्ष ठेवण्यासाठी हे ब्युरो एक विश्वसनीय प्राधिकरण मानले जाते. पण आता, नासा आणि एका युरोपियन उपग्रहाने अल निनोचे संकेत देणारे प्रत्यक्ष पुरावे शोधले आहेत.

### अल निनोचा जगावर होणार परिणाम



युरोपियन स्पेस एजन्सीचा 'सेंटिनेल-६ मायकेल फ्रेलिच' उपग्रह, जो नासाने २०२० मध्ये प्रक्षेपित केला होता, दर १० दिवसांनी महासागरातील पाण्याच्या पातळीचे मोजमाप करतो आणि नकाशा तयार करतो. समुद्राच्या पातळीतील बदलांचा मागोवा घेऊन, हा प्रगत उपग्रह समुद्राचे तापमान प्रभावीपणे मोजू शकतो.

हे घडते कारण गरम झालेल्या पाण्यामुळे त्याची भौतिक पातळी वाढते. जानेवारीच्या अखेरीस एक लहान केल्विन लाट तयार होत होती, जी नंतर विरून गेली. मार्चच्या सुरुवातीला, सुमारे एक हजार किमी रुंदीची एक नवीन लाट पूर्वेकडे सरकली. मे महिन्याच्या मध्यापर्यंत, पेरूच्या आसपास समुद्राची पातळी दीर्घकालीन सरासरीपेक्षा १५ सेमी पेक्षा जास्त वाढली होती, असे उपग्रहाच्या मोजमापांवरून दिसून आले आहे. ◂(वृत्तसंस्था)

### अल निनो तीव्र होण्याची शक्यता

**१४ मे रोजी प्रकाशित केलेल्या आपल्या अंदाजानुसार, ऑक्टोबरपर्यंत अल निनोला तीव्र किंवा अति तीव्र होण्याची ६५ टक्के शक्यता आहे. यामुळे हा इतिहासातील सर्वात तीव्र अल निनोपैकी एक ठरू शकतो, असे यूएस नॅशनल ओशनिक अँड एन्व्हायर्नमेंटल ॲडमिनिस्ट्रेशन वेदर प्रेडिक्शन सेंटरने म्हटले आहे. आता अल निनो जूनच्या सुरुवातीलाच विकसित होऊ शकतो आणि हा टप्पा फेब्रुवारी २०२७ पर्यंत सुरू राहण्याची शक्यता आहे.** ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# कर्नाटकी नाटक

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी राजीनामा देत डी. के. शिवकुमार यांचा मुख्यमंत्रिपदाचा मार्ग प्रशस्त केला, असे सकृद्दर्शनी दिसत असले तरी प्रत्यक्षात ते तसे आहे का, हा मोठा प्रश्न आहे. शुक्रवारी शिवकुमार यांची काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी निवड झालेली असेल. त्यानंतर ते राज्यपाल थावरचंद गहलोत यांची भेट घेत सरकार स्थापण्याचा दावा करतील. राज्यात काँग्रेसला बहुमत असल्यामुळे राज्यपाल त्यांना सरकार स्थापन करण्यासाठी बोलावतीलही. एक दोन दिवसांत शिवकुमार मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतील, यात शंका वाटत नाही. मात्र त्यांचा मुख्यमंत्रिपदाचा मार्ग काटेरी दिसतो आहे. काँग्रेसच्या नेतृत्वाने सिद्धरामय्या यांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देण्याची सूचना करताना त्यांच्यासमोर राष्ट्रीय राजकारणात येण्याचा आणि राज्यसभेच्या जागेचा प्रस्ताव ठेवला आहे. सिद्धरामय्या यांचा मुलगा, डॉ. यतींद्रला, कॅबिनेट मंत्री करण्याचा प्रस्तावही बोनस म्हणून त्यांच्यासमोर आहे. पक्षश्रेष्ठींच्या सूचनेनंतर सिद्धरामय्या यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला असला तरी राष्ट्रीय राजकारणात येण्याची आणि राज्यसभेत जाण्याची सूचना फेटाळून लावत त्यात पाचर मारून ठेवली आहे. राष्ट्रीय राजकारणात येण्याची माझी इच्छा नाही, आणखी काही वर्षे मला राज्यातील जनतेची सेवा करायची आहे, असे ते म्हणाले. याचाच अर्थ सिद्धरामय्या राज्याच्या राजकारणात राहणार आणि नवीन मुख्यमंत्री शिवकुमार यांची डोकेदुखी वाढवणार, असे संकेत आहेत. आपल्या कृतीने ते शिवकुमार यांच्या मार्गात काटे पेरणार असल्याचे चित्र आहे.

सिद्धरामय्या यांच्यासमोर काँग्रेसच्या नेतृत्वाने राज्यसभेतील विरोधी पक्षनेतेपदाचा प्रस्ताव ठेवला होता, असे म्हणतात. पण त्यांनी राष्ट्रीय राजकारणात पर्यायाने राज्यसभेत येण्याचे नाकारल्यामुळे सध्या राज्यसभेतील विरोधी पक्षनेते असलेले मल्लिकार्जुन खडगे यांचे समर्थक आपल्या नेत्याचे विरोधी पक्षनेतेपद वाचल्याबद्दल आनंदाने उड्या मारत असतील, तर शिवकुमार यांचे समर्थक आपले डोके फोडून घेत असतील. सिद्धरामय्या राष्ट्रीय राजकारणात म्हणजे दिल्लीला गेले असते तर शिवकुमार यांना शांतपणे आणि आपल्या हिशेबाने राज्याचा गाडा हाकता आला असता. आता मात्र तसे होण्याची शक्यता दिसत नाही. सिद्धरामय्या कर्नाटकात शिवकुमार यांच्या डोक्यावर बसत प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे राज्याच्या राजकारणात हस्तक्षेप करण्याची शक्यता नाकारता येणार नाही. कर्नाटक काँग्रेसमध्ये दोन गट होते, एक सिद्धरामय्या यांचा तर दुसरा शिवकुमार यांचा. शिवकुमार यांच्या सरकारमध्ये आपल्या गटाला एक उपमुख्यमंत्रिपद आणि १५ मंत्रिपदाची मागणी सिद्धरामय्या यांनी करत शिवकुमार यांचा रक्तदाब वाढवला आहे. सिद्धरामय्या यांचा डोळा प्रदेश अध्यक्षपदावर आहे, असे जाणवते. प्रदेश अध्यक्षपद आपल्याकडे घेत २०२८ च्या विधानसभा निवडणुकीत सत्तेची चावी आपल्या हातात ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न असू शकतो. मुख्यमंत्रिपद सोडले तरी त्यांना राज्यात समांतर सत्ताकेंद्र उभे करायचे आहे, असे त्यांच्या हालचालींवरून दिसते. २०२३ च्या विधानसभा निवडणुकीनंतर शिवकुमार हे मुख्यमंत्रिपदाचे प्रमुख दावेदार होते. पण सिद्धरामय्या यांनी बाजी मारली. दुसऱ्यांदा मुख्यमंत्री होण्याची संधी त्यांना मिळाली. शिवकुमार यांनी मुख्यमंत्रिपदाची आपली आकांक्षा कधी लपवून ठेवली नाही. वेळोवेळी ती व्यक्तही केली. मुख्यमंत्रिपदासाठी अडीच-अडीच वर्ष असा फॉर्म्युला ठरला होता, असा दावा शिवकुमार वारंवार करत होते, पण त्याला अधिकृतपणे दुजोरा सिद्धरामय्या वा काँग्रेसच्या नेतृत्वानेही दिला नाही. २०२८ मध्ये राज्यात विधानसभेची निवडणूक होणार आहे. त्यामुळे काँग्रेसने राज्यात नेतृत्वबदल घडवून आणला, असे दिसते. सिद्धरामय्या यांचे वय झाले आहे, तसेच त्यांच्या सरकारविरुद्ध ॲण्टिइन्कमबन्सीही वाढली आहे, यात भरीसभर म्हणजे त्यांच्यावर आणि त्यांच्या कुटुंबीयांवर भ्रष्टाचाराचे आरोपही झाले आहेत. त्यामुळे राज्यात नेतृत्वबदल आवश्यक झाला होता. कर्नाटक हे दक्षिण भारतातील एक मोठे राज्य आहे. संपूर्ण देशातून काँग्रेसचे बारा वाजले असताना दक्षिण भारतातील तेलंगणा आणि कर्नाटक या दोन राज्यांतच काँग्रेसचे अस्तित्व आहे. त्यात आता केरळची भर पडली आहे. उत्तरेकडील हिमाचल प्रदेश या एकमेव राज्यात काँग्रेसचा सत्तेचा दिवा मिणमिणतो आहे. अन्यथा उर्वरित भारतात काँग्रेसच्या दृष्टीने सगळा आनंदीआनंद आहे. त्यामुळे कर्नाटक हे काँग्रेसच्या दृष्टीने अतिशय महत्त्वपूर्ण राज्य म्हणावे लागेल. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे हेही कर्नाटकचे असल्यामुळे काँग्रेससाठी या राज्याचे महत्त्व आणखी वाढते.

राज्यपाल थावरचंद गहलोत राजधानीत नसतानाही त्यांच्या खाजगी सचिवाकडे राजीनामा देणाऱ्या सिद्धरामय्या यांनी मंत्रिमंडळाच्या शेवटच्या बैठकीत मागासवर्गीय आयोगाचा वादग्रस्त असा सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक अहवाल स्वीकारला आहे. राज्यात जातनिहाय जनगणनेला मान्यता देण्याचा हा अहवाल आहे. हा अहवाल अनेक वर्षे प्रलंबित होता. मुख्यमंत्रिपदाच्या आपल्या पहिल्या कार्यकाळात सिद्धरामय्या यांनी असा अहवाल स्वीकारला नव्हता. त्याऐवजी नव्याने सर्वेक्षण करण्याचे आदेश त्यांनी दिले होते. या अहवालाला मान्यता देत सिद्धरामय्या यांनी शिवकुमार आणि काँग्रेसच्या नेतृत्वाची डोकेदुखी वाढवली आहे. सिद्धरामय्या हे स्वतः ओबीसी समाजाचे नेते आहेत. एकप्रकारे त्यांनी या मुद्यावरून राज्यातील ओबीसींना आपल्या अधिकारासाठी रस्त्यावर उतरण्याचा इशारा केला असे वाटते. काँग्रेसशासित राज्यात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्यातील संघर्ष तसा नवा नाही. राजस्थानमध्ये आता काँग्रेसची सत्ता नाही. पण सत्ता असताना मुख्यमंत्री अशोक गहलोत आणि उपमुख्यमंत्री सचिन पायलट यांच्यातील संघर्षाने राज्यातील काँग्रेसचे सरकार अनेकवेळा अडचणीत आले होते. पण तेव्हा अशोक गहलोत यांना मुख्यमंत्रिपदावरून हटवण्याची काँग्रेसच्या नेतृत्वाची हिंमत झाली नाही. परिणामी पायलट यांचे मुख्यमंत्री होण्याचे स्वप्न स्वप्नच राहिले. अशीच स्थिती छत्तीसगडमध्ये काँग्रेसचे सरकार असताना उद्भवली होती. तेव्हाचे मुख्यमंत्री भूपेश बघेल आणि तत्कालीन मुख्यमंत्री टी. एस. सहदेव यांच्यातील संघर्षही असाच गाजला होता.

कर्नाटकचे नवे मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार हे वोक्कालिंग समुदायाचे आहेत. १९८९ पासून राज्याच्या राजकारणात ते सक्रिय आहेत. राज्यातील सर्वांत श्रीमंत नेता म्हणून त्यांची प्रतिमा आहे. काँग्रेससाठी अनेकवेळा त्यांनी संकटमोचकाची भूमिका बजावली आहे, काँग्रेसचे सर्वांत मोठे फंड मॅनेजर म्हणूनही ते ओळखले जातात. त्यामुळे त्यांना यावेळी मुख्यमंत्रिपदापासून वंचित ठेवणे किंवा त्यांच्या तोंडाला पाने पुसणे काँग्रेसच्या नेतृत्वाला शक्य झाले नसावे. काँग्रेससाठी संकटमोचकाची भूमिका बजावणाऱ्या शिवकुमार यांना काँग्रेससमोर नवे संकट निर्माण करणे फारसे कठीण नव्हते. त्यामुळे यावेळी कधी नव्हे ते काँग्रेसच्या नेतृत्वाने विशेषतः राहुल गांधी यांनी आपल्यात नसलेले राजकीय शहाणपण दाखवले आहे, असे म्हणावे लागते.

मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर शिवकुमार यांच्यासमोर एकीकडे माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि त्यांच्या गटातील आमदारांना हाताळण्याचे तसेच नियंत्रणात ठेवण्याचे मोठे आव्हान राहणार आहे. सिद्धरामय्या सरकारच्या कामकाजात हस्तक्षेप करण्याची शक्यता नाकारता येत नाही. यात त्यांना ओबीसी नेता या प्रतिमेचा मोठा उपयोग करता येऊ शकतो. कर्नाटकात लिंगायत आणि वोक्कालिंग हे दोन प्रमुख समुदाय आहेत. राज्याचे राजकारण सामान्यपणे या दोन प्रमुख समुदायांच्या भरवशावरच चालत असते. राज्यातील आतापर्यंत बहुतेक मुख्यमंत्री एक तर लिंगायत वा वोक्कालिंग समुदायातून झाले आहेत. भाजपा नेते आणि राज्याचे माजी मुख्यमंत्री येदीयुरप्पा लिंगायत तर माजी मुख्यमंत्री तसेच माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा हे वोक्कालिंग समुदायाचे आहेत. काँग्रेससमोर राज्यातील आपला जनाधार टिकवण्यासोबत तसेच आपल्या ताब्यातील आतापर्यंत इनमीनतीन असलेल्या पण आता चार राज्यांतील सत्ता टिकवण्याचे तसेच त्या राज्यांत गटबाजी वाढू न देण्याचे मोठे आव्हान आहे. कर्नाटकातील या नेतृत्वबदलाचा फायदा येत्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला होणार की भाजपा त्याचा फायदा घेणार, याचे उत्तर नजीकच्या काळात मिळणार आहे. ▮

## यंगिस्तान

# सूर्यावर किती काळ थुंकणार?

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

२८ मे रोजी स्वातंत्र्यवीर सावरकरांची जयंती भारतभरात साजरी झाली. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर, हे नाव उच्चारताच अनेकांच्या भुवया उंचावतात. काही लोक त्यांना महान देशभक्त मानतात, तर काही लोक त्यांना खलनायक ठरवण्याचा बळेबळे प्रयत्न करतात. पण एक गोष्ट निर्विवाद सत्य आहे, ती म्हणजे सावरकरांना दुर्लक्षित करणे शक्य नाही. त्यांच्यावर होणारी टीका ही त्यांच्या कार्याची आणि विचारांची व्याप्तीच दर्शवते. २०१४ पूर्वी, एका विशिष्ट विचारधारेने सावरकरांना पद्धतशीरपणे बदनाम करण्याचा विडा उचलला होता. शासकीय स्तरावर त्यांची जयंती, पुण्यतिथी साजरी होत नाही, शासकीय स्तरावर त्यांच्या साहित्याचा व चरित्राचा प्रचार केला जात नाही. तरीही सावरकर हे नाव भारतीय राजकारणाच्या आणि समाजकारणाच्या केंद्रस्थानी कायम आहे. ही सावरकरवादाची ताकद आहे, हे सावरकरवादाचे यश आहे. आज देशाची वाटचाल सावरकरांच्या सैनिकीकरणाच्या आणि इतर धोरणांनुसार होत आहे, हे स्पष्टपणे दिसून येते. राष्ट्रीय सुरक्षा, सशक्त राष्ट्रवाद आणि हिंदुत्वाचा विचार हे आजच्या भारताच्या धोरणांचे अविभाज्य भाग बनले आहेत. हिंदुत्व हा शब्द उच्चारला तर सर्वांत आधी सावरकरांची मूर्ती समोर उभी राहते. साधारण ठेंगणी अशी ही मध्यमवर्गीय मूर्ती आणि या मूर्तीने ब्रिटिश शासन हलवून लावले होते यावर विश्वास बसत नाही. पण हीच ती मूर्ती आहे, जिने क्रांतीची मशाल पेटवली, समाजाला दिशा दिली आणि राष्ट्राला एका नव्या उंचीवर नेले. त्यांच्यावर कितीही चिखलफेक केली तरी, त्यांच्या विचारांचा सूर्य अधिक तेजाने तळपत आहे.

सावरकरांचे कार्य केवळ सशस्त्र क्रांतीपुरते मर्यादित नव्हते, तर ते एक महान समाजसुधारकही होते. त्यांनी अस्पृश्योद्धारासाठी केलेले कार्य हे त्यांच्या दूरदृष्टीचे आणि सामाजिक न्यायाच्या तळमळीचे प्रतीक आहे. ज्यांना गांधीजी 'हरिजन' म्हणत, त्यांनाच सावरकर 'पूर्वास्पृश्य' म्हणत आणि त्यांच्यासाठी प्रत्यक्ष कृती केली, केवळ भाषणे देत लोकांना भ्रमित करीत राहिले नाहीत. १९२९ मध्ये रत्नागिरीतल्या प्राचीन श्री विठ्ठल मंदिरात पूर्वास्पृश्यांचा प्रवेश घडवून आणणे, हे त्या काळात एक क्रांतिकारी पाऊल होते. त्यांनी पतितपावन मंदिराची स्थापना केली, जिथे सर्व हिंदूंना मुक्त प्रवेश होता. अखिल हिंदू उपहारगृहाची स्थापना करून त्यांनी जातीय भेदभावावर प्रहार केला. अस्पृश्यता हा मनुष्यत्वाचा अपमान आहे, हे त्यांनी ठामपणे मांडले. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांनी सावरकरांच्या या कार्याची प्रशंसा करताना म्हटले होते की, येथे घडत असलेली सामाजिक क्रांती खरोखरच अपूर्व आहे. अंदमानात असतानाही त्यांनी निरक्षर कैद्यांना साक्षर केले आणि २००० पुस्तकांचे वाचनालय सुरू केले, ज्यामुळे कैद्यांमध्ये सकारात्मक बदल घडून आले. अंदमानातील मुस्लिमांच्या वर्चस्वाला आव्हान दिले. तिथे मुस्लिम हिंदू कैद्यांचे धर्मांतरण करायचे. सावरकर जाण्यापूर्वी मुस्लिमांचे प्रचंड वर्चस्व होते, पण सावरकर तिथून बाहेर पडताना अंदमानात एक हिंदू राष्ट्र निर्माण झाले होते.



सावरकर हे केवळ राजकारणी, लेखक नव्हते, तर ते एक तत्त्वज्ञानी, इतिहासकार आणि इतिहास घडवणारेही होते.

मात्र दुर्दैव असे की या महान विभूतीवर आजही सातत्याने टीका केली जाते. टीका करायला काहीच हरकत नाही. ते इतिहासपुरुष आहेत आणि त्यांचे विश्लेषण झालेच पाहिजे असे आम्हा हिंदुत्ववाद्यांचे प्रामाणिक मत आहे. पण खोटी टीका सहन केली जाणार नाही. त्यांच्यावर ब्रिटिशांची माफी मागितल्याचे आरोप केले जातात, जे त्यांच्या विरोधकांचे मुख्य शस्त्र बनले आहे. राहुल गांधी यांनी लंडनमध्ये केलेल्या भाषणावरून सात्यकी सावरकर (सावरकरांचे नातू) यांनी त्यांच्याविरोधात मानहानीचा खटला दाखल केला आहे. या खटल्यात राहुल गांधी यांनी सावरकरांनी ब्रिटिशांची पाच वेळा माफी मागितली आणि गाईला केवळ उपयुक्त पशू मानले, असे आरोप केले होते. राहुल गांधींनी सात्यकी सावरकर यांच्या मातृवंशाच्या माहितीचा उल्लेख केला, जी न्यायालयाने फेटाळली. यावरून हे स्पष्ट होते की, सावरकरांना बदनाम करण्यासाठी किती खालच्या पातळीवर जाऊन प्रयत्न केले जात आहेत. फेसबुक आणि इतर सोशल मीडियावरही त्यांच्यावर सातत्याने खोटे आरोप केले जातात, त्यांच्या कार्याची बदनामी केली जाते. पण, या सर्व टीकेमुळे सावरकरांचे महत्त्व कमी होत नाही, उलट ते अधिक ठळकपणे समोर येते. त्यांच्यावर टीका करणारे हे विसरतात की, सावरकरांनी मातृभूमीसाठी किती त्याग केला, किती हालअपेष्टा सोसल्या. अंदमानच्या काळकोठडीत त्यांनी भोगलेले कष्ट हे संपूर्ण राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी होते. हिंदूंच्या कल्याणासाठी होते...

सावरकरांच्या विचारांची ताकद आजच्या भारताच्या धोरणांमध्ये स्पष्टपणे उमटलेली दिसते. सैनिकीकरण आणि हिंदुत्व हे शब्द आज केवळ कागदावर उरले नसून, ते राष्ट्रवादाचे मुख्य आधारस्तंभ बनले आहेत. सावरकरांनी पाहिलेले सामर्थ्यवान भारताचे स्वप्न आज सत्यात उतरताना दिसत आहे. सावरकरांचा विचार हा केवळ एका कालखंडापुरता मर्यादित नव्हता, तर तो युगानुयुगे देशाला दिशा देणारा प्रकाशस्तंभ आहे. ज्यांनी अंदमानाच्या भिंतींवर काव्य लिहिले, ज्यांनी मृत्यूलाही आपल्या धैर्याने थक्क केले, त्यांच्या महानतेवर शंका घेणे हे स्वतःच्याच अज्ञानाचे प्रदर्शन करण्यासारखे आहे. सावरकर म्हणजे एक प्रखर धगधगते अग्निकुंड आहेत. होय आहेत, ते हिंदुत्वाच्या प्रखर राष्ट्र विचारांत जिवंत आहेत. तर या कुंडातून निर्माण होणाऱ्या विचारांच्या ज्वाला आजही आपल्या मनातील मरगळ झटकून आपल्याला राष्ट्रकार्यासाठी प्रवृत्त करतात. सावरकरांच्या विरोधात कितीही खोटे आरोप केले, कितीही फेसबुक पोस्ट्स लिहिल्या, तरी इतिहासाच्या पानांवर सुवर्णाक्षरांनी कोरलेले त्यांचे नाव पुसणे कुणालाही शक्य नाही. सावरकर हे केवळ एक व्यक्ती नसून ते एक चिरंतन मूल्य आहे. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर, ''की घेतले व्रत न आम्ही हे अंधतेने, लब्ध-प्रकाश इतिहास निसर्गमाने, जे दिव्य दाहक म्हणूनी असावयाचे, बुद्ध्याचि वाण धरिले, करि हे सतीचे.'' हे सतीचे वाण घेऊनच आजचा भारत महासत्तेच्या दिशेने वाटचाल करत आहे आणि यातच सावरकरवादाचे सर्वांत मोठे यश सामावलेले आहे. त्यांच्यावर होणारी टीका ही सूर्यावर थुंकण्यासारखीच आहे; ती थुंकी उलट टीका करणाऱ्यांच्याच तोंडावर पडते. तुम्ही किती काळ सूर्यावर थुंकणार आहात? आणि स्वतःच्याच थुंकीने आपली तोंडे गलिच्छ करणार आहात? जर आम्ही हिंदुत्ववादी तुमच्या दिशेने एकत्रित थुंकलो तरी त्या थुंकीच्या त्सुनामीत तुम्ही वाहून जाल, नष्ट व्हाल... समजलं ना! ▮

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**विजय कुळकर्णी**

# क्रौर्यालाही लाजवणारी घटना!

२५ मे सोमवारचा दिवस. एक हृदय पिळवटून टाकणाऱ्या घटनेचे वृत्त कानावर पडले. क्रौर्यालाही लाजवेल, अशी ती घटना होती. एका बापाने आपल्या पोटच्या चार मुलांना शेतातील विहिरीत टाकून स्वतः देखील आत्महत्या केल्याची घटना जळगाव जा. तालुक्यातील अंजनगाव भालांजन या आदिवासी गावात घडली. ही बातमी ऐकून मन सुन्न झाले. डोक्यात विचारांचे काहूर माजले. असे काय घडले असेल की, त्या बापाने आपल्या पोटच्या चार मुलांना विहिरीत टाकण्याची दुर्दैवी वेळ त्याच्यावर आली? आपल्या मुलांची चूक झाल्यावर आपण थापडही मारत नाही, मात्र या बापाने त्याच्या मुलांना चक्क विहिरीत टाकले. या घटनेतील पिता विजय मुसा कराडिया याने त्याच्या पत्नीला तिच्या माहेरी सोडून आल्यावर हे क्रौर्य केले. पती-पत्नीत सतत वाद होत होता. घटनेच्या दिवशी देखील त्याच्या पत्नीने माहेरी सोडून देण्याचा हट्ट धरला. तिच्या हट्टापुढे त्याचे काही एक न चालल्याने त्याने तिला माहेरी सोडले. घरी परतल्यावर मुलांना शेतात फिरायला नेतो, असे त्याने त्याच्या वडिलांना सांगितले आणि शेतातील विहिरीत मुलांना टाकून स्वतः गळफास घेऊन आत्महत्या केली.

ही घटना केवळ एका व्यक्तीच्या मानसिक संतुलन बिघडण्याची नाही. तर, हा संपूर्ण समाजाच्या ढासळलेल्या मानसिकतेचा नमुना आहे. व्यसनातून पत्नीची हत्या केल्याच्या घटना घडतात. पण, या घटनेतील विजय कराडिया हा व्यसनी नव्हता. तो व्यसनमुक्तीचे समाज माध्यमांवरून लोकांना धडे देत होता. आदिवासींमध्ये व्यसनाधीनता जास्त प्रमाणात असलेली दिसते. पण, विजय त्याला अपवाद होता. आदिवासींनी दारूचे व्यसन सोडावे, यासाठी तो प्रयत्न करीत होता. त्याच्या मानसिक तणावाचे कारण त्याचा एकलकोंडा व शीघ्रकोपी स्वभाव असावा, असे पोलिस तपासात समोर आले आहे. पोलिसांनी त्याच्या जवळच्या नातेवाईकांकडे केलेल्या चौकशीत त्याच्या स्वभावाबाबतची माहिती पोलिसांना मिळाली. त्यावरून हे कारण या घटनेमागे असू शकते, असा पोलिसांचा अंदाज आहे. याचा अर्थ त्याचा गावात जास्त लोकांशी संपर्क नसावा. आजच्या काळात मित्र असतात. पण, ते मोबाईल व समाज माध्यमांवरच. प्रत्यक्ष संपर्क साधून मन मोकळे करण्यासाठी व मनातील दुःख, चिंता व्यक्त करण्यासाठी चांगले मित्र असणे आवश्यक आहे. पण, आजच्या काळात केवळ व्हॉट्सॲप, इंटरनेटवर चॅटिंग करणे, रील पाहून स्क्रोल करण्यापुरतेच मित्र असतात. त्यामुळे माणूस आपल्या मनातील सुख-दुःखाच्या गोष्टी कोणाकडे व्यक्त करू शकत नाही. मनातल्या मनातच त्या साठवून ठेवल्या जात असल्याने अशा घटना घडतात. आज आपल्याकडे भौतिक सुख आहे. इंटरनेट, सोशल मीडियावर भरपूर मित्र आहेत. पण, मनातील दुःख ज्याच्याकडे व्यक्त करू शकू असा माणूस आपल्याकडे नाही. माणूस आतून एकटा पडला आहे की, तो आपल्या मुलांचा जीव घेऊन स्वतः देखील आत्महत्या करण्याचा क्रूर निर्णय घेण्यापर्यंत जाऊ शकतो. केवळ संताप अनावर झाल्याने सुंदर संसार एका क्षणात मोडून टाकतो. या घटनेत पती-पत्नीच्या वादात त्या चार निष्पाप मुलांचा नाहक बळी देण्याचे काय कारण होते. त्या लहान जिवांनी तर हे जग पाहिलेही नव्हते. ज्या वयात त्यांच्या हातात खेळणे हवे होते, अभ्यासाची पुस्तके हवी होती. पण, त्यांना मिळाला हकनाक मृत्यू. ही केवळ हत्या आणि आत्महत्या नसून माणुसकीची हत्या म्हणावी लागेल. समाजात अजूनही मानसिक आरोग्याविषयी बोलण्याबाबत कमीपणा वाटतो. पुरुष महिलांप्रमाणे मनातील किंवा घरातील गोष्टींविषयी रडत बसत नाहीत. घरातील दुःख बाहेर सांगत नाहीत. लोक काय म्हणतील याचा विचार त्यांच्या मनात सतत असतो. यामुळे मनातल्यामनात कुढत, गुदमरत राहतो. त्यामुळे नैराश्य, मानसिक ताण, कौटुंबिक हिंसा, आर्थिक विवंचना यांचा स्फोट होतो आणि एक दिवस अशी घटना घडते. समाज मात्र, अशा घटनांच्या कारणांची चर्चा करण्यापेक्षा प्रेत मोजत बसतो.

आज ग्रामीण भागात शेतकऱ्यांवर पडत असलेला आर्थिक ताण, बेरोजगारी, कुटुंबातील वाढत्या अपेक्षा, प्रत्येकाला मोठे घर, पैसा, प्रतिष्ठा, चैनीचे आयुष्य हवे आहे. मात्र, वास्तव जीवनात हाती अपयश येते. त्यातून न्यूनगंड, चिडचिड, संताप आणि शेवटी हिंसा घडते. मानसिक संतुलन हरवलेला माणूस स्वतःचा आणि दुसऱ्याचाही जीव घेण्यापर्यंत क्रूर होतो. अशा घटनांतील शोकांतिका म्हणजे समाजातील संवेदनशीलता हरवत चालली आहे. काही लोक मोबाईलवर व्हिडीओ पाहतात, सोशल मीडियावर इंग्रजीत आरआयपी लिहितात आणि पुढच्या क्षणी मनोरंजनाच्या रील्स पाहू लागतात. मृत्यू हा आता दुःखाचा विषय राहिलेला नाही. तो एक कंटेंट झाला आहे. प्रश्न केवळ त्या बापाचा नाही. प्रश्न आहे त्या वातावरणाचा, ज्याने त्याला एवढा अंधार दिला. घरात सतत आर्थिक विवंचना असेल, वाद होत असतील, मानसिक आधार नसेल, सतत अपमान होत असेल तर, माणूस आतून खचतो. खचलेला माणूस विचार करीत नाही. तो फक्त प्रतिक्रिया देतो आणि त्या प्रतिक्रियेत पाच जिवांचा अंत होतो. तेव्हा, ग्रामीण भागात गरज आहे समुपदेशनाची. मानसिक आधार देण्याची. ▮

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

# हे 'झुरळं' कुरवाळताहेत!

**नागेश दाचेवार**

देशात सध्या एक विचित्र प्रकारचे राजकारण उभे करण्याचा प्रयत्न सुरू आहे. काही विरोधक आणि त्यांच्या विचारांनी प्रेरित सोशल मीडिया टोळ्यांनी मीम्स, ट्रोलिंग, उपरोध आणि डिजिटल नाट्य यांच्या आधारावर स्वतःभोवती कृत्रिम लोकप्रियतेचे वातावरण निर्माण करण्याचा उद्योग सुरू केला आहे. स्वतःला 'कॉक्रोच जनता पार्टी' म्हणवून घेणाऱ्या या डिजिटल क्रांतिकारकांनी जणू देशातील तरुणाईचे प्रतिनिधित्व आपणच करतो, असा आव आणला आहे. पण प्रत्यक्षात या प्रकाराला डिजिटल तमाशाच म्हणावा लागेल. बरे या तमाशात मोठमोठे राजकीय पक्ष आणि त्यांचे नेते देखील सामील झालेले आणि 'झुरळं' कुरवाळताना दिसतात.

आज देशातील प्रमुख विरोधी नेते मग ते राहुल गांधी असोत, शरद पवार असोत की उद्धव ठाकरे या सर्वांची राजकीय अवस्था 'बुडत्याला काठीचा आधार' अशी झाली आहे. जमिनीवर ठोस मुद्दे, कणखर नेतृत्व आणि जनतेला विश्वास देईल असा कोणताही अजेंडा उरला नसल्यामुळे, या नेत्यांना आता अशा निरर्थक 'झुरळांच्या' प्रतीकांचा आधार घ्यावा लागत आहे. विरोधकांची ही स्थिती अत्यंत केविलवाणी आहे, जिथे देश चालवण्याचे व्हिजन मांडण्याऐवजी 'झुरळ' हेच त्यांचे राजकीय अस्त्र बनले आहे. काही विरोधकांनी आणि त्यांच्याशी संबंधित प्रचारयंत्रणांनी एका वक्तव्याचा संदर्भ तोडून-मोडून मांडत त्यावर कृत्रिम वाद निर्माण केला. त्याचा राजकीय इंधन म्हणून वापर करण्यात आला. राहुल गांधी, शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी आणि इंडिया आघाडीने या विषयाला संसदेपासून सोशल मीडियापर्यंत ताणण्याचा प्रयत्न केला. लोकशाहीत टीका करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. सरकारला प्रश्न विचारलेच पाहिजेत. पण एखाद्या संवैधानिक पदावरील व्यक्तीने केलेल्या वक्तव्याचा विपर्यास करून त्याचे राजकीय भांडवल करणे, सोशल मीडिया आंदोलन उभे करणे आणि त्याला क्रांतीचे स्वरूप देणे, ही गंभीर बौद्धिक बेईमानी आहे. आणि एकप्रकारे त्या पदाचा अवमानदेखील आहे.

लोकशाहीत सशक्त विरोधकांनी उद्योग, शिक्षण, कौशल्य विकास, गुंतवणूक, स्टार्टअप्स, कृषी सुधारणा, तंत्रज्ञान शिक्षण यावर चर्चा घडवून आणली पाहिजे. सरकारला धारेवर धरले पाहिजे, कोंडीत पकडले पाहिजे. पण मुद्दे सोडून विरोधकांनी विनोदाचा बाजार मांडला आहे. राहुल गांधींच्या 'मोहब्बत की दुकान'मध्ये आता झुरळांचे लोगो विकले जाऊ लागले आहेत. काही दिवसांत लाखो फॉलोअर्स मिळाले म्हणून एखादी गोष्ट लोकशाही चळवळ ठरत नाही. सोशल मीडिया हा वास्तवाचा पूर्ण आरसा नसतो. अनेक वेळा कृत्रिम ट्रेण्ड, संघटित प्रचार, बॉट नेटवर्क्स आणि भावनिक उत्तेजना यांच्या माध्यमातून वातावरण तयार केले जाते. भारतासारख्या देशात निवडणुका इन्स्टाग्राम रील्सवर जिंकल्या जात नाहीत. त्या जमिनीवरच्या कामावर जिंकल्या जातात. गावोगावी फिरून, जनतेचे प्रश्न ऐकून, संकटात उभे राहून विश्वास निर्माण करावा लागतो. शरद पवारांसारख्या ज्येष्ठ नेत्याला किंवा उद्धव ठाकरेंसारख्या माजी मुख्यमंत्र्याला जर आपली राजकीय नौका पार करण्यासाठी या 'कॉक्रोच ब्रॅण्डिंग'ची मदत घ्यावी लागत असेल, तर त्यांच्या मूळ विचारसरणीचे आणि राजकारणाचे किती अधःपतन झाले आहे, हे स्पष्ट होते.

देशाला व्हायरल राजकारण नको, तर व्हिजन असलेले नेतृत्व हवे आहे. एका बेरोजगार तरुणाला नोकरी हवी असते, मीम नाही. एका शेतकऱ्याला पाणी हवे असते, ट्रोलिंग नाही. एका विद्यार्थ्याला दर्जेदार शिक्षण हवे असते, व्हायरल हॅशटॅग नाही. एका कामगाराला रोजगार हवा असतो, इन्स्टाग्रामवरचे नाटक नाही. हे समजून घेण्याइतकी सामाजिक जबाबदारी जर राहुल गांधी, शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील विरोधी पक्षांकडे असती, तर वास्तविक ज्वलंत मुद्यांवर चर्चा उभी केली असती. त्यांनी शेती, रोजगार आणि आरोग्य यावर ठोस कार्यक्रम मांडले असते. पण दुर्दैवाने, त्यांना जनतेच्या प्रश्नांपेक्षा झुरळाच्या आडोशाने मिळणारी राजकीय प्रसिद्धी जास्त महत्त्वाची वाटत आहे. यांनी विनोद, खिल्ली आणि ट्रोलिंगचा मार्ग निवडला. भारतात प्रत्येक दुसऱ्या दशकात काही तात्पुरत्या क्रांती निर्माण होतात. सोशल मीडिया काही दिवस एखाद्या गोष्टीला डोक्यावर घेतो आणि मग दुसऱ्या विषयाकडे वळतो. आज कॉक्रोच जनता पार्टी ट्रेंडमध्ये आहे. उद्या दुसरा मीम येईल. परवा नवीन वाद येईल. पण देश चालवण्यासाठी स्थिरता, दृष्टी, अनुभव आणि जबाबदारी लागते, जी केवळ फेसबुक लाईव्ह किंवा ट्विटर वॉरमधून मिळत नाही. राजकारण म्हणजे मनोरंजन उद्योग नाही. लोकशाही म्हणजे 'स्टॅण्डअप कॉमेडी शो' नाही. संविधान म्हणजे ट्रोलिंगचा स्क्रिप्ट नाही. या स्वतःला डिजिटल बंडखोर म्हणवणाऱ्यांचे समाजासाठी काय योगदान आहे? भारताविषयी सगळे उच्चविचार विदेशात बसूनच का सुचतात? हा गंभीर प्रश्न आहे. श्रीलंका, बांगलादेश, नेपाळसारख्या ठिकाणी 'जेन-झी'ची माथी भडकावून सत्तापालट झाल्याप्रमाणे भारतातही तसा प्रयोग करू पाहणाऱ्यांना अपयशाशिवाय काहीही हाती लागणार नाही, हे वास्तव आहे. कारण देश सुरक्षित हातात आहे.

भारतीय तरुणाईला कोणी कमी लेखू शकत नाही. पण भारतीय तरुणाईची ओळख कॉक्रोच म्हणून करू नये. भारतीय युवकाला प्रेरणा हवी आहे, आत्मदया नाही. लोकशाहीत विरोध महत्त्वाचा असतो. सरकारवर टीका होणे गरजेचे असते. पण टीकेसोबत पर्यायही द्यावा लागतो. राहुल गांधींकडे देशातील बेरोजगारी कमी करण्यासाठी काय मॉडेल आहे? शरद पवारांकडे कृषी संकटावर काय उपाय आहे? उद्धव ठाकरेंकडे पायाभूत सुविधांच्या विकासाची काय योजना आहे? की फक्त मीम्स आणि झुरळांच्या घोषणांनी हे नेते देश चालवणार आहेत? दुर्दैवाने, राहुल गांधी, शरद पवार आणि उद्धव ठाकरे या विरोधी त्रिकुटाला भारतातील प्रत्येक समस्येला राष्ट्रनिराशेच्या अजेंड्यात रूपांतरित करायचे आहे. त्यांना उपायांपेक्षा असंतोष जास्त प्रिय असतो. कारण असंतोष विकला जातो. राग व्हायरल होतो. नकारात्मकता क्लिक मिळवते आणि त्यातूनच विरोधक आपली राजकीय दुकाने चालवू पाहत आहेत.

भारतीय जनता भावनिक असली तरी भोळी नाही. ती सोशल मीडियावर हसते, मीम्स शेअर करते, ट्रेंड्स बघते पण मतदान करताना ती विकास, स्थैर्य, सुरक्षा आणि विश्वासार्हता बघते. देश चालवणे आणि ट्रेंड चालवणे यामध्ये जमीन-अस्मानाचा फरक आहे. बुडणाऱ्याला काठीचा आधार मिळावा, तसा विरोधकांना या झुरळाचा आधार मिळाला आहे. नेते, कार्यकर्ते सोडून जात असल्याने बुडत्या विरोधकांच्या हताश आधारावर उभे राहिलेले हे 'कॉक्रोच पुराण' विरोधकांच्या थट्टेचा विषय ठरत आहे. ▮

९२७०३३३८८६

### शिरपूर-पुलगाव रस्ता दुर्लक्षित

वर्धा जिल्हा, देवळी तालुक्यातील पुलगाव ते शिरपूर हा सुमारे २२ किलोमीटरचा ग्रामीण भागातील अतिमहत्त्वाचा रस्ता खराब आहे. हा रस्ता जवळपास पन्नास साठ वर्षांपूर्वी बांधण्यात आला. इतके वर्ष लोटले परंतु हा जुना पण अतिमहत्त्वाचा ग्रामीण रस्ता वाहतुकीकरिता अजूनही योग्य नाही. हा रस्ता बांधकाम विभागातर्फे किंवा आतापर्यंतच्या कित्येक लोकप्रतिनिधींकडूनही दुरुस्तीबाबत दुर्लक्षित होत राहिला. वर्धा जिल्ह्यातील रेल्वेलाईन, सीएडी कॅम्पचे पुलगाव हे मुख्य शहर व नागपूर ते यवतमाळ राज्य महामार्गाला जोडणारा हा मुख्य ग्रामीण एकेरी रस्ता आहे. या रस्त्यावर नाचणगाव, इंझाळा, राघाळा, सावंगी विजयगोपाल, तांभा, रोहणी, तीर्थक्षेत्र श्री कोटेश्वर देवस्थान, उत्तर वाहिनी पवित्र वर्धानदी क्षेत्र इत्यादी महत्त्वाची गावे वा स्थानके आहेत. ग्रामीण भागातून शहरातील शाळेत, महाविद्यालयात जाण्यासाठी विद्यार्थी व शिक्षकांना तसेच शेतकऱ्यांना तालुका, जिल्ह्यात शासकीय कार्यालयात, बाजारपेठेत जाण्यासाठी हा एकमेव महत्त्वाचा रस्ता आहे. रस्ता अतिशय खराब असून, जागोजागी खड्डे असल्याने या मार्गावर राज्य परिवहन महामंडळाची बस सुद्धा कमी धावते. एसटीच्या कमी शेड्युलमुळे प्रवाशांना चार ते पाच तासांची प्रतीक्षा करावी लागते. याच नादुरुस्त रस्त्यावरून काही ग्रामीण जनता आपल्या खाजगी मोटारकार, मोटारसायकल, सायकल, बैलगाडी इत्यादी वाहनाने त्रास भोगत नाईलाजाने प्रवास करतात. ग्रामीण जनक्षोभ टाळण्यासाठी शासनाच्या संबंधित बांधकाम विभागाने वर्धा जिल्ह्यातील देवळी तहसीलमधील या २२ किलोमीटर प्रमुख दुर्लक्षित रस्त्याचे किमान दोन पदरी व पक्क्या सिमेंट रोडचे त्वरित बांधकाम सुरू करावे, ही विनंती.

**किशोर पोहेकर**/नागपूर

### 'अंदमान एक तीर्थक्षेत्र' त्रिदिवसीय महोत्सव

सध्या नागपुरातील लक्ष्मी नगर येथील व्हॉलिबॉल ग्राऊंडवर 'अंदमान एक तीर्थक्षेत्र' हा त्रिदिवसीय महोत्सव सुरू आहे. हा महोत्सव म्हणजे नागपूरकरांसाठी पर्वणीच ठरला आहे. श्री सिद्धिविनायक ट्रस्टचे अध्यक्ष तथा माजी महापौर संदीप जोशी यांच्या संकल्पनेतून साकारलेला हा महोत्सव एक आकर्षण ठरला आहे. यात सेल्युलर जेलचा लाईट ॲण्ड साऊंड शो हे एक मुख्य आकर्षण ठरले आहे. स्थापत्य अभियंता प्रफुल्ल माटेगावकर यांनी सेल्युलर जेलची हुबेहूब प्रतिकृती तयार केली असून त्याचा शो हे उपस्थितांचे लक्ष वेधून घेते आहे. त्यासाठी त्यांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी भरपूर परिश्रम घेतले आहेत. त्यांचे अभिनंदन. त्यामुळे सध्या उष्णता उच्च बिंदूवर असून देखील प्रेक्षक प्रचंड गर्दी करीत आहेत. तसेच या तीन दिवसांत सावरकरांच्या जीवनावर, मूल्यांवर विचार प्रणालीवर आधारित उत्कृष्ट अशा व्याख्यात्यांचे व्याख्यान आयोजन केले आहे. हे प्रमुख आकर्षण आहे. याचा लाभ अधिकाधिक प्रेक्षकांनी आणि तरुणांनी घ्यावा. असा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल माजी महापौरांचे आभार.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

## वाचक पत्रे

### ऑनलाईन तपासण्यांचा वाईट अनुभव

आजकाल रक्त आणि लघवीची तपासणी ऑनलाईन करणे शक्य झाले आहे. चाचण्या बुक करण्यासाठी अनेक कंपन्यांच्या वेबसाईट आणि आणि ॲप उपलब्ध आहेत. तपासणी ऑनलाईन बुक केल्यानंतर तंत्रज्ञ घरी येऊन रक्त/लघवीचे नमुने घेतात. तपासण्यांचे अहवाल मोबाईलवर पाठवले जातात. चाचण्यांचे अनेक पॅकेजेस पण उपलब्ध केलेले आहेत. माझ्या नातेवाईकाची लघवी तपासण्यासाठी पुण्याला ऑनलाईन बुकिंग करण्यात आले. तंत्रज्ञ घरी येऊन लघवीचा नमुना घेणार होता. मूत्रमार्गाच्या प्रादुर्भावासाठी करण्यात येणारी रुटीन आणि कल्चरची तपासणी करायची होती. तंत्रज्ञ घरी आल्यानंतर त्याने दिलेल्या प्लास्टिकच्या डबीत लघवी देण्यात आली. सोबत घरातल्या दुसऱ्या व्यक्तीची रक्त तपासणी पण करण्यात आली. दोघांच्या तपासणीची पूर्ण फी ऑनलाईन भरल्यानंतर तंत्रज्ञ निघून गेला. लघवीच्या रुटीन तपासणीला काही तास आणि कल्चरच्या तपासणीला दोन दिवस लागतात. लघवीच्या रुटीन टेस्टचा रिपोर्ट दोन दिवसांनी आणि कल्चरचा रिपोर्ट तब्बल पाच दिवसांनी प्राप्त झाला. रक्त तपासणीचा रिपोर्ट देण्यात आला नाही कारण रक्ताचा नमुना खराब झाला होता. लघवीच्या रिपोर्टला विलंब आणि रक्ताचा नमुना खराब होण्याचे कारण काय? जमा केल्यानंतर दोन दिवसांनी लघवीचा नमुना तपासल्यास अहवाल बरोबर येईल का? अनेकदा एकाचा अहवाल दुसऱ्याला देण्याच्या घटना पण घडलेल्या आहेत. रुग्णांच्या विश्वासाला तडा जाईल असे काम करणे योग्य आहे का? ज्या अहवालांच्या भरवशावर रुग्णाच्या रोगाचे निदान आणि उपचार करायचा असतो ते लवकरात लवकर मिळणे आणि विश्वासार्ह असणे आवश्यकच आहे. ▮

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# सोलापुरातील ४९५ आशा स्वयंसेविकांना दिलासा

- चार महिन्यांचे ८६ लाख ६४ हजार रुपये इतके मानधन खात्यावर जमा
- महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ मे-**

सोलापूर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत असलेल्या ४९५ आशा स्वयंसेविकांच्या डिसेंबर २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीतील ८६ लाख ६४ हजार १७० रुपये इतके मानधन आज थेट खात्यावर जमा करण्यात आले आहे. तसेच एप्रिल महिन्याचे १७ लाख ७१ हजार ८९७ रुपये मानधन सोमवारपर्यंत जमा होणार आहे. सर्व मिळून १ कोटी ४ लाख ६३ हजार ६७ रुपये इतके अनुदान आशा स्वयंसेविकांच्या खात्यात जमा होणार असल्याची माहिती म हापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांनी दिली.



महापालिका प्रशासनाकडून आशा वर्कर्स यांनी केलेल्या विविध आरोग्यविषयक कामांचा तपशील नियमितपणे शासनाकडे पाठविला जातो. शासनाकडून मंजुरीनंतर संबंधित कामांचे मानधन थेट आशा वर्कर्सच्या बँक खात्यावर आरबीआयमार्फत जमा केले जाते. सोलापूर महापालिका आरोग्य प्रशासनाने यासंदर्भात आवश्यक ती सर्व कार्यवाही केली आहे. सोलापूर महानगरपालिका अंतर्गत ४९५ आशा स्वयंसेविका कार्यरत आहेत. त्यांचे डिसेंबर २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीतील ८६ लाख ६४ हजार १७० रुपये इतके मानधन आज थेट खात्यावर जमा करण्यात आले आहे. तसेच एप्रिल महिन्याचे १७ लाख ७१ हजार ८९७ रुपये मानधन सोमवारपर्यंत जमा होणार आहे. अशाप्रकारे सर्व मिळून १ कोटी ४ लाख ६३ हजार ६७ रुपये इतके अनुदान आशा स्वयंसेविकांच्या खात्यात जमा केले जात आहे.

महानगरपालिकेच्या आरोग्य व्यवस्थेचा महत्त्वाचा घटक असलेल्या आशा स्वयंसेविका माता-बाल आरोग्य, लसीकरण, जनजागृती, सर्वेक्षण तसेच विविध आरोग्य योजनांच्या अंमलबजावणीत महत्त्वाची भूमिका बजावत असतात. त्यामुळे मानधन जमा झाल्याने आशा स्वयंसेविकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त चोंडी येथे भव्य राज्यस्तरीय सभा

**टेंभुर्णी, दि. २९ मे-**

मौर्य क्रांती संघ, भारत मुक्ती मोर्चा, राष्ट्रीय मूलनिवासी महिला संघ तसेच राष्ट्रीय घुमंतू जनजाती मोर्चा यांच्या संयुक्त विद्यमाने राजमाता अहिल्यामाई होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त रविवार ३१ मे रोजी चोंडी, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर येथे राज्यस्तरीय अभिवादन सभा आहे. माढा लोकसभा मतदारसंघातूनही कार्यकर्ते जाणार असल्याची माहिती बहुजन मुक्ती पार्टीचे महेंद्र सोनवणे यांनी सांगितले.

उद्घाटक अविनाश शिंदे (राजमाता अहिल्यामाई होळकर यांच्या वडिलांचे वंशज) आहेत. इतिहास संशोधक हरी कोळेकर, नवनाथ कसपटे, बहुजन मुक्ती पार्टीचे प्रदेशाध्यक्ष प्रताप पाटील, चंद्रशेन लाहाडे, बन्सीलाल भागवत तसेच तुळशीराम सुभेदार यांची प्रमुख उपस्थिती आहे. अध्यक्षस्थानी भारत मुक्ती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष वामन मेश्राम राहणार आहेत.


## Sangola Taluka Uchcha Shikshan Mandal
## SANGOLA MAHAVIDYALAYA, SANGOLA
Kadlas Road, Tal. Sangola Dist. Solapur (M.S.) Pin.413307

**NON-AIDED**
(Permanently Non-Grant Posts)
(Affiliated to Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur)

### Walk In Interview

Applications are invited for the following Full-Time C.H.B. Posts for the Academic Year: 2026-27

Walk in Interviews are to be conducted for filling up following posts on Permanently Non-Grant basis for the Academic Year 2026-27 in Sangola Mahavidyalaya, Sangola, on Tuesday Dt. 09/06/2026 at 10.30 a.m. for Teaching Staff.

| Sr. No. | Course | Subject | Designation | Total No. of Full Time/ C.H.B. Posts |
|---|---|---|---|---|
| 01 | B.Sc. (E.C.S.) | Computer Science | Assistant Professor | 28 |
| | | Electronics | Assistant Professor | 01 |
| | | Statistics | Assistant Professor | 02 |
| | | Mathematics | Assistant Professor | 01 |
| | | English | Assistant Professor | 01 |
| 02 | B.Sc. (C.S) & (Data Sci.) | Computer Science | Assistant Professor | 04 |
| 03 | B.C.A. | Computer Science | Assistant Professor | 16 |
| | | Statistics | Assistant Professor | 01 |
| | | Mathematics | Assistant Professor | 01 |
| | | English | Assistant Professor | 01 |
| 04 | M.Sc. (C.S.) | Computer Science | Assistant Professor | 06 |
| 05 | M.Sc. (A.I.&M.L) | Computer Science | Assistant Professor | 02 |
| 06 | M.C.A. | Computer Science | Assistant Professor | 05 |

1) The above Posts are open to all however candidates from any category can apply for the post.
2) All the above posts are purely on Temporary Clock Hour Basis for Academic Year 2026-27 & subject to workload approval of Jt. Director of Education, H.E. Solapur Region, Solapur for Senior College section.
3) Educational qualification and other requirements are as prescribed by the UGC Notification dated 18th July, 2018, Govt. of Maharashtra Resolution No. Misc-2018/C.R.56/18 UNI-1 dt. 8th March, 2019 and University Circular No. PAHSUS/Estt/7th pay/2019/2285/dtd. 25th March, 2019.
4) Remuneration of the above posts will be as per the Govt. Resolution No. संकिर्ण- २०१८/(१८५/१८)/मशि-३, dated 14th November, 2018, University Circular No. सोविसो/शि.मा./परिपत्रक/२०१८-१९/१०९४९/dated 24th December, 2018 and Govt. Resulation No. संकिर्ण- २०२१/प्र.क्र.१८१/२१/विशि-१ dated 17th October 2022.
5) Applications with full details should reach to the Principal, Sangola Mahavidyalaya, Sangola within 8 days from the date of publication of this advertisement. Incomplete applications will not be entertained.
6) This is University approved advertisement.
7) T.A./D.A. will not be paid for attending the interview.

Date: 30/05/2026

(Dr.S.R.Bhosale)
I/c.Principal
Sangola Mahavidyalaya, Sangola
Tal. Sangola Dist. Solapur.

(Mr.S.G.Dhekale) Jt.Secretary | (Mr.B.R.Gaikwad) Chairman
Sangola Taluka Uchcha Shikshan Mandal, Sangola


# वहिदाबानो शेख यांचे नगरसेवकपद रद्द करण्याची निवेदनाद्वारे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मे-**

समाज मंदिराच्या गैरवापरासह अधिकारांचा दुरुपयोग केल्याचा आरोप करत याप्रकरणी चौकशी करून एमआयएमच्या नगरसेविका वहिदाबानो शेख यांचे नगरसेवकपद रद्द करण्याची मागणी याकुब शेख यांनी म हापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, प्रभाग क्र. १४ मधील सिद्धेश्वर पेठेतील किडवाई चौक परिसरातील महापालिकेच्या म ालकीचे समाज मंदिर अनेक वर्षांपूर्वी कोणतीही कायदेशीर मंजुरी न घेता 'भारतीय महिला विकास मंच मंडळ' या खाजगी संस्थेकडे वर्ग करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संस्थेत संबंधित नगरसेविका व त्यांच्या सख्ख्या बहिणीचा पदाधिकारी म्हणून सहभाग असल्याचेही निवेदनात नमूद केले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १० नुसार, महापालिकेच्या मालमत्ता अथवा करारांमध्ये लोकप्रतिनिधीचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष आर्थिक हितसंबंध असल्यास अपात्रतेची तरतूद आहे. स्वतःशी संबंधित संस्थेला महापालिकेची मालम त्ता देणे ही बाब बेकायदेशीर असल्याचा आरोप केला आहे.

२०२६ च्या निवडणूक अर्जात समाज मंदिरासंदर्भातील माहिती लपविल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणामुळे स्थानिक नागरिकांना समाज मंदिराच्या वापरापासून वंचित राहावे लागत आहे. सम ाज मंदिराचा ताबा तातडीने परत घेऊन संबंधित प्रकरणाची चौकशी करावी व नगरसेविकेवर अपात्रतेची कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# सीना नदीपात्र पडले कोरडे

## जनावरांच्या चारा पाण्याची समस्या; पिके करपू लागली

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर ,दि. २९ मे-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील अकोले (मं) पासून हत्तरसंग कुडलपर्यंत असणाऱ्या सीना नदीपात्रात पाणी नसल्यामुळे नदीपात्र कोरडे पडले आहे, परिणामी जनावरांच्या चारा पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. ऊस, केळी, द्राक्ष, कलिंगड, पपई व इतर फळ पिके उन्हाच्या तीव्रतेमुळे व पाण्याअभावी करपू लागली आहेत. त्यामुळे सीना नदीत पाणी सोडण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे .

यावर्षी अतिवृष्टीमुळे सीना नदीला महापूर आला होता. त्याम ुळे सीना नदी पात्राच्या चार ते पाच किलोमीटर परिसरात नदीचे पाणी शिरल्याने पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. एप्रिल महिन्यापर्यंत सीना नदीपात्रात पावसाचे पाणी होते. मात्र एप्रिलअखेर नंतर मे महिन्यात सीना नदीमध्ये उजनी धरणाचे पाणी न सोडल्यामुळे नदीपात्र कोरडी पडली आहे. त्यामुळे परिसरातील हजारो हेक्टर क्षेत्रावरील ऊस करपू लागला आहे. सहा ते आठ महिने उसाला पाणी देऊन उन्हाळ्यात नदीला पाणी नसल्यामुळे ऊस करपू लागल्याने शेतकरी हवालदिल बनला आहे. शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी होत आहे. याबरोबर केळी, द्राक्ष ,पपई ,कलिंगड व लिंबू यासह अनेक फळपिके ऊन्हाच्या तीव्रतेमुळे व पाणी नसल्यामुळे जळून चालली आहेत. त्यामुळे सीना नदी पात्रात त्वरित पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.



### सीना नदीत उजनीचे पाणी सोडावे

दोन महिन्यापासून सीना नदीत पाणी नसल्यामुळे नदीपात्र कोरडी पडली आहे. त्यामुळे परिसरातील हजारो शेतकऱ्यांचे ऊस वाळून चालला आहे. आठ दिवसात ऊसाला पाणी न सोडल्यास संपूर्ण ऊस जळून जाण्याची शक्यता आहे. यामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक भुर्दंड बसण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून उजनी धरणाचे पाणी सीना नदीत सोडण्यात यावे.

**- सुधाकर बिराजदार पाटील, शेतकरी, वडकबाळ, दक्षिण सोलापूर**

# ट्रॅव्हल बसवर पाठीमागून ट्रक आदळल्याने दोघे जखमी; ट्रक चालकावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा, दि. २९ मे-**

मंगळवेढा-सोलापूर या राष्ट्रीय महामार्गावर कारखाना पाटीच्या पुढे २ कि.मी.अंतरावर ट्रॅव्हल बसवर पाठीमागून आलेला ट्रक आदळल्याने तिहेरी अपघात होवून दोघेजण जखमी झाले. या प्रकरणी ट्रक चालकाविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी प्रविण भास्कर साठे (रा.बिबीदारफळ) हे दि.२६ मे रोजी रात्री १.२५ वाजता सोलापूर ते मंगळवेढा या राष्ट्रीय महामार्गावरुन जात असताना कारखानापासून २ कि.मी.अंतरावर ट्रकचालकाने ट्रॅव्हल्सला पाठीमागून जोराची धडक देवून त्यामध्ये बसलेले पॅसेंजर संकेत आरगे (रा.हातकणंगले),हर्षवर्धन पाटील (रा. हातकणंगले) या दोघांना गंभीर जखमी केले. तो स्वत:ही किरकोळ जखमी होवून दोन्ही वाहनाचे नुकसान झाले असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.


## IDFC FIRST Bank Limited
(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

### सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३ (२) अन्वये नोटीस

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेड** सोबती विलीन झाली असून सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडून खाली नमूद केलेले तारण कर्ज घेतले होते. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्ता गहाण (तारण) ठेवून सुरक्षित करण्यात आली आहेत. संबंधित कर्ज कराराच्या अटी व शर्तींचे पालन करण्यास ते अपयशी ठरल्यामुळे आणि त्यांच्या खात्यातील व्यवहार अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे त्यांची कर्ज खाती 'एनपीए' म्हणून वर्गीकृत करण्यात आली आहेत. त्यांच्याकडून **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेड** सोबती विलीन झाली असून सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) देय असलेली रक्कम खालील तक्त्यामध्ये सविस्तरपणे वर्णन केलेल्या संबंधित जारी नोटिसींनुसार नमूद करण्यात आली आहे, आणि सदर रकमांवर पुढील व्याज देखील लागू होईल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या दरानुसार आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) नोटीस दिनांक | कलम १३ (२) नोटिसीसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 145440435 | मालमत्तेवर कर्ज | १. आशाबाई पांडूरंग शेळके<br>२. ऋषिकांत पांडूरंग शेळके | 14/03/2026 | INR 8,53,288.20/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिळकत नं. ९८६ चा तो सर्व तुकडा आणि भाग, एकूण क्षेत्रफळ ४३५० चौ. फूट, गाव : तिसंगी, ग्रामपंचायत हद्द : तिसंगी, तालुका : पंढरपूर, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र - ४१३३०४ येथे स्थित असून चतु:सीमा खालीलप्रमाणे: पूर्व : रस्ता, पश्चिम: नवनाथ इंगळे, उत्तर : रस्ता, दक्षिण : सुमन गंगाधरे

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) नोटीस दिनांक | कलम १३ (२) नोटिसीसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 122415707 | गृहकर्ज | १. मोहन मारुती कोळेकर<br>२. लक्ष्मी मोहन कोळेकर | 18/02/2026 | INR 15,80,095.77/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिळकत नं. ११९३/३ चा तो सर्व तुकडा आणि भाग, एकूण क्षेत्रफळ १४८.६४ चौ. मीटर, महुद बुद्रुक येथे स्थित, ग्रामपंचायत महुद बुद्रुकच्या हद्दीत, तालुका: सांगोला, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र - ४१३३०६ आणि चतु:सीमा खालीलप्रमाणे: पूर्व : रस्ता, उत्तर : सीताराम कोळेकर यांची मालमत्ता, पश्चिम: मालमत्ता नं. २५६, दक्षिण: काशिलिंग कोळेकर यांची मालमत्ता.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) नोटीस दिनांक | कलम १३ (२) नोटिसीसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 3 | 126708508 | मालमत्तेवर कर्ज | १. राजेंद्र गोरख कारंडे<br>२. विजय राजेंद्र कारंडे<br>३. गोरखनाथ ज्ञानोबा कारंडे | 14/03/2026 | INR 9,51,663.21/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिळकत नं. ९२७ चा तो सर्व तुकडा आणि भाग, एकूण क्षेत्रफळ २७३९ चौ. फूट, गाव : बलवडी, ग्रामपंचायत हद्द : बलवडी, तालुका : सांगोला, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र - ४१३३०८ येथे स्थित असून चतु:सीमा खालीलप्रमाणे : पूर्व : विश्वनाथ ज्ञानोबा कारंडे, पश्चिम : दुर्योधन गायकवाड, उत्तर : स्वतः, दक्षिण : रस्ता.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) नोटीस दिनांक | कलम १३ (२) नोटिसीसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 4 | 162370913 | मालमत्तेवर कर्ज | १. योगेश नागनाथ शिंदे<br>२. सिंधुबाई नागनाथ शिंदे | 14/03/2026 | INR 9,78,101.35/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिळकत नं. ५१४ चा तो सर्व तुकडा आणि भाग, एकूण क्षेत्रफळ २३१० चौ. फूट (बांधकाम क्षेत्र ९९० चौ. फूट आणि मोकळी जागा १३२० चौ. फूट), गाव: रांजनी, ग्रामपंचायत रांजनीच्या हद्दीत, तालुका : पंढरपूर, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र - ४१३३०४ येथे स्थित असून चतु:सीमा खालीलप्रमाणे: पूर्व: शशिकांत मच्छिंद्र कदम, पश्चिम : सावकार श्रीमंत शिंदे, उत्तर : रस्ता, दक्षिण : समाधान शिंदे.

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत, वरील तक्तयात दर्शविलेल्या तपशिलानुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेड** सोबती विलीन झाली असून सध्या **आयडीएफर्सी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) त्यांच्या संबंधित तारखेपासून कंत्राटी व्याजाच्या दरासह आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींसह रक्कम भरण्यासाठी तुम्हाला याद्वारे आवाहन करण्यात येत आहे. तसे न केल्यास, थकबाकी वसुलीसाठी वरील तारण ठेवलेल्या मालमत्तांच्या विरुद्ध सरफेसी कायद्याच्या कलम १३ (४) आणि कलम १४ अन्वये पुढील कायदेशीर कारवाई सुरू करण्यास बँक बांधील राहील. तसेच, सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अन्वये तुम्हाला या सुरक्षित मालमत्तांची विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करण्यास प्रतिबंधित करण्यात येत आहे.

**स्वाक्षरी/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, ज्याचे आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीनीकरण झाले असून सध्या ते आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाते)**

**दिनांक : 30/05/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**



### जाहिर नोटीस

सोलापूर येथील तमाम लोकास या जाहिर नोटीस कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन**:- डि व सब डि सोलापूर पैकी सोलापूर, ता. उत्तर सोलापूर पैकी, सोलापूर शहर महानगरपालिकेच्या हद्दवाढीतील मजरेवाडी येथील जुना सर्व्हे नं. २७८/१+२+३, २७९/१+२ पै यासी नवीन सर्व्हे नं. १५०/१+२+३, १५१/१+२ यामधील प्लॉट नं. १८ व १९ यावर बांधण्यात आलेल्या नवोदय पार्क मधील दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नं. १८ याचे क्षेत्र ५२.४८ चौ.मी. इतके असून येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत त्यातील तदंगभूत वस्तू व कब्जेवहिवाटीचे हक्कासह.

सदर मिळकत ही मी संजयकुमार सिध्दू चाबुकस्वार यांचेकडून खरेदी केलेले आहे. संजयकुमार सिध्दू चाबुकस्वार यांनी खरेदी केलेले खरेदीखत दस्त क्र. ६३३/२००२ अन्वये सह दुय्यम निबंधक वर्ग-२, सोलापूर उत्तर-२ यांचे कार्यालयात दि. १५/०२/२००२ रोजी खरेदी केलेले आहे. सदरचे मूळ खरेदीखत, मूळ पावती, मूळ सूची क्र.२ ही कागदपत्रे दि. ०१/०५/२०२६ रोजी माझ्याकडून विजापूर रोडवरुन येत असताना सकाळी वेळ ११ ते १२.३० वा. गहाळ झालेले आहेत. त्याबाबत आमचे अशिलांनी विजापूर नाका, पोलिस स्टेशन येथे अर्ज दिले होते व त्या अनुषंगाने विजापूर नाका पोलीस स्टेशन, सोलापूर यांचेकडून दि. २७/०५/२०२५ रोजी गहाळ रजि. नं.०२९९/२०२६ अन्वये नोंद झालेली आहे. सदर कागदपत्रे कोणासही सापडल्यास त्यांनी ८ दिवसांत खालील नमुद पत्यावर संपर्क साधून सदर दस्त देण्याचे करावे म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे. हि जाहीर नोटीस दिली तारीख - २९/०५/२०२६.

शिक्का

सही/-
**ॲड. शिवानंद व्ही. गंजी**
**(ॲडव्होकेट ॲण्ड नोटरी, भारत सरकार)**
**पत्ता. ११०२ अ, भावनाऋषी पेठ, मितांशु हॉस्पिटल जवळ, अशोक चौक, सोलापूर.**
**मो.नं. ९९७५४६७५५०**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**अशिल - चंद्रशेखर सिद्रामप्पा येरनाळे**



### सावधानतेची जाहीर नोटीस

म्हैसलगी, ता. अक्कलकोट व खानापूर ता. अक्कलकोट परिसरातील व जिल्ह्यातील तसेच समस्त लोकांना आम्ही खालील सह्या करणारे लोक सावधानतेची जाहीर नोटीस देतो.

श्री बलभीम शिक्षण प्रसारक मंडळ, म्हैसळगी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर नोंदणी क्र. एफ-१३०१/ सोलापूर या संस्थेद्वारे कन्नड माध्यमाचे प्राथमिक विद्यालय, म्हैसलगी व श्री प्रभुलिंग कन्नड विद्यालय, खानापूर हे प्राथमिक विद्यालय, खानापूर ता. अक्कलकोट येथे चालवले जाते. सदरील संस्थेमध्ये सहशिक्षक तसेच सहशिक्षिका (शिक्षण सेवक) अशा ५ जागा भरणेबाबत बेकायदेशीर व बोगस जाहीर प्रगटन दि. २४/०५/२०२६ च्या दैनिक दिव्य मराठी या वृत्तपत्रा मध्ये प्रकाशित करण्यात आलेले आहे व दि. ०५/०६/२०२६ रोजी शाळेमध्ये मुलाखतीसाठी इच्छुकांना बोलवण्यात आलेले आहे.

सदरील संस्थे मध्ये वाद चालू असून आम्ही खालील नावासमोर सध्या संस्थेच्या रेकॉर्डवर व परिशिष्ट -१ वर असलेले पदाधिकारी खालील प्रमाणे सूचित करत आहोत.

१) श्री. महादेव रामगोंडा बरूर - सध्या परिशिष्ट -१ वरील कार्यकारिणी सदस्य रा.मु.पो. तडवळ, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर मो. नं. ९४२३३९६७५६
२) श्री. मल्लय्या पंचय्या स्वामी - सध्या परिशिष्ट -१ अन्वये रेकॉर्डवरील उपाध्यक्ष रा.मु.पो. तडवळ, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर मो. नं. ९०२१४७६३११
३) श्री. शिवानंद धुंडप्पा कोळी - सध्या परिशिष्ट -१ व रेकॉर्डवरील खजिनदार रा.मु.पो. मुंढेवाडी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर मो. नं. ८९९९७६००९९

सदरील संस्थेमध्ये वाद चालू असून मे. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर व धर्मादाय सहआयुक्त, पुणे येथे सदरील संस्थेच्या बदल अर्जासंबंधी प्रकरणे प्रलंबित आहेत. असे असताना सुद्धा संस्थेचे सचिव व मुख्याध्यापक यांनी इतर कार्यकारी मंडळातील सदस्यांना कसलीच सूचना न देता व ठराव न घेता वरीलप्रमाणे जागा भरणेसाठी बेकायदेशीर नोटीस स्वतःच्या आर्थिक लाभासाठी प्रकाशित केलेली आहे.

सदरील फसव्या व बेकायदेशीर नोटीशीस बळी न पडता इच्छुक लोकांनी सदरील बेकायदेशीर व बोगस मुलाखतीस हजर राहू नये व आर्थिक व मानसिक नुकसान करून घेऊ नये असे तमाम इच्छुक लोकांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते.

दिनांक : २७/०५/२०२६.

शिक्का

**सही/-**
**सावधानतेची जाहीर नोटीस देणार**
**१) श्री. महादेव रामगोंडा बरूर - कार्यकारिणी सदस्य**
**२) श्री. मल्लय्या पंचय्या स्वामी - उपाध्यक्ष (स्वाक्षरी)**
**३) श्री. शिवानंद धुंडप्पा कोळी - खजिनदार**



## जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर
**मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, ई ब्लॉक, पहिला मजला,**
**जुना जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर-४१३००१**
**दुरध्वनी क्र. ०२१७-२६२९७४९** Email- d/dr_spr@rediffmail.com

**जा.क्र. कक्ष४/पत/अपसेट/सुनावणी/१८२५/२०२६** **दिनांकः २९/०५/२०२६**

### जाहीर अंतिम सुनावणी नोटीस

प्रति,
१. **मालमत्ताधारक : श्री भाऊसाहेब जगन्नाथ कोल्हाळ,** रा.मु.पो. एकुरके, ता. मोहोळ, जि. सोलापूर.
२. **मालमत्ताधारक : श्री गोवर्धन दिगंबर कोल्हाळ,** रा.मु.पो. एकुरके, ता. मोहोळ, जि. सोलापूर.
३. **मालमत्ताधारक : श्री पंडीत सुर्यभान ढवण,** रा.मु.पो. एकुरके, ता. मोहोळ, जि. सोलापूर.
४. **मालमत्ताधारक : श्री लक्ष्मण तुकाराम खोचरे,** रा.मु.पो. भोयरे, ता. मोहोळ, जि. सोलापूर.
५. **मालमत्ताधारक : श्री संभाजी प्रल्हाद मोटे,** रा.मु.पो. नरखेडख, ता. मोहोळ, जि. सोलापूर.
६. **मालमत्ताधारक : श्री युवरात संदिपान हरडाडे,** रा.मु.पो. खैराव ता. माढा, जि. सोलापूर.
७. **मालमत्ताधारक : श्री सीताराम भिमराव गायकवाड,** रा.मु.पो. मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर.
८. **मालमत्ताधारक : श्री धनाजी भिमराव गायकवाड,** रा.मु.पो. मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर.
९. **मालमत्ताधारक : श्री अमरजीत औदुंबर यादव,** रा.मु.पो. मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर

**विषय : स्थावर मालमत्तेची वाजवी किंमत मंजूर होऊन मिळणेबाबत.**
**संदर्भ : व्यवस्थापक/वसुली अधिकारी, सद्‌गुरु ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर यांचे विषयांकीत प्रस्ताव.**

उपरोक्त संदर्भिय विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे. उक्त विषयास अनुसरुन व्यवस्थापक/वसुली अधिकारी, सद्‌गुरु ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर यांनी संदर्भिय प्रस्तावान्वये संस्थेचे कर्जदार यांनी घेतलेली कर्ज थकीत झाल्याने खालील मालमत्तेचे वाजवी मुल्यांकन मंजूर होऊन मिळणेबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे.

| अ.क्र. | मिळकतदाराचे नांव | मिळकत तपशील व ठिकाण |
|---|---|---|
| १ | श्री. भाऊसाहेब जगन्नाथ कोल्हाळ | मौजे बोपले, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथील गट क्र. १८८/३ क्षेत्र ५.२९ हे. आर व पो.ख. ०.१९ हे. आर पैकी १.८२.६६ हे. आर चौ.मी. |
| २ | श्री. गोवर्धन दिगंबर कोल्हाळ | मौजे बोपले, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथील गट क्र. १७३/१/क क्षेत्र १.९० हे. आर |
| ३ | श्री. पंडीत सुर्यभान ढवण | मौजे बोपले, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथील गट क्र. २३३ क्षेत्र १.६२ हे. आर |
| ४ | श्री. लक्ष्मण तुकाराम खोचरे | मौजे भोयरे, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथील गट क्र. १०० क्षेत्र १.०९ हे. आर |
| ५ | श्री. संभाजी प्रल्हाद मोटे | मौजे नरखेड, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथील गट क्र. ६८४/१ क्षेत्र १.२१ हे. आर व पो.ख. ०.०१ हे. आर |
| ६ | श्री. युवरात संदिपान हरदाडे | मौजे खैराव, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथील गट क्र. ९१/१ क्षेत्र १.२० हे. आर |
| ७ | श्री. सीताराम भिमराव गायकवाड | मौजे मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथील गट क्र. २२६/१/ड क्षेत्र ०.२९ हे. आर व पो.ख. ०.०४ हे. आर |
| ८ | श्री धनाजी भिमराव गायकवाड | मौजे मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथील गट क्र. २३१/२/अ क्षेत्र ०.३६ हे. आर व पो.ख. ०.०५ हे. आर |
| ९ | श्री. अमरजीत औदुंबर यादव | मौजे मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथील गट क्र. ८१ क्षेत्र १.२१ हे. आर |

सदर प्रस्तावास अनुसरुन या कार्यालयात दि. ०६/०४/२०२६, २०/०४/२०२६, ११/०५/२०२६ व २९/०५/२०२५ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. परंतु सदर सुनावणीस आपण गैरहजर होते.

सबब आपणास कळविण्यात येते की सदर बाबत या कार्यालयात दि. १९/०६/२०२६ रोजी दु. २.०० वाजता सुनावणी ठेवण्यात आली आहे. सदर सुनावणीवेळी आपण आपले म्हणणे सादर करणेसाठी उपस्थित रहावे. सुनावणीवेळी आपण गैरहजर राहिल्यास याबाबत अपले काही म्हणणे नाही असे गृहित धरुत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**सही/-**
**जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, सोलापूर**






## महत्त्वाचे

### विनेशला सर्वोच्च दिलासा कुस्ती महासंघाला धक्का

**नवी दिल्ली** : कुस्तीपटू विनेश फोगाटला सर्वोच्च न्यायालयाने २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेच्या निवड चाचणीत



सहभागी होण्यास परवानगी दिली आहे. विनेशला चाचणीत भाग घेण्याची परवानगी देणाऱ्या दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशाला भारतीय कुस्ती महासंघाने (डब्ल्यूएफआय) सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे कुस्ती महासंघाला मोठा धक्का बसला आहे. सर्वोच्च न्यायालयाने विनेश फोगाटला तात्पुरता दिलासा दिला असला, तरी तिच्या सहभागाला आव्हान देणाऱ्या डब्ल्यूएफआयच्या याचिकेवर तिचे उत्तरही मागवले आहे. उच्च न्यायालयाच्या निर्णयाला डब्ल्यूएफआयने दिले होते आव्हान दिले होते. डब्ल्यूएफआयने सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा आणि न्यायमूर्ती आलोक अराधे यांच्या खंडपीठासमोर विशेष अनुमती याचिका दाखल केली होती. तीन वेळची ऑलिम्पियन असलेल्या विनेश फोगाटने कुस्ती महासंघाच्या अधिकृत धोरणातील पात्रतेचे निकष पूर्ण केले नसतानाही, तिला चाचणीत उतरू देण्याच्या उच्च न्यायालयाच्या निर्णयाला या याचिकेत आव्हान देण्यात आले होते. ■

### बनावट फिफा विश्वचषक जर्सीमुळे विक्रेत्यांना फटका

**ब्यूनस आयर्स** : अर्जेंटिनाच्या विश्वचषक उत्साहामुळे बनावट जर्सी आणि ट्रेडिंग कार्ड्सच्या विक्रीत मोठी वाढ झाली आहे, त्यामुळे महागाई आणि वाढत्या स्वस्त आयातीमुळे आधीच संघर्ष करत असलेल्या वस्त्रोद्योग व्यवसायांवरील दबाव आणखी वाढला आहे. गतविजेत्यांचा देश असलेल्या अर्जेंटिनामध्ये विश्वचषकाच्या ज्वरामुळे बनावट जर्सी आणि फुटबॉल ट्रेडिंग कार्ड्सच्या विक्रीत वाढ झाली आहे. त्यामुळे राष्ट्राध्यक्ष हॅवियर मिलेई यांच्या बाजारपेठ खुली करण्याच्या धोरणांमुळे आधीच दबावाखाली असलेल्या किरकोळ विक्रेत्यांनी निषेध व्यक्त केला आहे. ब्यूनस आयर्समधील मुख्य बाजारपेठा देशभक्तीपर फिकट निळ्या आणि पांढऱ्या रंगांतील टोप्या, झेंडे, माटेचे भोपळे आणि टी-शर्ट्सने भरून गेल्या आहेत. २०२२ मधील अर्जेंटिनाच्या विश्वचषक विजयामुळे ज्या लोकांना फुटबॉल आवडत नाही, त्यांच्यातही तो जोश निर्माण झाला आहे, पण रस्त्यावर विकल्या जाणाऱ्या अर्जेंटिना संघाच्या ७० टक्क्यांहून अधिक जर्सी बनावट असल्याचा त्याला संशय आहे, असे ब्यूनस आयर्स कॉमर्स चेंबरचे प्रमुख फॅबियन कॅस्टिलो म्हणाले.

### पूजाने मोडला १२ वर्षांचा जुना उंच उडीचा राष्ट्रीय विक्रम

**हाँगकाँग** : येथे शुक्रवारी पार पडलेल्या आशियाई २० वर्षांखालील ॲथलेटिक्स स्पर्धेत १९ वर्षीय उंच उडीपटू पूजाने १.९३ मीटरची आपली सर्वोत्तम वैयक्तिक कामगिरी नोंदविली.



या कामगिरीसह तिने, २०१२ मध्ये सहाना कुमारीने प्रस्थापित केलेला १.९२ मीटरचा १२ वर्षांचा जुना राष्ट्रीय विक्रम मोडीत काढला. एप्रिलमध्ये नवी दिल्ली येथे झालेल्या इंडियन ॲथलेटिक्स सिरीजमध्ये १.९० मीटरचा टप्पा गाठल्यानंतर, या हंगामात पूजाने आपली सर्वोत्तम वैयक्तिक कामगिरी सुधारण्याची ही दुसरी वेळ आहे. १.९३ मीटरची उंची गाठत पूजाने सुवर्णपदक पटकावले, हे आशियाई २० वर्षांखालील स्पर्धेतील तिचे दुसरे पदक ठरले. या सुवर्णपदकासह, आता खंडीय स्तरावर वरिष्ठ व कनिष्ठ अशा दोन्ही गटांतील विजेतेपद तिच्या नावावर जमा झाले आहे. तसेच, भारतीय ॲथलेटिक्स महासंघाने निश्चित केलेला राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठीचा पात्रता निकषही तिने पूर्ण केला आहे. ■

# वैभव सूर्यवंशीचे पुन्हा शतक हुकले

## राजस्थान रॉयल्स ६ बाद २१४




◆ **मुल्लानपूर, २९ मे**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात गुजरात टायटन्सविरुद्धच्या क्वालिफायर २ सामन्यात वैभव सूर्यवंशीच्या (९६) दमदार फलंदाजीच्या बळावर राजस्थान रॉयल्सने मर्यादित २० षटकांत ६ बाद २१४ धावा उभारल्या. गुजरातसमोर विजयासाठी तसेच स्पर्धेची अंतिम फेरी गाठण्यासाठी २१५ धावांचे लक्ष्य ठेवले.

राजस्थान रॉयल्सचा कर्णधार रियान परागने नाणफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्यस पसंती दिली, परंतु त्यांना अपेक्षेनुसार डावाची चांगली सुरुवात करता आली नाही. मोहम्मद सिराजने यशस्वी जयस्वालला (१) व कॅगिसो रबाडाने ध्रुव जुरेलला (७) पहिल्या दोन षटकांत बाद करून राजस्थान रॉयल्सला जबरदस्त हादरे दिले. राजस्थानने २ षटकांत ९ धावांत हे दोन महत्त्वपूर्ण फलंदाज गमावले, परंतु त्यानंतर वैभव सूर्यवंशीने अष्टपैलू रवींद्र जडेजाच्या साथीने राजस्थानचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला.

**जडेजा दुखापतीमुळे निवृत्त**

रवींद्र जडेजा एक अप्रतिम खेळी खेळला, त्याने पॉवरप्लेचा पुरेपूर फायदा घेतला, मात्र या खेळीदरम्यान त्याच्या कोपराच्या वेदना पुन्हा उफाळून आल्या, परिणामी तो जखमी निवृत्त झाला, त्यावेळी त्याने १९ चेंडूंमध्ये ३४ धावा केल्या व राजस्थानची आठ षटकांत २ गडी बाद ८२ धावा अशी स्थिती होती. जडेजाच्या जागी रियान पराग फलंदाजीसाठी आला.

वैभव सूर्यवंशी व रियान परागने संघाला ९.३ षटकांत १०१ धावांचा टप्पा गाठून दिला असतानाच जेसन होल्डरने रियानला ६ चेंडूंत ११ धावा) रबाडाकडून झेलबाद केले. त्यानंतर होल्डरने दासून शनाकाला (३) व प्रसिध कृष्णाने जोफ्रा आर्चरला (७) तंबूत परत पाठविले, त्यावेळी राजस्थानची १२.४ षटकांत ५ बाद ११८ धावा अशी स्थिती होती.

**जडेजा मैदानावर परतला**

एक टोंक खंबीरपणे सांभाळणाऱ्या वैभव सूर्यवंशीला साथ देण्यास जखमी निवृत्त झालेला रवींद्र जडेजा पुन्हा मैदानावर आला. जडेजाच्या मदतीने सूर्यवंशीने आपले अर्धशतक साजरे केले. सूर्यवंशीने ३१ चेंडूंत ६ चौकार व २ षट्कारांच्या मदतीने ५० धावा पूर्ण केल्या. वैभवची गुजरातच्या गोलंदाजांविरुद्ध जोरदार फटकेबाजी सुरूच होती. जडेजाची उत्तम साथ मिळाल्याने वैभव सूर्यवंशी वैयक्तिक शतकाकडे आगेकूच करीत होता.

गुजरात टायटन्सकडून कॅगिसो रबाडा, जेसन होल्डरने प्रत्येकी २ बळी, तर मोहम्मद सिराज, प्रसिध कृष्णाने प्रत्येकी १ बळी टिपण्यात यश मिळविले. ◀(वृत्तसंस्था)

**'नर्व्हस ९०'**

**शतकाच्या उंबरठ्यावर असताना सूर्यवंशीला कॅगिसो रबाडाने प्रसिध कृष्णाकडून झेलबाद केले. सूर्यवंशीचे अवघ्या चार धावांनी शतक हुकले. गत सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या एलिमिनेटर सामन्यात तो ९७ धावांवर बाद झाला होता, तर आज ९६ धावांवर तंबूत परतला. वैभव सूर्यवंशीने अवघ्या ४७ चेंडूंत ८ चौकार व ७ षट्कारांच्या मदतीने ९६ धावांची दिमाखदार खेळी केली. तो बाद झाला, तेव्हा राजस्थान रॉयल्सने १७.२ षटकांत ६ बाद १७२ धावांपर्यंत मजल मारली होती. पुढे रवींद्र जडेजा व डोनोव्हन फरेराने नाबाद खेळी करत राजस्थान रॉल्सला २० षटकांत ६ बाद २१४ धावा उभारून दिल्या. जडेजाने ३५ चंडूंत ५ चौकार व एका षट्कारसह नाबाद ४५ धावांची, तर डोनोव्हनने ११ चेंडूंत २ चौकार व ४ षट्कारांसह नाबाद ३८ धावांची खेळी केली.** ■

# सात्त्विक-चिरागची उपांत्य फेरीत धडक

### सिंगापूर ओपन बॅडमिंटन ● सिंधूचे आव्हान संपुष्टात



प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध खेळताना सात्त्विक साईराजरन्कीरेड्डी व चिराग शेट्टी

◆ **सिंगापूर, २९ मे**

भारताची पीव्ही सिंधू जागतिक क्रमवारीत अव्वल असलेल्या आन से यंगला दीर्घकाळ अडचणीत आणण्यासाठी आवश्यक असलेल्या सातत्याच्या अभावामुळे उपांत्यपूर्व फेरीत पराभूत झाली, परंतु शुक्रवारी सिंगापूरमध्ये झालेल्या सिंगापूर ओपन सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेत सात्विकसाईराज रन्कीरेड्डी आणि चिराग शेट्टी या अव्वल पुरुष दुहेरी जोडीने एका चुरशीच्या लढतीत विजय मिळवून उपांत्य फेरीत प्रवेश केला.

दोन वेळच्या ऑलिम्पिक पदक विजेत्या सिंधूने आपल्या आक्रमक खेळाची झलक दाखवली आणि काही वेळा कोरियन खेळाडूला दबावाखाली आणण्यात यश मिळवले, परंतु आनच्या उत्कृष्ट नियंत्रणामुळे, हालचालींमुळे आणि महत्त्वाचे गुण जिंकण्याच्या क्षमतेमुळे त्यांच्यातील एकतर्फी स्पर्धेत २१-१७, २१-१४ असा आणखी एक सोपा विजय निश्चित झाला.

या पराभवामुळे विद्यमान ऑलिम्पिक चॅम्पियनविरुद्ध सिंधूच्या विजयाविना सामन्यांची मालिका नऊ सामन्यांपर्यंत वाढली आहे. या सामन्यांमध्ये, भारतीय खेळाडूने केवळ एकदाच, २०२३ च्या बॅडमिंटन आशिया चॅम्पियनशिपमध्ये आनकडून एक गेम जिंकला आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेतील विजेते आणि येथील चौथे मानांकित सात्त्विक आणि चिराग यांनी, एक गेमने पिछाडीवर असताना मलेशियाच्या खाई शिंग कांग आणि ॲरॉन ताई यांच्यावर १९-२१, २१-१७, २१-१३ असा विजय मिळविला. हा सामना एक तास आणि पाच मिनिटे चालला. आता या भारतीय जोडीचा सामना कोरियाच्या अव्वल मानांकित किम वॉन हो आणि सेओ सेउंग जे यांच्याशी होईल. या कोरियन जोडीने सातव्या मानांकित जपानी जोडी ताकुरो होकी आणि युगो कोबायाशी यांचा २१-१९, २१-१८ असा पराभव केला. ◀(वृत्तसंस्था)

# लखनौच्या पंतची 'पत' गेली

◆ **लखनौ, २९ मे**

लखनौ सुपर जायण्ट्सचा आक्रमक यष्टिरक्षक-फलंदाज ऋषभ पंत याला कर्णधारपदावरून मुक्त करण्यात आले आहे. २०२६ च्या आयपीएल हंगामात लखनौ संघाची कामगिरी अत्यंत निराशाजनक ठरली होती व दहा संघांमध्ये त्यांना तळाचे स्थान मिळाले होते, ज्यानंतर हा निर्णय घेण्यात आला.

आयपीएल २०२६ मध्ये ऋषभ पंतच्या कर्णधारपदाखाली लखनौ सुपर जायंट्सला आणखी एका खराब हंगामाचा सामना करावा लागला. एक फलंदाज म्हणूनही हा हंगाम पंतसाठी अत्यंत वाईट ठरला. या हंगामात त्याने १४ डावांमध्ये केवळ ३१२ धावा केल्या.

पंतला कर्णधारपद गमवावे लागणार आहे, या वृत्ताला लखनौ सुपर जायंट्सचे क्रिकेट संचालक टॉम मूडी यांनी काही दिवसांपूर्वी दुजोरा दिला होता.

ऋषभ पंतने संघाच्या कर्णधारपदाच्या जबाबदारीतून मुक्त करण्याची विनंती केली होती व संघ व्यवस्थापनाने त्याची ही विनंती तात्काळ प्रभावाने स्वीकारली आहे, असे फ्रॅन्चायझीने म्हटले आहे.

अशा प्रकारचे निर्णय घेणे कधीच सोपे नसते. कर्णधार म्हणून ऋषभने या संघासाठी आणि ड्रेसिंग रूमसाठी जे काही योगदान दिले आहे, त्याबद्दल आम्ही त्याचे ऋणी आहोत. आमचे लक्ष आता संघाच्या सामूहिक पुनर्बांधणीवर आणि सर्वोत्तम दर्जा गाठण्यासाठी आवश्यक असलेल्या पुनर्रचनेवर केंद्रित झाले आहे, असे टॉम मूडीने सांगितले.



◀(वृत्तसंस्था)

### हार्दिक कर्णधारपद गमावण्याची शक्यता

◆ **मुंबई, २९ मे**

मुंबई इंडियन्सचा कर्णधार म्हणून हार्दिक पांड्याचा कार्यकाळ आता संपुष्टात येत आहे. १४ पैकी १० सामने गमावणे, गुणतालिकेत नवव्या क्रमांकावर समाधान मानावे लागणे आणि विजेतेपदाची प्रतीक्षा सहा वर्षांपर्यंत लांबवणे, अशा निराशाजनक कामगिरीनंतर मुंबई इंडियन्स आता आपल्या संघात आमूलाग्र बदल करण्याच्या तयारीत आहे व त्याची सुरुवात कर्णधारपदापासून होणार आहे. मुंबई इंडियन्सच्या अंतर्गत वर्तुळातील किमान तीन व्यक्तींशी संवाद साधल्यानंतर हार्दिकचे कर्णधारपद जाण्याची दाट शक्यता आहे. ◀(वृत्तसंस्था)

# क्रिकेटपटूंना स्मार्ट सनग्लासेस वापरण्यावर बंदी

## नियमांचे उल्लंघन केल्यास कारवाईचा इशारा

◆ **नवी दिल्ली, २९ मे**

बीसीसीआयच्या भ्रष्टाचारविरोधी पथकाने (एसीयू) सध्या सुरू असलेल्या आयपीएल स्पर्धेत खेळाडू आणि सामना अधिकाऱ्यांकडून स्मार्ट सनग्लासेस वापरण्यावर बंदी घातली आहे. या सनग्लासेसमध्ये असलेल्या प्रगत संवाद वैशिष्ट्यांचा हवाला देत हा निर्णय घेण्यात आला आहे; या वैशिष्ट्यांमुळे मोबाईल डेटा किंवा वाय-फाय नेटवर्कद्वारे थेट प्रक्षेपण व व्हिडीओ कॉलिंग करणे शक्य होते.

काही कंपन्या खेळाडू व सपोर्ट स्टाफला स्मार्ट सनग्लासेसची विक्री आणि विपणन करत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले आहे, असे बीसीसीआयच्या एसीएसयूने आयपीएलमधील संघांना दिलेल्या एका मार्गदर्शक सूचनेत नमूद केले आहे.ही उपकरणे प्रगत संवाद वैशिष्ट्यांनी सुसज्ज आहेत. यामध्ये थेट प्रक्षेपण, मजकूर संदेश पाठवणे व प्राप्त करणे, तसेच मोबाईल डेटा किंवा वाय-फाय नेटवर्कद्वारे ऑडिओ आणि व्हिडीओ कॉलिंग करण्याची क्षमता यांचा समावेश आहे, असे बीसीसीआयने स्पष्ट केले आहे.

खेळाडू आणि सामना अधिकारी क्षेत्राच्या आत स्मार्ट गॉगल्स बाळगणे आणि/किंवा त्यांचा वापर करणे यावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे, असेही त्यात नमूद करण्यात आले आहे.

निर्धारित पीएमओए क्षेत्रांमध्ये खेळाडूंना संवाद उपकरणांचा वापर करण्यास मनाई आहे. या वर्षीच्या स्पर्धेत, राजस्थान रॉयल्सचा रोमी भिंदर हा सामना सुरू असताना संघाच्या डगआउटमध्ये फोन वापरताना कॅमेऱ्यात कैद झाला होता; या घटनेनंतर त्याला १ लाख रुपयांचा दंड आणि एक ताकीद देण्यात आली होती. आपल्या ताज्या मार्गदर्शक सूचनेत, बोर्डाने खेळाडू आणि अधिकाऱ्यांना मध्ये प्रवेश करण्यापूर्वी स्मार्ट सनग्लासेस देखील जमा करण्याचे आवाहन केले आहे. तसेच, या नियमांचे पालन न केल्यास कडक कारवाई करण्याचा इशाराही दिला आहे. ◀(वृत्तसंस्था)

# भारताचा इंग्लंडवर ३८ धावांनी विजय

◆ **चेम्सफोर्ड, २९ मे**

जेमिमाह रॉड्रिग्स व यास्तिका भाटियाने झटपट अर्धशतके झळकावली, त्यानंतर गोलंदाजीत नवोदित वेगवान गोलंदाज नंदनी शर्माने चमकदार कामगिरी केली. या तिघींच्या जबरदस्त कामगिरीच्या जोरावर भारतीय महिला संघाने इंग्लंडचा ३८ धावांनी पराभव केला आणि तीन सामन्यांच्या महिला टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. १२ जूनपासून सुरू होणाऱ्या आगामी टी-२० विश्वचषकापूर्वीची भारताची ही शेवटची मालिका आहे.

नियमित कर्णधार हरमनप्रीत कौरच्या अनुपस्थितीत खेळताना, भारताने वाईट सुरुवातीनंतर सावरत ७ बाद १८८ धावांची धावसंख्या उभारली. त्यानंतर त्यांनी इंग्लंडला ८ बाद १५० धावांवर रोखले.




| धावा | चेंडू | चौकार | षट्कार |
|---|---|---|---|
| ६९ | ४० | १० | १ |

कार्यवाहक कर्णधार स्मृती मंधाना पहिल्याच चेंडूवर बाद झाली, तर तिची सलामीची जोडीदार शेफाली वर्मा केवळ ३ चेंडूंत २ धावा करून बाद झाली. मात्र, रॉड्रिग्सने ४० चेंडूंत ६९ धावा (१ षट्कार, १० चौकार) केल्या, तर यास्तिकाने दोन वर्षांनंतर या प्रकारात पुनरागमन करताना ४० चेंडूंत ५४ धावांची वेगवान खेळी केली; हे तिचे पहिलेच टी-२० आंतरराष्ट्रीय अर्धशतक होते. तिने या खेळीत नऊ चौकार आणि एक षटकार ठोकला.

यास्तिका आणि रॉड्रिग्सने अप्रतिम प्रतिहल्ला चढवला आणि तिसऱ्या गड्यासाठी अवघ्या ७६ चेंडूंत १२६ धावांची भागीदारी रचत भारतीय डावाला कलाटणी दिली.

गुडघ्याच्या शस्त्रक्रियेनंतर पुनरागमन करणारी आणि एप्रिल २०२४ नंतर आपला पहिलाच टी-२० आंतरराष्ट्रीय सामना खेळणारी यास्तिका, ३१ चेंडूंत नऊ चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने आपल्या अर्धशतकापर्यंत पोहोचली. ◀(वृत्तसंस्था)

# भारतीय महिला हॉकी संघाचा ऑस्ट्रेलियावर विजय

### चार सामन्यांच्या मालिकेत आघाडी

◆ **पर्थ, २९ मे**

येथे शुक्रवारी खेळल्या गेलेल्या चार सामन्यांच्या महिलांच्या मैत्रीपूर्ण हॉकी मालिकेतील तिसऱ्या सामन्यात, यजमान ऑस्ट्रेलियाचा पराभव करत भारताने २-१ अशी आघाडी घेतली. भारताने या सामन्यात दोन मैदानी गोलची नोंद केली.

दोन्ही संघांनी बचावात्मक फळीत अत्यंत शिस्तबद्ध खेळाचे प्रदर्शन केले, त्यामुळे सामन्याचे पहिले दोन चरण गोलशून्य राहिले. अखेरीस तिसऱ्या चरणामध्ये भारताला यश मिळाले, सोनमने ३६ व्या मिनिटाला गोल करत पाहुण्या संघाला आघाडी मिळवून दिली. चौथ्या आणि अंतिम चरणामध्येही भारताने आपली विजयी गती कायम राखली आणि लालरेमसियामीने ४९ व्या मिनिटाला आणखी एक गोल करत भारताची आघाडी दुप्पट केली. या मालिकेतील चौथा आणि अंतिम सामना शनिवारी याच मैदानावर खेळला जाईल. या मालिकेतील पहिल्या सामन्यात भारताला ऑस्ट्रेलियाकडून १-२ ने पराभव पत्करावा लागला होता. ◀(वृत्तसंस्था)



आक्रमकपणे खेळताना भारतीय महिला हॉकीपटू

# गतविजेती कोको गॉफ, इगा स्वियातेक तिसऱ्या फेरीत

◆ **पॅरिस, २९ मे**

येथे सुरू असलेल्या प्रतिष्ठेच्या फ्रेंच ओपन टेनिस स्पर्धेत महिला विभागात गतविजेती अमेरिकेच्या कोको गॉफ व पोलंडच्या इगा स्वियातेकने आपली विजयी घोडदौड कायम राखत स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीत धडक मारली.

गतविजेती कोको गॉफने इजिप्तच्या पात्रता फेरीतून आलेल्या मायर शरीफचा ६-३, ६-२ असा सहज पराभव करीत फ्रेंच ओपनच्या तिसऱ्या फेरीत आपले स्थान निश्चित केले.तिसऱ्या फेरीत तिचा सामना आता ब्रिटनच्या केटी बोल्टर किंवा ऑस्ट्रियाच्या अनास्तासिया पोटपोव्हा यांच्यापैकी एकाशी होईल.

ग्रॅण्ड स्लॅम स्पर्धेच्या मुख्य फेरीत आपल्या कारकिर्दीतील ८० वा विजय नोंदवणाऱ्या या अमेरिकन खेळाडूला या सामन्यात आपला सर्वोत्तम खेळ मात्र दाखवता आला नाही.

चार वेळा विजेतेपद पटकावणाऱ्या इगा स्वियातेकने शुक्रवारी, पोलंडच्या दोन खेळाडूंमधील लढतीत माग्दा लिनेटचा ६-४, ६-४ असा पराभव करीत उप-उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. आता स्वियातेकचा सामना सध्या जबरदस्त फॉर्ममध्ये असलेल्या युक्रेनच्या मार्ता कोस्त्युकशी होईल. कोस्त्युकने अलिकडेच माद्रिद आणि रुएन येथील स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. १५ वी मानांकित खेळाडू असलेल्या कोस्त्युकने स्वित्झर्लण्डच्या



व्हिक्टोरिया गोलुबिकचा ६-४, ६-३ असा पराभव करत, आपल्या विजयी दौऱ्याची मालिका कायम राखली.

**सेरेना विल्यम्स पुनरागमनाच्या वाटेवर**

अमेरिकेची स्टार टेनिसपटू सेरेना विल्यम्स गवताच्या कोर्टवरील हंगाम खेळू शकते, परंतु पुनरागमनाची घोषणा करणे तिच्यावर अवलंबून आहे, असे तिची कथित दुहेरीतील जोडीदार व्हिक्टोरि म्बोको म्हणाली. सेरेनाने क्वीन्स स्पर्धेत दुहेरीमध्ये भाग घेण्यासाठी वाईल्डकार्ड मागितले आहे, असा दावाही तिने केला आहे. ४० वर्षीय सेरेना विल्यम्स २०२२ च्या अमेरिकन ओपनमध्ये तिसऱ्या फेरीत पराभूत झाल्यापासून खेळलेली नाही. या पराभवामुळे ती २४ ग्रँड स्लॅम एकेरी विजेतेपदांच्या सर्वकालीन विक्रमापासून केवळ एक विजेतेपद दूर राहिली. हा विक्रम आता मार्गारेट कोर्ट आणि नोव्हाक जोकोविच यांच्या नावावर संयुक्तपणे आहे. ◀(वृत्तसंस्था)

# नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत कार्लसेनकडून पराभूत गुकेश तळाशी

### प्रज्ञानंद दुसऱ्या स्थानी कायम

◆ **ओस्लो, २९ मे**

प्रथम विश्वमानांकित नॉर्वेच्या मॅग्नस कार्लसेनने विद्यमान विश्वविजेता डी. गुकेशवर दणदणीत विजय मिळवून पुन्हा एकदा विजयाच्या मार्गावर परतला आहे व त्यामुळे तरुण भारतीय खेळाडू गुणतालिकेत तळाशी फेकला गेला आहे, तर आर. प्रज्ञानंदने येथे नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत आर्मागेडॉन प्रकारात व्हिन्सेंट केमरला हरवून आपले दुसरे स्थान कायम राखले आहे.

सात वेळा नॉर्वे बुद्धिबळ विजेता ठरलेल्या कार्लसेनने तीन पूर्ण गुण मिळवून ४.५ गुणांसह तळावरून थेट चौथ्या स्थानावर झेप घेतली आहे. दुसरीकडे, निराश झालेला गुकेश एका बाजूच्या दरवाज्यातून शांतपणे बाहेर पडला, ज्यामुळे अनेक तरुण चाहते स्वाक्षरीसाठी वाट पाहत



राहिले. शुक्रवारच्या विश्रांतीच्या दिवसापूर्वी, अलीरेझा फिरौजा स्पर्धेतील आपला पहिला पराभव पत्करूनही अव्वल स्थानी कायम होता. क्लासिकल प्रकारातील सामना बरोबरीत सुटल्यानंतर वेस्ली सो विरुद्ध आर्मागेडॉन प्रकारात त्याला पराभव पत्करावा लागला.

फिरौजाने एक मौल्यवान गुण मिळवून आपली गुणसंख्या ८.५ वर नेले व सहा गुणांसह दुसऱ्या स्थानावर असलेल्या प्रज्ञानंदवर २.५ गुणांची भक्कम आघाडी कायम ठेवली.

अमेरिकन वेस्ली सो ५.५ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे, जो कार्लसेनपेक्षा एक गुण पुढे आहे, तर केमर चार गुणांवर आहे.सर्वात तळाशी विद्यमान विश्वविजेता गुकेश ३.५ गुणांसह आहे, आणि या वर्षाच्या अखेरीस आव्हानवीर जावोखिर सिंदारोव्हविरुद्ध विश्वविजेतेपदाच्या बचावापूर्वी, या तरुण भारतीय खेळाडूसाठी ही स्पर्धा आणखी एक दुःस्वप्न ठरण्याची शक्यता आहे. ◀(वृत्तसंस्था)

**सलग तीन विजयानंतर दिव्याचा पराभव**



नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत महिला विभागात भारताचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या नागपूरच्या ग्रॅण्डमास्टर दिव्या देशमुखला आपल्या पहिल्या आर्मागेडन पराभवाला सामोरे जावे लागले. सलग तीन टाय-ब्रेक जिंकल्यानंतर तिला गतविजेती ॲना मुझीचुककडून पराभव पत्करावा लागला. या पराभवामुळे, विश्वचषक विजेती दिव्या दुसऱ्या क्रमांकावरून घसरून, ५.५ गुणांसह तिसऱ्या क्रमांकावर तीन खेळाडूंमध्ये बरोबरीत आली आहे. दुसरीकडे, कोनेरू हम्पीचा संघर्ष अजूनही सुरूच आहे; तिला झू जिनरकडून आणखी एका आर्मागेडन सामन्यात पराभव पत्करावा लागला असून, सहा खेळाडूंच्या या गटात ती शेवटच्या क्रमांकावरच कायम आहे. गुणतालिकेत बिबिसारा असाउबायेवा सात गुणांसह अव्वल स्थानी आहे; तिच्या पाठोपाठ मुझीचुक, दिव्या आणि झू या प्रत्येकी ५.५ गुणांसह दुसऱ्या क्रमांकावर आहेत. विद्यमान महिला विश्वविजेती जू वेनजुन चार गुणांवर आहे, तर हम्पी तीन गुणांनी पिछाडीवर आहे. ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### नवरंगे बालकाश्रमातील मुलांना 'गुड टच-बॅड टच'चे धडे

**सोलापूर, दि. २९ मे-**

किशोरवयीन मुला-मुलींना लहानपणापासूनच 'गुड टच' आणि 'बॅड टच' विषयी जागरूक करणे अत्यंत गरजेचे आहे. मुला मुलींनी कोणत्याही आमिषाला बळी न पडता सतर्क राहिले पाहिजे. तसेच पालकांनीही आपल्या मुलांकडे लक्ष देणे आवश्यक आहे. मुला-मुलींमध्ये भीतीचे वातावरण निर्माण न करता त्यांच्याशी मैत्रीपूर्ण संवाद ठेवला, तरच मुले आपल्या सोबत घडणाऱ्या चुकीच्या वर्तनाविषयी पालकांशी मोकळेपणाने बोलू शकतील. मुला-मुलींसाठी सर्वंकष लैंगिकता शिक्षण जितके महत्त्वाचे आहे, तितकेच पालकांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठीही हे शिक्षण आवश्यक असल्याचे प्रतिपादन नवरंगे बालकाश्रमाच्या अधीक्षिका ॲड. राजश्री गाडे यांनी केले. प्रिसिजन फाउंडेशन आणि फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने पंढरपूर येथील नवरंगे बालकाश्रमात आयोजित सर्वंकष लैंगिकता प्रशिक्षण कार्यक्रमात त्या बोलत होत्या. या कार्यक्रमात बालकाश्रमातील ४५ मुला-मुलींनी सहभाग घेतला. दिवसभर चाललेल्या या प्रशिक्षण शिबिरात वीरेंद्र परदेशी यांनी वयात येताना होणारे शारीरिक व मानसिक बदल याविषयी मार्गदर्शन केले. सत्यभामा कांबळे यांनी एचआयव्ही-एड्स, सकस आहार याबाबत माहिती दिली. विकी शिवशरण यांनी कॅन्सर, पोक्सो कायदा आणि लैंगिक अत्याचार या विषयांवर मार्गदर्शन केले, तर प्रीती चौधरी यांनी सायबर गुन्हे तसेच योग्य व अयोग्य स्पर्श याबाबत माहिती दिली. कार्यक्रमादरम्यान गटचर्चा, भूमिकानाट्य आणि प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून मुलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. ङ्गमला माझ्या शरीराविषयी महत्त्वाची माहिती मिळाली आणि संकटाच्या वेळी कोणाशी संपर्क साधायचा हे समजले,ङ्ख अशी प्रतिक्रिया विद्यार्थिनींनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व मुला-मुलींची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. यावेळी नवरंगे बालकाश्रमाच्या सुपरवायझर सुनीत्रा पवार उपस्थित होत्या. सोलापूर जिल्ह्यातील बालकाश्रमांतील मुला-मुलींना सर्वंकष लैंगिकता शिक्षणाद्वारे सजग करण्याचा संकल्प प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांनी केला असून, त्याचाच एक भाग म्हणून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याची माहिती शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड यांनी दिली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मॅनेजर (पब्लिक रिलेशन विभाग) नितीन फलटणकर तसेच असिस्टंट पब्लिक रिलेशन ऑफिसर वैशाली बनसोडे यांचे मार्गदर्शन लाभले.

### मुढवी येथे टोळक्याकडून तरुणाच्या अपहरणाचा प्रयत्न

**मंगळवेढा, दि.२९ मे-**

मुंढवी येथे पहाटे ३.१५ वाजता मोटर सायकलवर आलेल्या ८ ते १० लोकांनी तरुणास घराबाहेर ओढून हातपाय बांधून मोटर सायकलवर नेण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी अनिकेत गायकवाड (रा.मंगळवेढा), अजित कोळेकर, दत्तात्रय ठेंगील व अन्य व्यक्तीविरुध्द मंगळवेढा पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी चंद्रकांत कदम हे दि.२३ मे रोजी पहाटे ३.१५ वाजता घरात झोपले होते. तेव्हा ५ ते ६ मोटर सायकलीवरुन ८ ते १० लोक आले. आवाजामुळे फिर्यादी व त्याची पत्नी जागे झाले. आलेल्या लोकांनी फिर्यादीस घरातून बाहेर ओढत आणले. हायपाय बांधू लागल्यावर फिर्यादीने आरडाओरडा केला. त्यावेळी आरोपी लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन जबरदस्तीने मोटर सायकलवर बसवून नेण्याचा प्रयत्न करु लागले. अनिकेत गायकवाडने फिर्यादीच्या खिशातील ७ हजार रुपये काढून घेतले. याला बॉसकडे घेवून जावूया, तुला जीवंत सोडणार नाही अशी धमकी केली. घराशेजारील लोक धावून आल्यावर आरोपी पळून गेले. फिर्यादीने कळवल्यावर पोलिसांनी पंचनामा केला. तपास हवालदार विक्रांत कोळी करीत आहेत.

## निधन वृत्त...

### महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक दिलीप स्वामी यांना मातृशोक



**सोलापूर, दि. २९ मे-**

सोलापूर जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अकोला महाबीज महामंडळाचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक दिलीप स्वामी यांच्या मातोश्री कमलाबाई विरूपाक्षप्पा स्वामी यांचे वृद्धापकाळाने निधन झाले आहे. श्रीमती कमलाबाई स्वामी या उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या देखील मातोश्री होत. स्वामी कुटुंबीयांवर आलेल्या या दुःखद प्रसंगामुळे नातेवाईक, मित्रपरिवार तसेच विविध स्तरांतील मान्यवरांनी शोकसंवेदना व्यक्त केल्या आहेत. त्यांच्या पार्थिवावर आज दि. २८/५/२६ रोजी सायंकाळी ५ वाजता लातूर येथील सिद्धेश्वर मंदिर परिसरात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. अंत्यविधीसाठी कुटुंबीय, नातेवाईक, प्रशासकीय अधिकारी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार.

### भाजपचे नगरसेवक दत्तात्रय नडगिरी

**सोलापूर, दि. २९ मे-**



भाजपचे नगरसेवक दत्तात्रय नडगिरी यांचे शुक्रवारी दुपारी दीर्घ आजाराने निधन झाले. ते ५२ वर्षांचे होते. नडगिरी हे भाजपचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून ओळखले जात होते. तसेच ते आमदार सुभाष देशमुख यांचे कट्टर समर्थक होते. जानेवारी महिन्यात झालेल्या महापालिका निवडणुकीत ते प्रभाग २२ मधून भाजपाकडून निवडून आले होते. गेल्या काही महिन्यांपासून ते आजारी होते. उपचारा दरम्यानच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली असा परिवार आहे. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी हॉस्पिटलकडे धाव घेतली. रात्री नऊ वाजता त्यांच्यावर मोदी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

### राहुल गायकवाड



**सोलापूर, दि. २९ मे-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मनगोळी येथील रहिवासी राहुल गायकवाड (वय ६०) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुली, नातवंडे असा परिवार आहे.

# वॉरियर्स आणि किंग्स संघांचे शानदार विजय

**निलेश गायकवाड क्रिकेट ॲकॅडमी इंटर क्लब स्पर्धा : आदित्य चटके, श्रवण माळी सामनावीर**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मे-**

येथील पुष्प जिमखाना, डोणगाव रोड मैदानावर निलेश गायकवाड क्रिकेट ॲकॅडमी आयोजित इंटर क्लब क्रिकेट स स्पर्धेत चुरशीच्या सामन्यांमध्ये वॉरियर्स आणि किंग्स या संघांनी अनुक्रमे विजय मिळवले.

पहिल्या सामन्यात वॉरियर्स संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ८ बाद १३१ धावा उभारल्या. यात यशराज टेकाळे याने २७, पियुष खांडेकर याने १५ तर आदित्य सुरवसे याने ११ धावांचे योगदान दिले. नकुल होनमान आणि दुर्वांक पाटील यांनी प्रत्येकी ७ धावा केल्या. रायडर्स संघाकडून गोलंदाजी करताना अथर्व हलकुरकी आणि स्वप्निल चव्हाण यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले, तर अथर्व मांडवेकर, मल्हार गायकवाड आणि झिशान नदाफ यांनी प्रत्येकी एक बळी मिळवला. प्रत्युत्तरात १३२ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना रायडर्स संघाला २० षटकांत ८ बाद ८४ धावांपर्यंतच मजल मारता आली. रायडर्सकडून धानेश्वरी घोडके हिने २१ आणि अकिरानंदा कुशपागो याने ११ धावा केल्या. वॉरियर्स संघाकडून गोलंदाजी करताना विराज टकले, आदित्य चटके आणि राजन सर्वगोड यांनी प्रत्येकी दोन, तर मल्हार होनमाने आणि आदित्य सुरवसे यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. हा सामना वॉरियर्स संघाने ४७ धावांनी जिंकला. या सामन्यात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या आदित्य चटके याला सामनावीर, यशराज टेकाळे





याला फलंदाज तर विराज टकले याला गोलंदाज म्हणून गौरविण्यात आले. आदित्यला डॉ. अमरसिंग शेंडे यांच्या हस्ते हे पारितोषिक देण्यात आले.

दुपारच्या सत्रात झालेला दुसरा सामन्यात लायन्स विरुद्ध किंग्ज यांच्यात खेळवला गेला. लायन्स संघाने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना किंग्ज संघाने २७.४ षटकांत सर्वबाद १८६ धावा केल्या. यामध्ये हर्ष राऊत याने ४३, संग्राम पवार याने ३५ तर सुरज थोरात याने १९ धावा केल्या. लायन्स संघाकडून गोलंदाजी करताना श्रवण माळीने अवघ्या १९ धावांत ४ बळी घेतले. अभिजीत सरवदे याने २४ धावांत ३, यश पवारने ४३ धावांत २ तर अर्जुन चटके याने २७ धावांत १ बळी घेतला. विजयासाठी १८७ धावांचे लक्ष्य घेऊन मैदानात उतरलेल्या किंग्ज संघाने २८.५ षटकांत ९ बाद १८८ धावा करत १ गडी राखून अत्यंत रोमांचक विजय मिळवला. किंग्जकडून श्रवण माळीने नाबाद ४७, विराज पांढरेने नाबाद ४१ तर यशराज श्रीरसागरने ३४ धावांची मॅचविनिंग खेळी केली. लायन्सकडून गोलंदाजी करताना गणेश पवारने २५ धावांत ४ बळी घेतले. अनिश बिरोळी व सुरज थोरात यांनी प्रत्येकी दोन, तर आर्यन भूमकर आणि सार्थक कन्ना यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. या सामन्यात अष्टपैलू कामगिरी करणाऱ्या श्रवण माळी याला सामनावीर, फलंदाज आणि उत्कृष्ट गोलंदाज अशा तिन्ही पुरस्कारांनी निलेश गायकवाड यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.



# युनायटेड व हाय परफॉर्मन्स क्लबची विजयी घोडदौड

**'आपटे चषक' क्रिकेट : ध्रुव शिंदे, अभिषेक देशमुख सामनावीर**

**सोलापूर, दि. २९ मे -**

साउथ सोलापूर आपटे ग्रुपच्या वतीने आयोजित 'आपटे चषक' क्रिकेट स्पर्धेत युनायटेड क्रिकेट क्लब आणि हाय परफॉर्मन्स क्रिकेट क्लब यांनी आपापल्या सामन्यात दिमाखदार विजय मिळवले.

पहिल्या सामन्यात युनायटेड क्रिकेट क्लबने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. श्रीराज गवळीच्या ७७ धावा, आदित्य मानेची ५३ धावांची अर्धशतकी खेळी आणि ध्रुव शिंदेच्या ३१ धावांच्या जोरावर युनायटेड संघाने २७९ धावांचा विशाल डोंगर उभा केला. प्रत्युत्तरादाखल खेळताना साऊथ सोलापूर आपटे ग्रुपचा संघ अवघ्या १५१ धावांवर आटोपला. साऊथ सोलापूरकडून राजने ३२ आणि प्रथमेशने २१ धावांची झुंज दिली. युनायटेडच्या यश लोंढेने ४ आणि ध्रुव शिंदेने ३ बळी घेत प्रतिस्पर्धी संघाचे कंबरडे मोडले. युनायटेड क्रिकेट क्लबने हा सामना १२८ धावांच्या मोठ्या फरकाने जिंकला. अष्टपैलू कामगिरी करणाऱ्या ध्रुव शिंदेला 'मॅन ऑफ द मॅच' पुरस्काराने गौरविण्यात आले. दुसऱ्या सामन्यात युनायटेड क्रिकेट क्लबने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी स्वीकारली, मात्र हाय परफॉर्मन्सच्या फलंदाजांनी हा निर्णय साफ चुकीचा ठरवला. हाय परफॉर्मन्स संघाने प्रथम फलंदाजी करताना तब्बल ३१६ धावांचा पाऊस पाडला. यामध्ये प्रथमेश थावणे (१०० धावा) आणि अभिषेक देशमुख (१०४ धावा) यांनी झंझावाती शतके ठोकली. युनायटेडकडून सम्राट बोबडेने ३ बळी तर ध्रुव शिंदे आणि वनद चिपाडे यांनी प्रत्येकी २ बळी मिळवले. ३१७ धावांच्या विशाल लक्ष्याचा पाठलाग करताना युनायटेड क्रिकेट क्लबचा डाव १६४ धावांवरच मर्यादित राहिला. युनायटेडकडून ध्रुव शिंदेने ५४ धावांचे अर्धशतक झळकावले आणि सम्राट बोबडेने ४२ धावांचे योगदान दिले, परंतु इतर फलंदाजांची त्यांना साथ लाभली नाही. हाय परफॉर्मन्स संघाच्या मानस पोफळेने ३ आणि रणवीर फूनाडेने २ बळी घेत संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. शतकी खेळी करणाऱ्या हाय परफॉर्मन्सच्या अभिषेक देशमुखला 'सामनावीर' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# खो-खो स्पर्धेत रत्नागिरीने पुण्याला रोखले

**राज्य निमंत्रित महिला कबड्डी व खो-खो स्पर्धा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मे-**

राज्य निमंत्रित खो-खो स्पर्धेत रत्नागिरीने पुण्याला रोखले. कबड्डी स्पर्धेत सांगली आणि बारामती संघांने शानदार विजय मिळिवले.

नार्थकोट प्रशालेच्या मैदानावर हिंदू धर्मरक्षिणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मध्यवर्ती महामंडळ यांच्या वतीने ही स्पर्धा सोलापूर जिल्हा कबड्डी व खो-खो असोसिएशन आणि उत्कर्ष क्रीडा मंडळ यांच्या सहकार्याने आयोजित केली आहे. खो-खोमध्ये शुक्रवारी दोन सामने बरोबरीत झाले. रत्नागिरीच्या आर्यन स्पोर्ट्सने पुण्याच्या राजमाता जिजाऊ क्रीडा मंडळ १९-१९ असे बरोबरीत रोखले. अत्यंत चूरशीचा झालेला हा सामना मध्यंतरासही ८-८ असा बरोबरीत होता. पुण्याकडून प्रियांका इंगळे(३.००, २.०० मिनिटे व १० गुण ) व रत्नागिरीच्या ऐश्वर्या सावंत (१. ३०, १. ५० मिनिटे व ४ गुण) यांनी अष्टपैलू खेळी केली.

अन्य एका सामन्यात ठाण्याच्या दोन संघातच अटीतटीची लढत झाली. नाईक संघाने ८-९ अशा पिछाडीवरून शिवभक्त क्रीडा मंडळास १५-१५ असे बरोबरीत रोखले. नाईक संघाकडून पूजा फरगडे(१.१० व ४ गुण) व शिवभक्त संघाकडून दिव्या गायकवाड (१. १० व २. २०मिनिटे संरक्षण) यांची खेळी प्रेक्षणीय ठरली

अन्य निकाल : ज्ञानविकास ठाणे विजयी विरुद्ध राजमाता पुणे २२-१८. शिवभक्त बदलापूर ठाणे विजयी विरुद्ध राजमाता अहिल्यादेवी सांगली १७-१३. शिवभक्त बदलापूर ठाणे विजयी विरुद्ध अध्यक्षीय संघ सोलापूर २१-१०. छत्रपती व्यायाम प्रसारक मंडळ धाराशिव विजयी विरुद्ध राजमाता अहिल्यादेवी सांगली १३-९ एक डाव राखून. आर्यन स्पोर्ट्स रत्नागिरी विजयी विरुद्ध नाईक ठाणे १९-१८ एक मिनिटे राखून.





**कबड्डी : सांगली आणि बारामती संघांचे शानदार विजय**

कबड्डीच्या स्पर्धेतील सामन्यात प्रोग्रेस कबड्डी संघ, सांगली विरुद्ध सोलापूर महिला संघ, सोलापूर यांच्यात लढत झाली. या सामन्यात प्रोग्रेस सांगली संघाने पहिल्या डावात ३१ आणि दुसऱ्या डावात २३ असे एकूण ५४ गुण मिळवले. तर सोलापूर महिला संघाला पहिल्या डावात ०३ आणि दुसऱ्या डावात २४ असे एकूण २७ गुणच मिळवता आले. परिणामी, प्रोग्रेस सांगली संघाने २७ गुणांच्या फरकाने हा सामना जिंकला. या सामन्यात सांगलीकडून अल्ली महाडिक तर सोलापूरकडून कीर्ती माने हिने उत्कृष्ट चढाईचे प्रदर्शन केले. 'ब' गटात झालेला दुसरा सामना बारामती अकॅडमी, बारामती विरुद्ध विश्वशांती क्रीडा मंडळ, मुंबई शहर यांच्यात पार पडला. या सामन्यात बारामती अकॅडमीने उत्कृष्ट खेळ करत पहिल्या डावात २६ आणि दुसऱ्या डावात २३ असे एकूण ४९ गुण पटकावले. मुंबई शहर संघाला पहिल्या डावात ०९ आणि दुसऱ्या डावात ०८ असे एकूण १७ गुणच मिळवता आले. बारामती अकॅडमीने ३२ गुणांच्या मोठ्या फरकाने सामन्यात विजय मिळवला. बारामती संघाकडून मिनाक्षी घाटगे हिने उत्कृष्ट चढाई आणि वैशली झगडे हिने उत्कृष्ट पकड केली. मुंबई संघाकडून सुमित्रा कांबळे हिने उत्कृष्ट चढाई तर रोझनी डिसोजा हिने उत्कृष्ट पकड केली.

# मॉडेल अकॅडमीची कुर्डुवाडीवर मात

**विजय ट्रॉफी : संस्कार गवळीचा अष्टपैलू खेळ, ययाती आणि यशची अर्धशतके**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मे-**

विजय ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेत अत्यंत चुरशीच्या आणि रोमांचक लढतीत मॉडेल क्रिकेट अकॅडमीने उत्कृष्ट अष्टपैलू खेळाच्या जोरावर 'जय हिंद कुर्डूवाडी' संघाचा ३० धावांनी पराभव करत दिमाखात विजय साजरा केला.

येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर झालेल्या दोन्ही संघांमधील हा सामना शेवटच्या षटकापर्यंत कमालीचा उत्कंठावर्धक ठरला. मोक्याच्या क्षणी गोलंदाजी आणि फलंदाजीत दाखवलेल्या सातत्यामुळे मॉडेलने बाजी मारली. प्रथम फलंदाजी करताना मॉडेलने निर्धारित ४० षटकांत ९ गड्यांच्या मोबदल्यात २६३ धावांचा डोंगर उभा केला. मॉडेलकडून फलंदाजीत ययाती देवकते याने ६४ चेंडूत ५६ धावांची आणि यश गोपाल याने ४७ चेंडूत ५५ धावांची उत्कृष्ट अर्धशतकी खेळी करत संघाला मजबूत स्थितीत पोहोचवले.

प्रत्युत्तरात, २६४ धावांच्या मोठ्या आव्हानाचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरलेल्या जय हिंद कुर्डूवाडी संघाकडून अभिजित मुळे याने ४५ चेंडूत ४५ धावांची आक्रमक खेळी करत चिवट झुंज दिली. मात्र, नियमित अंतराने विकेट्स पडत गेल्याने कुर्डूवाडीचा डाव ३९.५ षटकांत २३३ धावांवरच आटोपला.

जय हिंद कुर्डूवाडी संघ जेव्हा वेगाने धावा जमवत सामना



संस्कार गवळी

आपल्या बाजूने झुकवण्याचा प्रयत्न करत होता, तेव्हा मॉडेलचा हुकमी एक्का संस्कार गवळी याने आपल्या भेदक गोलंदाजीने सामन्याचे चित्र पलटवले. ययाती आणि यशने रचलेल्या धावसंख्येच्या पायावर संस्कारने अचूक मारा करत कुर्डूवाडीच्या मधल्या फळीला खिंडार पाडले, जो सामन्याचा मुख्य टर्निंग पॉईंट ठरला.

या सामन्याचा खरा शिल्पकार ठरलेला अष्टपैलू संस्कार गवळी याने फलंदाजीत ४४ चेंडूत ३४ धावांचे मोलाचे योगदान दिले. तर गोलंदाजीत कमालीची कामगिरी करत ८ षटकांत १ निर्धाव षटकासह अवघ्या ४१ धावा देऊन ४ महत्त्वपूर्ण बळी टिपले. या अष्टपैलू कामगिरीसाठी संस्कार गवळीला 'प्लेअर ऑफ द मॅच' म्हणून घोषित करण्यात आले.

# कुमार व मुली गट राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा सोलापुरात २ जूनपासून

**नेहरूनगर शासकीय मैदानावर चार दिवस स्पर्धा रंगणार, राज्यातील २४ जिल्ह्यांचा सहभाग**

**स्वर्गीय अजितदादा पवार क्रीडा नगरी असे नाव देणार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मे-**

कुमार व मुले गटाची ५२वी राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा सोलापुरात किरण स्पोर्ट्स क्लब यांच्या वतीने दोन जून पासून सुरू होणार आहे.

महाराष्ट्र खो-खो असोसिएशन व सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशन यांच्या मान्यतेने ही स्पर्धा नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर ५ जूनपर्यंत होणार असल्याची माहिती किरण स्पोर्ट्स क्लब तथा स्पर्धा समितीच्या अध्यक्षा अलकाताई राठोड यांनी दिली.



यावेळी महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव, संदीप तावडे, स्पर्धेचे मार्गदर्शक सचिन चव्हाण, नागेश बिराजदार, सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे उपाध्यक्ष श्रीकांत ढेपे, स्पर्धा समितीचे सचिव मोहन रजपूत व असोसिएशनचे सचिव उमाकांत गायकवाड, सहसचिव राजाराम शितोळे आदी उपस्थित होते.

स्पर्धेसंबंधी अधिक माहिती सांगताना त्या म्हणाल्या, या स्पर्धेतील मैदानास स्वर्गीय अजितदादा क्रीडा नगरी असे नाव देण्यात आले आहे. या स्पर्धा सकाळी, सायंकाळी व रात्री विद्युत झोतात होणार आहेत. या स्पर्धेची तयारी पूर्ण झाली असून यासाठी चार मैदाने तयार करण्यात आली आहे. स्पर्धेचा उद्घाटन सोहळा दोन जून रोजी सायंकाळी पाच वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. स्पर्धेतील खेळाडूंची निवास व्यवस्था नेहरूनगर येथील जय जवान जय किसान सैनिक स्कूल आणि गांधी आश्रम शाळा येथे तर मुलींची व्यवस्था आयडियल स्कूलमध्ये करण्यात आली आहे. सर्वांची भोजन व्यवस्था सुंदर मल्टीपर्पज हॉलमध्ये केली आहे.

**महाराष्ट्राचे कुमार व मुली संघ निवडणार**

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव म्हणाले, या स्पर्धेत महाराष्ट्रातील २४ जिल्ह्यातील २४ कुमार व २४ मुलीचे असे ४८ संघातील खेळाडू,संघ व्यवस्थापक व प्रशिक्षक आणि पंच पदाधिकारी असे १ हजार सहभागी होणार आहेत. या स्पर्धेतून महाराष्ट्राचे कुमार व मुलीचे संघ निवडण्यात येणार असून हे संघ हिमाचल प्रदेश येथे होणाऱ्या ४५ व्या राष्ट्रीय अजिंक्यपद व कुमार व मुली गटाच्या स्पर्धेत भाग घेतील. कार्याध्यक्ष व सरचिटणीस यांच्यासह राज्याचे निवड समितीचे सदस्य श्रीरंग बनसोडे (सोलापूर), विशाल पाटील (जळगाव), यतीन आक्रे (पालघर), नंदिनी धुमाळ (मुंबई ) हे महाराष्ट्राचे कुमार व मुली संघ निवडतील.

# विधानपरिषद निवडणूक : स्वीकृत नगरसेवकांना मतदानाचा अधिकार

## ६१६ जण बजावणार मतदानाचा हक्क

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ मे-**


सोलापूर स्थानिक स्वराज संस्था विधान परिषद निवडणुकीसाठी जिल्हा परिषद, महापालिका आणि नगरपालिकेतील सर्व ४९ स्विकृत नगरसेवकांनाही मतदानाचा अधिकार राहणार आहे. या निवडणुकीसाठी स्विकृत नगरसेवकांसह मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी कार्तिकेयन यांनी दिली.

स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीत महानगरपालिका, नगरपालिका व नगरपरिषद येथे घेण्यात आलेल्या स्वीकृत सदस्यांना मतदानाच्या अधिकाराबाबत वरिष्ठांचे मार्गदर्शन मागविण्यात आले होते. वरिष्ठांनी दिलेल्या उत्तरानंतर जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी स्विकृत नगरसेवकांसह मतदार यादी प्रसिध्द केली. यामुळे स्वीकृत सदस्यांचा मतदानाचा मार्ग मोकळा झाला आहे.

स्थानिक स्वराज संस्था विधान परिषद निवडणुकीसाठी अधिसुचना प्रसिध्द करण्यात आली असून, फॉर्म विक्रीही सुरू आहे. यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी कार्तिकेयन



काम पाहात आहेत. आजतागायत ४४ अर्जांचीही विक्री झाली आहे. सोमवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस आहे. या निवडणुकीसाठी स्विकृत नगरसेवकांना मतदानाचा अधिकार असणार का? याबाबत वरिष्ठ कार्यालयाकडून मिळालेल्या मार्गदर्शनानंतर जिल्ह्यातील ६१६ मतदारांची यादी प्रसिध्द करण्यात आली. यामध्ये ४९ स्विकृत नगरसेवकांचाही समावेश आहे.



स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघाच्या विधान परिषद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया २५ मे पासून सुरू झाली आहे. महानगरपालिकेत स्वीकृत नगरसेवक म्हणून नऊ जणांची तर जिल्ह्यातील नगरपालिका व नगरपरिषदेत ४० जणांची स्वीकृत नगरसेवक म्हणून निवड करण्यात आली आहे. या ४९ स्वीकृत नगरसेवकांना सोलापूर जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीत आता थेट मतदान करता येणार आहे.

### स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय मतदार संख्या

जिल्हा परिषद-६८, पंचायत समिती सभापती-११, सोलापूर महानगरपालिका -१०२ (स्वीकृत नगरसेवक-९), नगरपरिषद, नगरपंचायत सदस्य-३७४ (स्वीकृत -४०), नगरपरिषद, नगरपंचायत अध्यक्ष-१२. अशाप्रकारे जिल्हा परिषद, पंचायत समितीच ७९, सोलापूर महानगरपालिकेचे १११, नगरपरिषद नगरपंचायतचे ४२६ असे एकूण ६१६ मतदार.

### अशी असणार निवडणुकीची प्रक्रिया

दि.२५ मे ते १ जून या कालावधीत शासकीय सुट्टीचे दिवस वगळून सकाळी ११ ते दुपारी ३ या कालावधीत जिल्हाधिकारी कार्यालयात उमेदवारी अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. अर्जाची किंमत शंभर रुपये असून, खुल्या प्रवर्गासाठी अनामत रक्कम दहा हजार तर मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी अनामत रक्कम पाच हजार रुपये आहे.

### प्रांताधिकारी कार्यालयात मतदान तर नियोजन भवनात मतमोजणी

विधान परिषद निवडणुकीसाठी जिल्ह्यातील सहा प्रांताधिकारी कार्यालयात मतदान केंद्राची निर्मिती करण्यात आली आहे. या निवडणुकीसाठी १८ जून रोजी सकाळी आठ ते दुपारी चार या वेळेत मतदान होणार आहे. २२ जून रोजी जिल्हा नियोजन भवन येथे या निवडणुकीची मतमोजणी होणार आहे.

### मतदान व मतमोजणीच्या दिवशी ड्राय डे

विधान परिषद निवडणुकीसाठी १८ जून रोजी मतदान होत आहे. तर निवडणुकीची मतमोजणी २२ जून रोजी होणार आहे. निवडणूक शांततेत पार पडावी यासाठी मतदान व मतमोजणीच्या दिवशी शहर-जिल्ह्यात ड्रायडे घोषित करण्यात आला आहे.

### बॅलेट पेपरवर पसंती क्रमांकानुसार मतदान

या निवडणुकीसाठी ईव्हीएम मशीन वापरण्यात येणार नाही. ही निवडणूक बॅलेट पेपरवर पसंती क्रमांकानुसार मतदारांना मतदान करून ते मतपेटीत टाकावे लागणार आहे. या निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू झाली असून ती २५ जून पर्यंत लागू राहणार आहे.

## महत्वाचे...

### श्री हिराचंद नेमचंद वाचनालयातर्फे २ जूनला 'चंदेरी आठवणींची रीळं' कार्यक्रम

**सोलापूर, दि. २९ मे-**

श्री हिराचंद नेमचंद वाचनालय सोलापूर यांच्या वतीने मंगळवार दि. २ जून रोजी सायंकाळी ६ वाजता लोकमान्य टिळक सभागृहात 'चंदेरी आठवणींची रीळं' हा दृकश्राव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम मंजुषा गाडगीळ सादर करणार असून रुद्रेश व्हदलुरे यांचे तांत्रिक सहकार्य मिळणार आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून रसिक श्रोत्यांना उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.

### पुण्याच्या प्रवाशाचा मोबाईल चोरीस

**सोलापूर, दि. २९ मे-**

गावी जाण्यासाठी बस स्थानकावर आलेल्या एका प्रवाशाच्या खिशातील मोबाईल अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना सोलापूर एसटी बस स्थानकावर गुरुवारी दुपारी घडली. दरम्यान या प्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत वसंत इस्माईल कांबळे ( रा-बी/४ प्लॉट नं ३०१ , आनंदग्राम सोसायटी, पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी हा गुरुवारी दुपारी एस.टी. स्टॅन्ड वर उभा असताना कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीच्या खिश्यातील १५ हजार रुपये किमतीचा पिस्ता रंगाचा विवो लाईट मोबाईल फिर्यादीच्या नकळत चोरून नेण्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस हवालदार भद्रशेट्टी हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहे.

### आमचे काम का सोडले म्हणून तरुणास जीवे मारण्याची धमकी

**सोलापूर, दि. २९ मे-**

आमचे काम का सोडले म्हणून एका तरुणास लाकडाने मारून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी विजापूर नाका पोलीस ठाण्यात दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला. पप्पू पूर्ण नाव माहित नाही आणि एक अज्ञात व्यक्ती (रा.माहित नाही) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत अनिल रामविलास कुमार (रा. अत्तार नगर सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. वरील आरोपींनी यातील फिर्यादीला दि २७ मे रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास अत्तार नगर येथे बोलावून घेतले व आमचे काम का सोडले म्हणून लाकडी काठीने पाठीवर , पायावर मारून जखमी केले व तुला सोडत नाही अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस हवालदार गायकवाड हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.




### शिखर पहारिया फाउंडेशनतर्फे आज समाजोपयोगी उपक्रम

**सोलापूर, दि.२९ मे-**

राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त शिखर पाहारिया फाउंडेशनच्या वतीने शनिवार, दि.३० मे २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता हॉटेल ऐश्वर्या येथे विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येणार आहे, अशी माहिती फाउंडेशनचे राज सलगर यांनी दिली. वंचित, दुर्बल घटकांना सक्षम करण्याच्या उद्देशाने योजिलेल्या या उपक्रमांतर्गत गरजू व निराधार महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी १० शिलाई मशीनचे वाटप करण्यात येणार आहे. अनाथ विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे यासाठी १० विद्यार्थ्यांना सायकलींचे वितरण करण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.




### अकरावी प्रवेशाची पहिली गुणवत्ता यादी जाहीर

**सोलापूर, दि.२९ मे-**

इयत्ता अकरावी प्रवेश प्रक्रियेची पहिली गुणवत्ता यादी शुक्रवारी जाहीर झाली असून, शहरातील प्रमुख महाविद्यालयांमध्ये विज्ञान शाखेसाठी मोठी चुरस पाहायला मिळाली. विशेषतः विज्ञान शाखेच्या कट ऑफने ऐंशी टक्क्यांचा टप्पा पार केल्याने विद्यार्थ्यांमध्ये प्रवेशासाठी तीव्र स्पर्धा निर्माण झाली आहे. वालचंद कला व शास्त्र महाविद्यालयात विज्ञान शाखेच्या अनुदानित विभागासाठी ८२.२० टक्के गुणांवर प्रवेश बंद झाले असून विनाअनुदानित विभागासाठी ७४ टक्के कट ऑफ लागला आहे. कला शाखेसाठी येथे ३५.२० टक्के गुणांवर प्रवेश क्लोज झाले आहेत.दयानंद महाविद्यालयात विज्ञान शाखेचा कट ऑफ ८१.८० टक्क्यांवर गेला असून कला शाखा ६०.४० टक्क्यांवर बंद झाली आहे. मुलींसाठी स्वतंत्र कट ऑफ अधिक राहिला असून विज्ञान शाखेसाठी ८५.२० टक्के तर कला शाखेसाठी ६६.८० टक्क्यांवर प्रवेश बंद झाले आहेत. संगमेश्वर महाविद्यालयात विज्ञान शाखा ८० टक्क्यांवर बंद झाली असून कन्नड भाषिक विद्यार्थ्यांसाठी ७० टक्के कट ऑफ राहिला आहे. वाणिज्य शाखेसाठी ६० टक्के तर कन्नड भाषिक विद्यार्थ्यांसाठी ५० टक्के गुणांवर प्रवेश क्लोज झाले. कला शाखेसाठी येथे थेट प्रवेश प्रक्रिया सुरू असल्याची माहिती देण्यात आली. अकरावी प्रवेशासाठी जिल्ह्यातील आतापर्यंत सुमारे ४३ हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली आहे. पहिल्या गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांना ३ जूनपर्यंत संबंधित महाविद्यालयात प्रवेश निश्चित करावा लागणार आहे. पहिल्या प्रवेश फेरीत महाविद्यालय मिळालेल्या विद्यार्थ्यांनी 'प्रोसिड फॉर ॲडमिशन' या पर्यायावर क्लिक करून प्रवेश निश्चित करणे आवश्यक आहे. अकरावी प्रवेशाची दुसरी फेरी ५ जूननंतर जाहीर होणार असून त्यानंतर उर्वरित तीन फेऱ्यांच्या याद्याही टप्प्याटप्प्याने प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. सर्व प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर १ जुलै किंवा १५ जुलैपासून अकरावीचे नियमित वर्ग सुरू करण्याचे नियोजन माध्यमिक शिक्षण विभागाने केले आहे.

## तेलुगु ग्रंथालयात तेलुगु भाषा प्रशिक्षण वर्गाचा समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ मे-**

एन.टी.आर अभिमान संघम, तेलुगु भाषा अभिवृद्धी सार्वजनिक ग्रंथालयम यांच्या वतीने विनायक दामोदर सावरकर यांची १४३ वी जयंती, सुरवरम प्रताप रेड्डी यांची १३० वी जयंती आणि एन.टी. रामाराव यांची १०३ वी जयंती दिन व तेलुगु भाषा प्रशिक्षण समारोप खासदार प्रा.डॉ.ज्योती वाघमारे, पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड.श्रीनिवास क्यातम यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.

कुचन प्रशाला तेलुगु विभागातील इ.१० वी उत्तीर्ण प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेले विद्यार्थी, ग्रंथालयला ३० तेलुगु-मराठी पुस्तके भेट दिलेले जनार्दन इंजामुरी, प्रशिक्षण शिबीरासाठी सहाय्य केलेले बालराज



बोल्ली, तेलुगु प्रशिक्षण दिलेल्या राजलक्ष्मी गाडपल्ली यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी रविंद्र तुमनपल्ली यांनी एन.टी. रामराव यांची दोन तेलुगु गीते तर रविंद्र सामल यांनी एक हिंदी गीत सादर केले.

ग्रंथालयाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन कमटम यांनी प्रास्ताविक केले. कवयित्री रेणुका बुधारम यांनी सूत्रसंचालन केले. कवी प्रा.नरेंद्र गुंडेली यांनी आभार मानले. यावेळी तिपण्णा गणेरी, प्रभाकर भिमनाथ, श्रीनिवास यनगंदूल, श्रीनिवास गाली, विजयालक्ष्मी गुडूर, संजीव नादरगी, गोवर्धन कमटम, पेंटप्पा गड्डम, पुरुषोत्तम बुधारम, गड्डम पी.वाय, शंकर द्यावरकोंडा, बाळकृष्ण आंबट, श्रीनिवास गणेरी, राजू बिंगी, सोमनाथ वंगा, श्रीनिवास लगशेट्टी, चिट्ठीपाक, रमेश वंगा, श्रीनिवास कोंडा, नागेश गडगी, नारायण गजेली, गुरुप्रसाद दुस्सा, शेखर नल्ला, मनोज खर्रे, राहुल दिंकोडा, तिमप्पा गडगी, ईरण्णा भंडारी, श्रीनिवास गोसकी, श्रीपत चिंता उपस्थित होते.

## कोणताही तोडगा निघाला नाही; पाचव्या दिवशीही शेतकऱ्यांचे उपोषण सुरुच

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मे-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील धोत्री येथील गोकुळ साखर कारखाने शेतकऱ्यांचे १३० कोटी रुपयांची ऊस बिल थकविले आहे. त्यामुळे सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आक्रमक होत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे. आज पाचव्या दिवशीही याप्रकरणी कोणता तोडगा न निघाल्याने शेतकऱ्यांनी आपले आंदोलन सुरूच ठेवले आहे.

शेतकऱ्यांची ऊस बिले देण्यासाठी साखर कारखान्याकडून वेळ मागण्यात आला आहे. आरआरसीची कारवाई करून शेतकऱ्यांना त्यांच्या रकमा देण्यासाठी सुमारे दोन महिन्याचा



कालावधी लागणार असल्याची भूमिका तहसीलदार जमदाडे यांनी घेतली आहे. त्यामुळे जोपर्यंत पैसे मिळत नाहीत तोवर आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्णय शेतकऱ्यांनी घेतला आहे.

दरम्यान, आमदार प्रवीण स्वामी यांच्यासह शेतकरी संघटनेचे पदाधिकाऱ्यांनी आंदोलन शेतकऱ्यांची भेट घेतली. यावेळी अरविंद घोडके, अंबादास शिवशंकर, सचिन जवळगे, प्रशांत सुरवसे, गणेश नरे आणि तीस गावातील शेतकरी उपस्थित होते.

## सोमवारपर्यंत सुरु राहणार फन फेस्टिवल : आ.कोठे

**सोलापूर, दि. २९ मे-**

आमदार देवेंद्र कोठे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या अर्बन स्ट्रीट पार्कमध्ये सोलापूरकरांसाठी पर्वणी ठरलेल्या फन फेस्टिवल आनंद मेळाव्याचा हजारो सोलापूरकर आनंद घेत आहेत. शासकीय तंत्रनिकेतन व नवीन अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या लगत असलेल्या अक्कलकोट रस्ता पाणी टाकीजवळ सोमवारपर्यंत हा फन फेस्टिवल आनंद मेळावा होत आहे. या मेळाव्याचे उद्घाटन आमदार देवेंद्र कोठे आणि महापौर विनायक कोंड्याल यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. फन फेस्टिवल आनंद मेळाव्याच्या पहिल्याच दिवशी सुमारे दोन हजार सोलापूरकरांनी या मेळाव्याला भेट देऊन आनंद लुटला. या आनंद मेळाव्यात बाळ गोपाळांना खेळण्यासाठीचे साहित्य मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहे. विशेष म्हणजे अर्बन स्ट्रीट पार्कमध्ये आलेल्या सोलापूरकरांना खाद्यपदार्थांची मेजवानी मिळावी याकरिता कर्णिक नगर परिसरातील भेळ, पाणीपुरी, चटणी पुरी, पॅटीस, दहीवडा, कचोरी, बटाटेवडा अशा अनेक खमंग पदार्थांची विक्री करणाऱ्या विक्रेत्यांना आवाहन करून जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## मित्राच्या खूनप्रकरणी तिघांना १ जूनपर्यंत पोलिस कोठडी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ मे-**

मागील भांडणाचा राग मनात धरुन डोक्यात दगड घालून प्रथमेश बबन गायके (वय-१९, रा.रविंद्र नगर, ताई चौक, सोलापूर) या मित्राचा खून केल्याप्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी चार मित्रांना अटक केली आहे. त्यांना न्यायालयासमोर उभे केले असता त्यापैकी तिघा जणांना १ जूनपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली. अजय सुनील जाधव उर्फ घाटोळे (वय-२५, रा.ताई चौक, नई जिंदगी, सोलापूर), पियूष उर्फ पिन्या पप्पू गायकवाड (वय-२१, रा.देसाई नगर, नई जिंदगी, सोलापूर), साहिल रहमान



शेख (वय-२३, रा.नई जिंदगी, सोलापूर) अशी त्यांची नावे आहेत. आणखीन एक जण अल्पवयीन असल्याने त्याला बालसुधार गृहात ठेवण्यात आले.

मृत प्रथमेश हा पेटींगचे काम करत होता. बुधवारी सुट्टी असल्याने तो दिवसभर यातील आरोपी मित्रांसोबत फिरायला गेला, रात्री उशीरा घरी आला. त्यानंतर तो गुरुवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास घरातून गेला होता. दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास त्याचा मृतदेह ताई चौकातील काटेरी झुडूपात आढळून आला होता. दरम्यान, त्याचे वडील बबन हरी गायके (वय-४२, रा.ताई चौक, रविंद्र नगर, सोलापूर) हे रिक्षा चालवत घराकडे जात असताना त्यांना ही माहिती मिळाली.

त्यानुसार त्यांनी घटनास्थळी जाऊन पाहिले असता प्रथमेश हा रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. त्यांनी मुलाला शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. याबाबत बबन गायके यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपींना एमआयडीसी पोलिसांनी अटक केली.

## पंढरपूरच्या 'कॉरिडॉर'ला 'टाईम बॉन्ड' असल्याने आचारसंहिता शिथील व्हावी

### जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांचे निवडणूक आयोगाला पत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मे-**

पंढरपूर कॉरिडॉर प्रकल्पाच्या सर्वेक्षणाला गती देण्यासाठी आणि भूसंपादनाचा तांत्रिक आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी राज्य निवडणूक आयोगाकडे विधान परिषद निवडणुकीतील आचारसंहिता शिथिल करण्याची मागणी एका पत्रान्वये केली आहे. दरम्यान, निवडणूक आयोगाकडून त्याबाबत उत्तर आले नसल्याची माहिती मिळाली.



राज्याच्या मंत्रिमंडळाने पंढरपूर कॉरिडॉर आणि विकास आराखड्यास ४,१३० ते ४,१५० कोटी रुपयांच्या प्रकल्पास मंजुरी दिली. भूसंपादनाची प्रक्रिया १ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. हा प्रकल्प ३० महिन्यांत पूर्ण करण्याचे नियोजन आहे, तरीही काही स्थानिक व्यापारी आणि वारकऱ्यांचा या कॉरिडॉरला विरोध कायम आहे.

या प्रकल्पास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत झालेल्या मंत्रिमंडळ शिखर समितीच्या बैठकीत या कॉरिडॉर प्रकल्पाला अंतिम मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे असंख्य भाविकांत समाधानाचे वातावरण आहे. या प्रकल्पाचा एकूण खर्च सुमारे ४,१५० कोटी रुपयांच्या घरात असून, प्रशासनाने हे काम ३० महिन्यांत पूर्ण करण्याचे ध्येय निश्चित केले आहे. भूसंपादन प्रक्रिया गतीने पूर्ण करून १ ऑगस्टपर्यंत ती पूर्ण करण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाला देण्यात आले आहेत. वेळ कमी पडू नये म्हणून जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी एक पत्र राज्य निवडणूक आयोगाला पाठवून



या प्रकल्पासाठी आचारसंहिता शिथील करण्याची मागणी केली आहे. प्राचीन मठ आणि मंदिरे नष्ट होऊ नयेत यासाठी वारकरी आणि स्थानिकांकडून या प्रकल्पाला विरोध होत आहे दुसरीकडे, जिल्हा प्रशासनाने कॉरिडॉरचे काम कोणत्याही परिस्थितीत पूर्ण करण्याबाबत ठाम भूमिका घेतली आहे.

तत्कालिन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनीही या कॉरिडॉर प्रकल्पासाठी चांगलाच पाठपुरावा केला होता. त्यांनी स्थानिक व्यापारी, मठाधिपती यांना विश्वासात घेवून त्यांच्या २ दिवस सलग समस्या जाणून घेत जागेचा चांगला मोबदला देण्याचा आणि सर्वांना विश्वासात घेवूनच हा प्रकल्प मार्गी लावणार असल्याची ग्वाहीही दिली होती. विद्यमान जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनीही याच विचारधारेने कॉरिडॉरचे काम चालू केले असल्याचे दिसून येत आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**

● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## कॅनॉलचे पाणी नियमितपणे मिळत नसल्याने तांदूळवाडीच्या शेतकऱ्यांचे आंदोलन

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २९ मे : लातूर जिल्ह्यातील लातूर कळंब रोडवरील तांदूळवाडी येथील मांजरा पट्टा परिसरात शेतकऱ्यांच्या शेतीसाठी कळंब धरणातून कॅनॉलद्वारे पाणीपुरवठा केला जातो. मात्र प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे मागील दहा वर्षांपासून संबंधित भागातील अनेक शेतकऱ्यांना कॅनॉलचे पाणी नियमितपणे मिळत नसल्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे.

या समस्येमुळे काडगाव, मांजरी, साखरा, तांदूळवाडी,हरंगुळ आणि जेवळी या गावांतील शेतजमीन धारक शेतकरी मोठ्या प्रमाणात अडचणीत आले असून, याच पार्श्वभूमीवर तांदूळवाडी येथील कॅनॉल परिसरात शेतकऱ्यांनी आंदोलन केले. या आंदोलनावेळी मांजरा प्रकल्पाचे निकम हे घटनास्थळी उपस्थित राहिले. त्यांनी शेतकऱ्यांच्या सर्व समस्या व मागण्या ऐकून घेतल्या. तसेच जिल्हास्तरीय अधिकारी व संबंधित विभागातील पाटील यांच्याशी सखोल चर्चा करून येत्या दोन दिवसांत कॅनॉलद्वारे पाणी सोडण्याचे आश्वासन दिले.

यावेळी शेतकऱ्यांनी स्पष्ट इशारा दिला की, जर दि. ३० पर्यंत पाणीपुरवठा सुरू झाला नाही तर त्यानंतर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. आंदोलनादरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस विभागाकडून एपीआय केंद्रे व त्यांच्या सहकाऱ्यांचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. या आंदोलनात प्रमुख ॲड. गणेश गोमचाळे, बोराडे नाना, तानाजी कोद्रे, प्रकाश गोमचाळे, काकाजी मोरे, सुशील कोद्रे, ओम कोद्रे, काडगाव व तांदूळवाडीचे सरपंच तसेच परिसरातील अनेक शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी हा लढा सुरू राहील, असा निर्धार उपस्थित शेतकऱ्यांनी व्यक्त केला.



## आचारसंहितेमुळे १ जून रोजीचा जिल्हास्तरीय लोकशाही दिन स्थगित

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २९ मे : लातूर जिल्ह्यात दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित करण्यात येणारा जिल्हास्तरीय लोकशाही दिन स्थगित करण्यात आला आहे.

सद्यस्थितीत महाराष्ट्र विधान परिषदेच्या उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूक-२०२६ ची आदर्श आचारसंहिता लागू आहे. या आचारसंहितेच्या अंमलबजावणीमुळे आगामी सोमवार, १ जून २०२६ रोजी जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजित केला जाणार नाही, अशी माहिती लातूरचे प्रभारी उपजिल्हाधिकारी (सामान्य) गणेश पवार यांनी दिली आहे.

## तातडीच्या दुरूस्तीसाठी उद्या शहराच्या काही भागाचा वीज पुरवठा बंद

तभा वृत्तसेवा

लातूर,दि.२९ मे : शहराला वीजपुरवठा करणाऱ्या उपकेंद्रातील तातडीच्या देखभाल व दुरूरूतीच्या कामाकरिता १३२ केव्ही एमआयडीसी अतिउच्च दाब उपकेंद्रातून वीजपुरवठा होणाऱ्या ३३ केव्ही बांधकाम भवन फिडर तसेच ११ केव्ही मारूती फेट्रो व दयानंद फिडर, ३३ केव्ही कीर्ती ऑईल फिडरवरील परिसराचा वीज पुरवठा उद्या ( रविवार दि. ३१मे) सकाळी ०७ ते ११ या दरम्यान बंद राहील. वेळेत काम पुर्ण झाल्यास त्वरीत वीज पुरवठा पुर्ववत सुरू करण्यात येईल. शहर शाखा क्रमांक ७ अंतर्गत येणाऱ्या ११ केव्ही बांधकामभवन फीडर वरील माणिकराव जाधव मंगल कार्यालय, पांडुरंग नगर, संस्कृती नगर, कन्हैया नगर,गोपाळ नगर, गोविंदा बार, रविशंकर शाळा, उत्तरादी मठ, राजनंदा शाळा, वासणगाव रोड, रामगिरीनगर, दालचिनी हॉटेल, परिवार सोसायटी, फेरे डीपी, कृषी नगर, अयोध्या कॉलनी, तेरणा कॉलनी,सह्याद्री हॉस्पिटल, शाहूपुरी कॉलनी, यमुना सोसायटी, कोकाटे नगर, गुणगुणे नगर, आरजे कॉम्प्लेक्स, ड्रायव्हर कॉलनी, इंजिनिअरिंग कॉलनी, पत्तेवार कॉलनी, आदर्श कॉलनी, गणेशनगर, देशपांडे कॉलनी, जुना औसा रोड, लक्ष्मी कॉलनी, महसूल कॉलनी, विठ्ठल नगर इत्यादी भागातील वीज पुरवठा सकाळी ७ ते ११ वाजेपर्यंत बंद राहील. शहर शाखा क्रमांक ०९ अंतर्गत येणाऱ्या ११ केव्ही दयानंद फिडरवरील प्रकाश नगर (पुर्व व पश्रिचम बाजू),कपिल नगर, खाडगाव रोड वरील पुर्व व पश्रिचम बाजू, पारिजात सोसायटी, तुळजाई हॉस्पिटलजवळील एरिया, एमएसईबी कॉलनी, खाडगाव रोड स्मशान भूमी पाठीमागील बाजू, जिजामाता नगर,सरस्वती शाळेजवळील एरिया, राम रहीम नगर, सदाशिवनगर, इंदिरा गांधी शाळेजवळील एरिया,साठे वीट भट्टी जवळील भाग, प्रकाश नगर रोडवरील पूर्व बाजू व पश्रिचम बाजू पुर्ण, ज्ञानदेवमंगल कार्यालय, भक्ती शक्ती मंगल कार्यालय, भगवान शाळा, पार्क स्ट्रीट, गिरवलकर नगर,अमलेश्र्वर नगर, पंचवटी नगर, चौधरी नगर, पठाण नगर, विकास नगर, गित्ते मॅडम डीपी, न्यूभाग्य नगर, वाल्मिकी नगर, ओल्ड रेल्वे लाईन वरील उत्तर व दक्षिण बाजू, नरहरे क्लासेसजवळील भाग, जी एस पाटील मळा, दयानंद कॉलेज, खाडगांव रोड ची पश्रिचम बाजू, इत्यादी भागातीलवीज पुरवठा सकाळी ७ ते ११ या दरम्यान बंद राहील. ११ केव्ही कीर्तीऑईल फिडर वरील कीर्ती ऑईलमील, बाई काकाजी, इंदिरा सुत गिरणी, अरोमा हॉटेल, टेक्सटाइल झोन, कल्याणी इंडस्ट्री, डॉ. कॉलनी परिसराचा तसेच ११ केव्ही मारुती फेत्रो केमिकल फिडरवरीलमारुती फेट्रो केमिकलचा वीजपुरवठा सकाळी ७ ते ११ या काळात बंद राहील. वीजग्राहकांनी सदरील वेळेची दखल घेत सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

# संघर्षातून उभं राहिलेलं नेतृत्व आ. रमेशअप्पा कराड

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार रमेशअप्पा कराड यांचा वाढदिवस म्हणजे केवळ शुभेच्छांचा दिवस नसून, संघर्ष, संवेदनशीलता आणि जनतेप्रती असलेल्या बांधिलकीचा प्रवास स्मरण करण्याचा क्षण आहे. राजकारणात प्रस्थापितांविरोधात रस्त्यावर उतरून लढणारे आणि गोरगरिबांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने झटणारे नेतृत्व म्हणून रमेशआप्पांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

जातीपातीच्या पलीकडे जाऊन सर्वसामान्य जनतेच्या मनात स्थान मिळवणारे आप्पा हे मितभाषी, शांत आणि सकारात्मक विचारांचे लोकनेते आहेत. रक्ताच्या नात्यापेक्षा मैत्रीचं नातं श्रेष्ठ हे त्यांनी आपल्या वागणुकीतून दाखवून दिले. त्यामुळे लातूर-रेणापूर ग्रामीण भागातील अठरापगड जातीधर्मातील लोक त्यांच्यावर मनापासून प्रेम करतात.

रामेश्र्वर हे मूळ गाव असले तरी लातूर शहरात स्थायिक झाल्यानंतर समाजकारण आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम त्यांच्या जीवनात दिसून आला. वारकरी संस्कार लाभलेल्या कराड कुटुंबातून आलेल्या आप्पांवर कै. प्रयाग आक्का आणि विश्र्वशांतीचे प्रणेते डॉ. विश्र्वनाथ कराड यांचे संस्कार झाले. एमआयटी वैद्यकीय महाविद्यालयाच्या उभारणीतही त्यांचे योगदान उल्लेखनीय राहिले.

राजकारणात सहज यश मिळत नाही. त्यासाठी संघर्ष करावा लागतो. लातूर जिल्ह्यातील प्रस्थापित राजकारणाविरोधात



रमेशआप्पांनी सातत्याने आवाज उठवला. सुरुवातीला शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली काम केल्यानंतर स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन ते भाजपात सक्रिय झाले आणि मागील २५ वर्षांपासून संघटनात्मक कामात स्वतः ला झोकून दिले.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न, सामान्य जनतेवरील अन्याय, बंद दरवाज्यांआड चालणारी सत्तेची दादागिरी याविरोधात त्यांनी सातत्याने संघर्ष केला. आमदार होण्यापूर्वीच त्यांनी जनतेच्या मनात स्थान निर्माण केले होते. विधान परिषद सदस्य असताना देखील त्यांनी रस्ते, मूलभूत सुविधा आणि विकासकामांसाठी मोठा निधी आणून मतदारसंघात कामांची गती वाढवली.

**राम कुलकर्णी**
**भाजपा प्रदेश प्रवक्ता**

रमेशआप्पांची आणखी एक मोठी ओळख म्हणजे त्यांची सामाजिक आणि धार्मिक बांधिलकी. गावागावांत सामाजिक सभागृह, मंदिर परिसर विकास, भजनी मंडळांना टाळ-मृदंग-वीणा वाटप, गणेशोत्सवासाठी गणपती वाटप, वृक्षलागवड अभियान अशा अनेक उपक्रमांतून त्यांनी संस्कारक्षम समाज उभा करण्याचा प्रयत्न केला. वारकरी संप्रदायाबद्दल असलेली त्यांची आस्था आजही तितकीच दृढ आहे.

एमआयटी रुग्णालयाच्या माध्यमातून गोरगरिबांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे, मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया, रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी शिबिरे यांसारख्या उपक्रमांमुळे हजारो कुटुंबांना आधार मिळाला. परोपकार हाच धर्म ही भावना त्यांच्या प्रत्येक कृतीत दिसून येते.

राजकारणात अनेकदा स्वार्थ, दिखावा आणि वैयक्तिक वैर पाहायला मिळते. पण रमेशआप्पांच्या स्वभावात द्वेष नाही, सूडभावना नाही. माझी जनता, माझी माणसं ही भावना जपत त्यांनी माणुसकीचं नातं जोपासलं. त्यांचा २४ तास सुरू असलेला जनसंपर्क दरबार सामान्य माणसासाठी आशेचा किरण ठरतो.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली काम करताना सर्व समाजघटकांना सोबत घेऊन विकासाची वाटचाल करणे हे त्यांनी कायम प्राधान्याने जपले. पंकजाताई मुंडे यांच्या कुटुंबीयांशी असलेला त्यांचा जिव्हाळा आणि संघटनात्मक निष्ठा ही त्यांची वेगळी ओळख आहे.

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत जनतेने त्यांच्यावर दाखवलेला विश्र्वास हा माणुसकी, विकास आणि संघर्षशील नेतृत्वाचा विजय होता. आजच्या काळात जातीपातीच्या पलीकडे जाऊन माणूसकी श्रेष्ठ हे सिद्ध करणारे नेतृत्व म्हणून रमेशअप्पा कराड यांच्याकडे पाहिले जाते.

वाढदिवसानिमित्त त्यांना निरोगी, दीर्घायुष्य लाभो आणि समाजकारणाचा हा प्रवास अधिक बळकट होवो, हीच सदिच्छा!!

# जनसंपर्कातून जनविश्वास जपणारा नेता

## जनतेसाठी दरबार भरवणारा आमदार रमेशअप्पा कराड

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीत बहाद्दर मतदारांनी ऐतिहासिक नवा इतिहास घडविला मा. रमेशअप्पा कराड साहेब यांना विधानसभेत पाठवून जनतेनी जनहितासाठी नेता निवडला. आमदार झाल्याने त्यांच्यात कसलाही बदल झाला नाही आजच्या बदलत्या काळात एकमेकांचा संवाद कमी होत असताना रमेशअप्पा मात्र सर्वसामान्यांच्या थेट संपर्कात आहेत. संवाद कार्यालयात दिवसभर भेटण्याकरिता उपलब्ध असतात. त्यांना भेटण्यासाठी कोणाच्या मध्यस्थीची गरज नाही हे विशेष. लातूर ग्रामीण मतदारसंघ हेच माझे कुटुंब याच भावनेतून त्यांनी आमदारकीच्या माध्यमातून गोरगरीब सर्व सामान्यांच्या डोळ्यातील अश्रु पुसण्याचा प्राधान्याने प्रयत्न केला. जनता दरबारातून जनतेचे प्रश्र्न मार्गी लावले. गावा गावात, वाडीवस्तीत विकास कामासाठी कोट्यावधीचा निधी मिळवून देऊन गाव खेड्यात विकास काय असतो हे दाखवून दिले दिले. सामान्य कार्यकर्त्यांना मानसन्मान मिळवून देणारे संघर्षशील नेतृत्व मा. आ. रमेशअप्पा कराड साहेब यांचा आज जन्मदिवस. यानिमित्ताने त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा !!!...... चंद्रकांत कातळे, रेणापूर.

काबाड कष्ट करणाऱ्या शेतकरी, शेतमजूरांच्या घामाचे मोल झाले पाहिजे; सर्व सामान्यांना, गोरगरीबांना त्यांचा न्यायहक्क मिळाला पाहिजे यासाठी सतत संघर्ष करणारे आणि लातूर ग्रामीण मतदारसंघ हेच माझे कुटुंब या भावनेतून कार्यरत असणारे भाजपाचे नेते मा. रमेशअप्पा कराड साहेब हे जनसामान्यांच्या मनातील संघर्षशील आणि विश्र्वासपात्र नेते आहेत. गेल्या विधानसभा निवडणुकीत बहाद्दर मतदारांनी ग्रामीण मतदारसंघातून रमेशआप्पांना बहुमताने विजयी करून एक नवा इतिहास घडविला. खऱ्या अर्थाने हा विजय आप्पांचा नव्हे तर सर्वसामान्य अठरापगड गोरगरीब जनतेचा असं म्हटलं तर वावगं ठरणारे नाही.

जनतेनी निवडलेला नेता

लातूर तालुका हा काँग्रेसचा बालेकिल्ला या भागात भाजपाचे काम करणे तसे अवघडच होते, मात्र जिद्दीने जोमाने जिवाभाचे कार्यकर्ते निर्माण करुन त्यांच्या सुख दुःखात सहभागी होऊन प्रस्थापित शक्ति विरुद्ध सतत संघर्ष करत रमेशअप्पा कराड यांनी कार्यकर्त्यांचे जाळे निर्माण करुन भाजपाचे आणि स्वतःचे अस्तित्व उभे केले. आ. रमेशअप्पा यांची जिद्द, आत्मविश्र्वास, चिकाटी आणि कठोर परिश्रम करण्याची तयारी अनेकवेळा अनुभवायला मिळाली. मागील दोन विधानसभा निवडणुकीत पराभूत झाले मात्र कधीच खचले नाही. खचले ते आप्पा कसले पराभव झाल्याच्या दुसऱ्या दिवशीपासून पुन्हा त्याच उमेदीने गोरगरीब सर्वसामान्य माणसाच्या हितासाठी कार्यरत राहीले. याचा परिणाम गेल्या विधानसभा निवडणुकीत दिसून आला. जनतेनीच ही निवडणूक हातात घेतली आणि धनशक्ती, एकाधिकारशाही, हुकूमशाही विरुद्ध आवाज उठवून लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात नवा इतिहास घडविला आणि रमेशआप्पांना विधानसभेत पाठविले. हक्काचा आमदार निवडून आणला. खऱ्या अर्थाने जनतेने जनहितासाठी नेता निवडला असे बोलले तर वावगे ठरणारे नाही.

जनतेच्या कायम संपर्कात

एखादा माणूस कुठल्याही पदावर निवडून गेला तर त्याच वागणं, त्याच राहणं, सामान्यांना कमी भेटणं, भेटायचं असेल तर वेळ



घ्यावा लागतो असा खूप मोठा बदल झालेला आपणास पहावयास मिळतो. मात्र याला अपवाद ठरले ते रमेशअप्पा कराड. सर्वसामान्याच्या हितासाठी, अडचणीत सापडलेल्या, पिचलेल्या माणसाचे प्रश्र्न सुटले पाहिजेत, त्यांच्या डोळ्यातील अश्रू पुसता आले पाहिजे याच भावनेतून पदावर असो अथवा नसो रमेशआप्पांचे कार्य गेली वर्षानुवर्ष सुरू आहे. आमदार झाल्यानंतर त्यांच्यात कसलाही बदल झाला नाही उलट ज्या माणसांनी माझ्यावर विश्र्वास ठेवला मला मतदान रुपी आशीर्वाद दिले त्यांचे प्रश्र्न सोडवता यावेत त्यांच्या अडचणीत मदत करता यावी केवळ यासाठीच संवाद संपर्क कार्यालय सुरू केले.

**चंद्रकांत सुर्यकांत कातळे**
**भारतीय जनता पार्टी, रेणापूर.**

बदलत्या काळात संवाद कमी होत असताना या संवाद कार्यालयाच्या माध्यमातून नियमितपणे सकाळी आकरा पासून रात्री किमान आठ पर्यंत येणाऱ्या प्रत्येकाशी संवाद साधण्याचा रमेशअप्पा प्रयत्न करतात. एवढेच काय तर कधीही रात्री अपरात्री सधा फोन करून कुणीही आप्पाशी संवाद साधू शकतो, बोलू शकतो. आप्पांना भेटण्यासाठी कुण्या मध्यस्थीची गरज नाही. थेट सहज भेट होते. संवाद कार्यालयात आलेल्या प्रत्येकाना विचारपूस केली जाते चहापाणी दिले जाते, अडचणी समजून घेऊन लगेच रमेशअप्पा संबंधितांना फोन करून प्रश्र्नाची सोडवणूक करतात. येणारा प्रत्येकजण रिकाम्या हाताने परत जात नाही. ग्रामीण भागातून आलेल्या सामान्यांना भेटीची अपेक्षा असते चार शब्द बोलण्याची इच्छा असते हे सर्व सहज घडून येत असल्याने सर्वसामान्य माणसात आप्पाबद्दलची आस्था आपुलकी आणि जिव्हाळा अधिकच दृढ होत आहे.

निधी व विकास कामाचे नियोजन

आमदार, खासदार, जिल्हा परिषद सदस्य व नगरसेवक यांना मिळणाऱ्या स्थानिक विकास निधीच्या बाबतीत आजपर्यंत अनेकांना वेगवेगळे अनुभव आले आहेत बरेच जण टक्केवारी शिवाय निधीच देत नाहीत काही लोकप्रतिनिधी तर छुपी गुत्तेदारी करतात मात्र याला रमेशअप्पानी छेद देत आमदार निधी वाटप असो की शासनाकडून एखाद्या योजनेमार्फत मिळालेल्या विकास निधी असेल याबाबतीत गावनिहाय नियोजन करून त्या गावात कुठल्या कामाची गरज आहे त्यानुसार गावातील कार्यकर्त्यांनी एकत्र बसून काम कोण करणार हे निश्र्चित झाल्यास त्या व्यक्तीला निधी दिला जातो त्यानुसार त्या गावात विकासाचे काम होते. यामुळे कामाचा दर्जा, गुणवत्ता दिसून येते. रमेशआप्पांच्या या नियोजनामुळे मतदार संघातील प्रत्येक गावागावात वाडी वस्तीत आमदार निधी अथवा शासनाची कोणती ना कोणती योजना राबविण्यात आली आहे. आजपर्यंतच्या कुठल्याही विकास कामात कसल्याही प्रकारची अपेक्षा न ठेवता ग्रामीण भागाचा विकास झाला पाहिजे केवळ याच भावनेतून निष्कलंकपणे विकास कामा कडे लक्ष घालून कार्य केले आहे.

जनता दरबार भरवणारा नेता

सर्वसामान्य जनतेचे प्रश्र्न व्यथा आणि अडीअडचणी समजून घेता याव्यात त्यांच्याशी संवाद साधता यावा, ज्यांनी आपल्याला आशीर्वाद देऊन विधानसभेत पाठवले त्यांच्या प्रश्र्नाची सोडवणूक व्हावी याकरिता आ. रमेशअप्पा कराड साहेब यांनी जनता दरबार ही संकल्पना अत्यंत प्रभावीपणे राबवली. मतदार संघातील ममदापूर, मुरुड, रेणापूर, भादा व इतर ठिकाणी घेण्यात आलेल्या जनता दरबारास प्रचंड मोठा प्रतिसाद मिळाला. जिल्हा, तालुका स्तरावरील विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी आणि सर्व सामान्य जनता आमने-सामने आल्याने अनेक प्रश्र्न चर्चा झाली निकाली निघाले. अतिक्रमित शेतरस्ते, वीज प्रश्र्न, अवैध दारू, रस्त्याचे प्रश्र्न, पीक विमा, अनुदान, निराधारच्या पगारी, राशन दुकानचे प्रश्र्न, प्रवासी बस थांबे, घरकुल, स्मशानभूमी, कबाले यासह विविध वर्षानुवर्ष प्रलंबित असलेल्या समस्यांचा नागरिकांनी या दरबारात पाढा वाचला, गऱ्हाणे मांडले. संबंधित अधिकाऱ्यांना कर्तव्यात कसूर न करता सामान्यांचे प्रश्र्न सोडवा अशी सूचना करून आडवणूक केली तर माफ करणार नाही असा दम ही त्यांनी दिला. एकूणच सामान्यांच्या प्रश्र्नासाठी आग्रही राहून दिलासा देण्याचे काम आ. रमेशअप्पा कराड यांनी केले आहे. जनतेसाठी जनता दरबार भरवणारा नेता हीच भावना सामान्य जनतेतून दिसून आली.

मागील काळात झालेल्या विविध निवडणुकीत पक्षाला घवघवीत यश आणि सामान्य कार्यकर्त्यांना सन्मानाची पदे मिळवून दिली. केंद्रशासन आणि राज्यशासन यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा करून लातूर ग्रामीण मतदार संघातील गावागावात, वाडीवस्तीतील विविध गावच्या विकासासाठी कोट्यावधी रूपयाचा निधी मंजूर करून आणला. अनेक कामांना मंजूरी मिळवून घेतली. त्यातील अनेक कामे पूर्ण झाली आहेत, तर काही कामे प्रगतीपथावर आहेत हे खुप दिलासादायक आहे. मतदार संघातील गावागावात, वाडीवस्तीत आ. रमेशअप्पा कराड यांच्या माध्यमातून विविध मंदिरासमोर बांधण्यात आलेले सभागृह गावकऱ्यांना लक्षवेधी ठरत आहेत. लातूर ग्रामीण मतदारसंघ हेच माझे कुटुंब या भावनेतून काम करत असताना रमेशअप्पांनी जनहिताच्या विकास योजना मंजूर करताना गावागावात, वाडीवस्तीत कसल्याही प्रकारचा भेदभाव केला नाही. वैयक्तिक लाभाच्या योजना संपूर्ण मतदार संघात मोठ्या प्रमाणात गरजु लाभार्थ्यांना मिळवूण दिल्या मदत केली. या सर्व योजना राबवत असताना जात, धर्म, पंथ, गटतट असा भेदभाव केला नाही यातून वसुधैव कुटुंबकम् याचा प्रत्यय दिसून आला.

आध्यात्मिक, सामाजिक, शैक्षणिक कार्यासह राजकारणात सतत अग्रेसर राहून आपल्या कामाचा वेगळा ठसा निर्माण करणारे, गोरगरीब सर्व सामान्यांच्या हितासाठी संघर्ष करणारे, राजकारण आणि त्यातून मिळालेली पदे स्वताःसाठी नव्हे तर समाजाला उभे करण्यासाठी, अडचणीत, संकटात सापडलेल्यांना मदत करण्यासाठी आहेत. याची जाण आणि भान ठेवून भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी समाजसेवेचे ओझे अखंडपणे वाहून नेत आहेत. त्यांचा आज ३० मे रोजी जन्मदिवस या निमित्ताने मनःपूर्वक शुभेच्छा. आप्पासाहेबांना निरोगी दीर्घायुष्य लाभो त्यांच्या हातून जनसेवेचे कार्य कायम पणे अखंड घडत राहो हीच आदिशक्ती श्री रेणुका मातेच्या चरणी प्रार्थना......!!!

## संक्षिप्त...

### हरिनाम सप्ताहात भ्रष्टाचार करणाऱ्या किशोर शिवणीकरांना अटक करा

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २९ मे : लातूर तालुक्यातील खंडापूर येथील अखंड हरिनाम सप्ताहासाठी कोट्यवधी रुपयाची देणगी गोळा करून हिशेब न देताच पलायन केलेल्या तथाकथित महाराज किशोर जाधव शिवणीकर व त्यांच्या सहकाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा व

त्यांना अटक करावी, या मागणीसाठी भ्रष्टाचार विरोधी वारकरी संपद्राय कृती समितीतर्फे समस्त लातुरकरांच्या वतीने दोन दिवसाचे उपोषण गुरुवारी महात्मा गांधी चौकात सुरू झाले. विविध संस्था, संघटना व अनेक नागरिकांनी उपोषणस्थळी भेट देऊन पाठिंबा व्यक्त केला.

प्रारंभी महात्मा गांधी चौकातील राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून उपोषणाला सुरुवात झाली. उपोषण करणाऱ्यांमध्ये प्रामुख्याने कृती समितीचे निमंत्रक शाम बरूरे, हभप रामकृष्ण शिंदे महाराज, चंद्रकांत आरडले, संदीपान बडगिरे, डॉ. गणेश गोमारे, सुनिल कावळे, तुषार रेड्डी व इतर काही नागरिकांचा समावेश आहे. दिवसभर उपोषणस्थळी अनेक नागरिक तसेच भाविकांनी भेट देऊन या आंदोलनात भाग घेतला. अंधश्रद्धा निर्मूलन समितीतर्फे उपोषणाला जाहीर पाठिंबा देण्यात आला. यावेळी अंनिसचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. दशरथ भिसे, नगरसेवक संजय गायकवाड, सुधीर भोसले, रणजित आचार्य यांनी पाठिंब्याचे पत्र कृती समितीला दिले.

### जळकोट तालुक्यात पेट्रोल पंपावर डिझेलसाठी शेतकऱ्यांच्या रांगा

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २९ मे : जळकोट तालुक्यात गेल्या दोन महन्यािपासून पेट्रोल डिझेल तसेच सीएनजीची टंचाई असून आवा तर शेतकऱ्यांच्या ट्रॅक्टरला डिझेल मिळेनासे झाले आहे. यामुळे शेतकरी संताप व्यक्त करीत आहेत. जळकोट तालुक्यात मोठ्या प्रमाणात डिझेल टंचाई निर्माण झाली आहे.

सध्या जळकोट तालुक्यात मशागतीची कामे सुरू आहेत. यासाठी शेतकरी मोठ्या प्रमाणात ट्रॅक्टरचा वापर करीत असतात परंतु ट्रॅक्टरला डिझेल मिळत नसल्यामुळे पेरणीपूर्व मशागतीची कामे रखडली आहेत.

अगदी काही दिवसांनंतर मृग नक्षत्राचे आगमन होते. एकदा का मृग नक्षत्राचे आगमन झाले की कधीही पेरणी लागू शकते. यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीपूर्व लगबग सुरू केली आहे. सध्या शेतकऱ्याजवळ बैल जोडीचे प्रमाण कमी झाले आहे. त्यामुळे शेतकरी हे ट्रॅक्टरद्वारेच पेरणीपूर्व मशागतीची कामे करीत आहेत मात्र ट्रॅक्टरला डिझेल मिळत नसल्यामुळे शेती कामासाठी ट्रॅक्टर उपलब्ध होण्यास अडचण निर्माण झाली आहे त्यामुळे शेतकऱ्यांची कामे रखडली आहे. मशागतीची कामे करण्यासाठी पेट्रोल पंपावर डिझेल मिळत नसल्यामुळे इतर वाहनांनाही मोठा फटका बसत आहे. डिझेलवर चालणाऱ्या कार तसेच ट्रक यांना मोठी अडचण निर्माण झाली आहे. जळकोट तालुक्यात अनेक पेट्रोल पंपावरील डिझेलचा साठा संपला आ-हे. डिझेलचे टैंकर आले तरी केवळ दोन तासांमध्ये टँकर संपून जात आहे. एवढी प्रचंड गर्दी डिझेल खरेदीसाठी होत आहे.

# औशात कृषी विज्ञान केंद्राच्या निर्मितीची केंद्रीय कृषी मंत्र्याकडे मागणी

## आमदार अभिमन्यू पवार यांचे केंद्रीय कृषिमंत्र्यांना निवेदन

तभा वृत्तसेवा

औसा दि. २९ मे - औसा विधानसभा मतदारसंघात स्वतंत्र कृषी विज्ञान केंद्र (घतघ) स्थापन करण्यात यावे, अशी मागणी आमदार अभिमन्यू पवार यांनी केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांना निवेदनाद्वारे केली आहे.

औसा तालुक्यातील शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, वैज्ञानिक मार्गदर्शन आणि संशोधन सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध व्हाव्यात, यासाठी आमदार पवार सातत्याने पाठपुरावा करत आहेत.यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार तसेच ज्येष्ठ नेते दिलीपराव वळसे पाटील उपस्थित होते.

यापुर्वी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय कृषिमंत्र्यांना पत्र देऊन औसा येथे कृषी विज्ञान केंद्र सुरू करण्याबाबत सविस्तर चर्चा केली. या मागणीसाठी राज्य सरकार सकारात्मक असून औसा परिसरातील शेतकऱ्यांच्या हितासाठी आवश्यक प्रयत्न करण्यात येत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.



औसा तालुका दुष्काळग्रस्त आणि शेतीप्रधान भाग म्हणून ओळखला जातो. तसेच औसा विधानसभा मतदारसंघ पूर्णतः भूकंपग्रस्त क्षेत्रात येत असल्याने येथील बहुतांश नागरिकांचे जिवनमान शेतीवर अवलंबून आहे. बदलत्या हवामानाच्या पार्श्र्वभूमीवर शेतीला आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानाची जोड देणे अत्यंत आवश्यक बनले आहे. येथील अनेक शेतकरी आधुनिक आणि वैज्ञानिक शेतीकडे वळत असले तरी आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन आणि प्रशिक्षण सुविधांचा अभाव जाणवत आहे.

सध्या लातूर जिल्ह्यात केवळ एकच कृषी विज्ञान केंद्र कार्यरत असल्याने औसा परिसरातील शेतकऱ्यांना संशोधन, प्रशिक्षण आणि कृषीविषयक मार्गदर्शनासाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे औसा येथे स्वतंत्र कृषी विज्ञान केंद्र स्थापन झाल्यास शेतकऱ्यांना मृदा व जल व्यवस्थापन, पीक विविधीकरण, फलोत्पादन, आधुनिक शेती तंत्रज्ञान, प्रशिक्षण आणि वैज्ञानिक मार्गदर्शन स्थानिक स्तरावर उपलब्ध होणार आहे. यामुळे शेती उत्पादन वाढीस मदत होऊन शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यास मोठा हातभार लागणार आहे.

## लातूर शहरात ईद-उल-अजहा उत्साहात साजरी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २९ मे : अल्लाह, आज जगात सर्वत्र मानवी अत्याचार वाढले आहेत. यातून मुके प्राणीसुद्धा सुटले नाहीत. एक उत्तम मखलुक म्हणून मानवांचा जन्म झाला तो तुमच्या कृपेनेच, परंतु, राग, द्वेष, अन्याय, अत्याचार, जीवघेणा संघर्ष यातून अमानुषतेचा कडेलोट झाला आहे. अल्लाह, आता तुमच्या कृपेशिवाय आमच्या हाती काहींच उरलेले नाही. तुमच्या कृपेनेच मानरवी जीवन समृद्ध होईल. आम्ही चुकलो,

आम्ही तुझेच बंदे आहोत, कृपाशिर्वाद असू दे, अशी प्रार्थना मौलाना शरफोद्दिनसाहेब सय्यद यांनी केली.

ईद-उल-अजहा (बकरी ईद) दि. २८ मे रोजी लातूर शहर



व जिल्ह्यात उत्साहात साजरी करण्यात आली. त्यानिमित्ताने लातूर शहरातील ईदगाहवर सकाळी ९ वाजता आयोजित सामुहिक नमाज मौलाना शरफोद्दीन सय्यदसाहेब यांच्या मागे झाली. नमाजनंतर त्यांनी उपरोक्त प्रार्थना केली.

तत्पुर्वी अब्दुल गणीसाहेब यांचे बयान (प्रवचन) झाले. त्यांनी ईद-उल-अजहाच्या संदभनि बयान करताना प्रेषित हजरत इब्राहिम (अ.) यांनी मानव आणि मानवतेच्या कल्याणासाठी केलेल्या कार्याचा उल्लेख केला. त्यांचा संघर्षाचा सत्य, न्याय, नैतिकता ही मुलतत्वे आणि मानवता हा मुलाधार होता, असे त्यांनी नमुद करुन मानवी जीवनाचे कल्याण ईश्र्वराची अज्ञा पालनातच आहे, असे सांगीतले.

ईदगाहवर सकाळी ८.३० वाजता बयान सुरु झाले. त्यानंतर नमाज झाली.

तत्पुर्वी शहरातील मुस्लिम बांधव, ज्येष्ठ, तरुण, लहान मुले स्वच्छ कपडे परिधान करुन अत्तर, सुरमा लावून ईदगाहवर आले होते. पाहता पाहता ईदगाहवर जनसमुदाय जमला. बयान नंतर सामुहीक नमाज झाली. त्यानंतर सर्वांनी एकमेकांना गळाभेटी देऊन ईद-उल-अजहाच्या शुभेच्छा दिल्या.

दरम्यान शहरातील विविध मस्जिदमधूनही ईद-उल-अजहाची नमाज आयोजित करण्यात आली होती. जे मुस्लिम बांधव ईदगाहवर पोहचू शकले नाही त्यांनी मस्जिदमध्ये नमाज अदा केला.

यावेळी लातूर शहराचे उपमहापौर स्नेहल उटगे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रा. डॉ. शिवाजीराव जवळगेकर, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष ॲड. किरण जाधव, ॲड. प्रदिपसिंह गंगणे यांच्यासह असंख्य मान्यवरांनी ईदगाहवर उपस्थित राहून मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या.

## 'एआय'चा पाया ७०वर्षांपूर्वीच रचला आता संस्कारांची जोड द्या : प्रा.आलापुरे

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. २९ मे : कृत्रिम बुद्धिमत्तेचा पाया सुमारे ७० वर्षांपूर्वीच रचला गेला असून आज ती प्रत्येक क्षेत्रात पोहोचली आहे. मात्र तिचा वापर करताना संस्कारांची जोड दिली नाही तर ती आव्हानात्मक ठरेल, असे प्रतिपादन प्रा. राहुल आलापुरे यांनी केले.




संस्कार भारती उदगीर शाखेच्या वतीने बुधवार दि. २० रोजी 'कृत्रिम बुद्धिमत्ता व समोरील आव्हाने' या विषयावर प्रा. आलापुरे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाखेचे अध्यक्ष सतीश उस्तूरे होते.

प्रा. आलापुरे म्हणाले की, १९५६ साली 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' ही संकल्पना मांडली गेली. ७० वर्षांच्या संशोधनानंतर आज -ख शिक्षण, आरोग्य, शेती, संरक्षण या क्षेत्रात क्रांती घडवत आहे. माहितीचे विश्र्लेषण, अवघड शस्त्रक्रिया, हवामानाचा अंदाज यासाठी 'ए -आय ' वरदान ठरत आहे.

'ए -आय ' समोरील आव्हानांचा उल्लेख करताना ते म्हणाले, डेटा प्रायव्हसी, बेरोजगारीची भीती, यंत्रांवरचे वाढते अवलंबित्व आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास ही 'ए -आय ' समोरील मोठी आव्हाने आहेत. यंत्र हुशार होत आहे, पण माणसाने संवेदनशील राहणे गरजेचे आहे.

'ए -आय ' हे साधन आहे, साध्य नाही. ७० वर्षांपूर्वी रचलेल्या या तंत्रज्ञानाला आता संस्कारांची लगाम घातली तरच ते समाजहिताचे ठरेल, असे आवाहन त्यांनी तरुणांना केले.

अध्यक्षीय भाषणात सतीश उस्तूरे म्हणाले की, संस्कार भारतीच्या माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञान आणि भारतीय संस्कृती यांची सांगड घालणारे उपक्रम भविष्यात राबवले जातील.

प्रारंभी प्रा. मुकेश कुलकर्णी, श्रीपाद पाटील गुडसूरकर व मृगेंद्र कुलकर्णी यांनी संस्कार भारतीचे ध्येय गीत सादर केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. गौरव जेवळीकर यांनी केले. तर उषा कुलकर्णी उस्तुरे यांनी मानले.

कार्यक्रमास शहरातील प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दु:खाच्या डोंगराखाली दबलेल्या कुटुंबाला मोठा दिलासा

### सहाय्यक संचालक विजयकुमार कलवले यांच्या पाठपुराव्याला यश

तभा वृत्तसेवा

जळकोट दि. २९ मे : निवडणुकीचे शासकीय टपाल पोहोचवण्यासाठी निघालेला एक कर्तव्यदक्ष होमगार्ड जवान रस्त्यात काळाच्या पडद्याआड गेला... घरातील कर्ता पुरुष हरपल्याने पत्नी, वृद्ध आई आणि अवघ्या तीन वर्षांच्या चिमुकल्याच्या आयुष्यावर दुःखाचा डोंगर कोसळला... मात्र या दुःखद प्रसंगात शासन आणि होमगार्ड विभागाने माणुसकीची साथ देत या कुटुंबाला तब्बल ५० लाख रुपयांचा आर्थिक आधार मिळवून दिला आहे.

जळकोट तालुक्यातील गुत्ती येथील होमगार्ड जवान ज्ञानेश्र्वर प्रकाश केंद्रे यांचा २३ जानेवारी रोजी कर्तव्य बजावत असताना भीषण अपघातात मृत्यू झाला होता. या घटनेनंतर केंद्रे कुटुंब अक्षरशः उघड्यावर पडले होते. मात्र राज्याच्या गृहरक्षक दलाचे सहाय्यक संचालक विजयकुमार कलवले, अप्पर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, जिल्हा समादेशक कार्यालयाचे प्रशासकीय अधिकारी संतोष देव,कृषीउत्पन बाजार समितीचे माजी सभापती मन्मथ किडे,पत्रकार माजीद मोमीन आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या अथक पाठपुराव्यामुळे कुटुंबाला ५० लाख रुपयांची मदत मिळाली.

**कर्तव्याच्या वाटेवर काळाचा घाला**

२३ जानेवारी रोजी ज्ञानेश्र्वर केंद्रे हे उदगीर होमगार्ड विभागातून जळकोट पोलीस ठाण्यात हजर झाले होते. निवडणुकीच्या कामाचे टपाल अहमदपूर येथे सुपूर्द करून ते पुढील टपाल घेऊन वाढवणा पोलीस ठाण्याकडे जात होते. मात्र वायगाव पाटी-हाळी मार्गावर आयशर टेम्पोने दिलेल्या भीषण धडकेत त्यांचा जागीच मृत्यू झाला.

कर्तव्य निभावत असताना झालेल्या या अपघाताने संपूर्ण परिसर हळहळला होता.

**पोलीस व गृहरक्षक दल यंत्रणाही धावून आली**

मदत मंजुरीसाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता, पंचनामे, अहवाल आणि प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी वाढवणा पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक सुनील गायकवाड, पोलीस कर्मचारी शिवाजी केंद्रे, होमगार्ड तालुका समादेशक अधिकारी बाबुराव रतनलाल शिंदे ,प्रशासकीय अधिकारी संतोष देव, अंशकालीन लिपिक शिवदास काकडे व इतर कर्मचाऱ्यांनी मोलाची भूमिका बजावली. त्यामुळे मदतीचा प्रस्ताव वेगाने मंजूर होण्यास मदत झाली.

**चिमुकल्याच्या भवितव्याला नवी उभारी**

ज्ञानेश्वर केंद्रे यांच्या पश्चात पत्नी, वृद्ध आई आणि तीन वर्षांचा मुलगा असा परिवार आहे. कर्ता पुरुष गेल्याने कुटुंबासमोर उदरनिर्वाहाचा प्रश्र्न उभा राहिला होता. मात्र आता मिळालेल्या ५० लाखांच्या मदतीमुळे या कुटुंबाला आर्थिक स्थैर्य मिळणार असून चिमुकल्याच्या शिक्षण व भवितव्याची चिंता मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे.तुम्ही एकटे नाही' म्हणत विजयकुमिर कलवले यांनी आधार देण्यासाठी मदतीचा हात पुढे केला.या दुर्दैवी घटनेची माहिती मिळताच सहाय्यक संचालक विजयकुमार कलवले यांनी कुटुंबीयांशी संपर्क साधून धीर दिला. केवळ सांत्वन न करता त्यांनी मदतीसाठी तातडीने शासकीय स्तरावर पाठपुरावा सुरू केला. अपघाताच्या दिवसापासूनच संबंधित अधिकाऱ्यांनी कुटुंबाला मानसिक आणि प्रशासकीय आधार दिला.

**.विजयकुमार कलवले यांनी दिला माणुसकीचा हात**

दुर्दैवी घटनेची माहिती मिळताच सहाय्यक संचालक विजयकुमार कलवले यांनी तत्काळ कुटुंबीयांशी संपर्क साधून त्यांचे सांत्वन केले. तसेच शासनाकडून मिळणारी सर्व मदत वेळेत मिळावी यासाठी पाठपुरावा सुरू केला. अपघाताच्या दिवसापासूनच संबंधित अधिकाऱ्यांनी कुटुंबाला मानसिक आधार देत मदतीचा हात पुढे केला

## निलंग्यात बकरी ईद शांततेत व मोठ्या उत्साहात साजरी

तभा वृत्तसेवा



निलंगा दि. २९ मे : भारतीय समाजजीवनातील सण-उत्सव ही केवळ आनंदाचे क्षणे नसतात तर ते समाजाच्या नैतिक मूल्यांची, सांस्कृतिक परंपरांची आणि मानवी नात्यांची पुनः प्रत्ययकारी स्मृती असतात. प्रत्येक सण माणसाला काहीतरी शिकवून जातो. काही सण आनंद शिकवतात, काही कृतज्ञता, काही एकात्मता, तर काही आत्मपरीक्षण बकरी ईद, ज्याला ईद-उल-अजहा असेही म्हटले जाते, हा असाच एक सण आहे, जो केवळ धार्मिक विधींचा दिवस नसून त्याग, समर्पण, करुणा आणि सामाजिक जबाबदारी यांचे गहिरे तत्त्वज्ञान आपल्या समोर ठेवतो.

शहरासह तालुक्यातील विविध ग्रामीण भागात बकरी ईद शांततेत व मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. परिसरातील विविध दर्गा व मस्जिद परिसरात मुस्लिम बांधवांनी सामूहिक नमाज पठण करून देशात अमन व शांतीसाठी दुआ कसरण्यात.

निलंगा शहरात गुरुवारी दि.२८ रोजी सकाळपासून येथील औसा रोडवरील ईदगाह मैदान व तसेच शहर विविध दर्गा व मस्जिद परिसरात मुस्लिम बांधवांनी सामूहिक नमाज पठण करून, एकमेकांना अलिंगन ( गळाभेट) देत बकरी ईद च्या शुभेच्छा दिल्या.

जामा मशिदीचे शाही इमाम हाफिज महेबुब राशिदी यांनी सकाळी नऊ वाजता ईदगाह मैदानावर ईदची नमाज पढवली. व देशात अमन व शांतीसाठी दुआ करण्यात आली. यावेळी मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा देण्यासाठी काँग्रेस कमिटी लातूर जिल्हाध्यक्ष अभय साळुंके, काँग्रेस डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ. अरविंद भातांब्रे, चक्रधर शेळके, पोलिस निरीक्षक सुधीर सूर्यवंशी आदी मान्यवारांनी उपस्थित राहून मुस्लिम बांधवाना ईदच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थित सर्व मुस्लिम बांधवांनी शुभेच्छा देण्यासाठी आलेल्या प्रमुख मान्यवारांचे व पोलीस प्रशासनाचे यावेळी आभार मानले आहे.

शहरातील हिंदू बांधवांनी धर्मनिरपेक्षतेचा संदेश देत मुस्लिम बांधवांना मिठी मारत ईदच्या शुभेच्छा देत निलंगा शहर सर्व धर्म समभावाचे प्रतीक असल्याचा परिचय दिला.यासह निलंगा शहरासह तालुक्यातील विविध ग्रामीण भागात बकरी ईद शांततेत व मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आले.

## विद्यार्थ्यांनी स्वा सावरकरांची देशभक्ती, धैर्य सामाजिक बांधिलकी, आदर्श जोपासावे : सतिश उस्तुरे



तभा वृत्तसेवा

उदगीर दि. २९ मे : विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकरांची देशभक्ती, धैर्य सामाजिक बांधिलकी व आदर्श जोपासावे असे प्रतिपादन मातृभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष सतीश उस्तुरे यांनी केले

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंती निमित्त ते मातृभूमी विद्यासंकूलात आयोजित कार्यक्रम प्रसंगी बोलत होते.

यावेळी मातृभूमी महाविद्यालयाच्या प्राचार्या उषा कुलकर्णी ,रासेयोचे कार्यक्रमाधिकारी प्रा बिभीषण मद्देवाड ,प्रा रेखा रणक्षेत्रे ,दयानंद टाके ,नेहा वाघमारे , जगदिशा ओंकारे यांची उपस्थिती होती.

सतिश उस्तुरे पुढे बोलतांना म्हणाले स्वातंत्र्यवीर सावरकर क्रांतिकारक तर होतेच ते महान राष्ट्रभक्त, साहित्यिक, समाजसुधारक व विचारवंत होते. देशभक्ती, धैर्य आणि सामाजिक बांधिलकी यांचे प्रेरणादायी उदाहरण म्हणजे सावरकरांचे जीवन होय. विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन राष्ट्रसेवेची भावना जोपासावी. असे म्हणाले. यावेळी विद्यार्थ्यांनी सावरकरांच्या जीवनावर मनोगत व्यक्त केले.

स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अभिवादन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी मातृभूमी प्रतिष्ठान शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा सचलित मातृभूमी महाविद्यालय , मातृभूमी नर्सिंग स्कूल ,कस्तुराबाई नर्सिंग स्कूलचे विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुञचलन प्रा. बिभीषण मद्देवाड यांनी मानले आभार विवेक देवर्षे यांनी मानले

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## उमरग्याच्या तीन युवकांची पोलीस दलात दमदार निवड

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२९ मे -**

उमरगा तालुक्यातील तीन होतकरू युवकांनी पोलीस भरती प्रक्रियेत उल्लेखनीय यश मिळवत तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. पंकज जमादार आणि महेश रणखांब यांची मुंबई पोलीस दलात निवड झाली असून रोहित धनेराव यांची मीरा-भाईंदर येथे महाराष्ट्र पोलीस दलात निवड झाली आहे.



नुकत्याच जाहीर झालेल्या भरती प्रक्रियेत या तिघांनी यश संपादन केल्यानंतर त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील सेवाकार्यासाठी शुभेच्छा दिल्या. या सत्कार कार्यक्रमास डॉ. पद्माकर पिटले, कॅप्टन डॉ. ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले, प्रा. गुंडाबापू मोरे, प्रा. शैलेश महामुनी, राजकुमार सोनवणे, नितीन कोराळे यांच्यासह अनेक प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

या तिन्ही युवकांच्या यशामुळे उमरगा तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### देशमुख दांपत्यांकडून श्री तुळजाभवानी देवींच्या चरणी एक लाखांची देणगी

**तुळजापूर, दि.२९ मे -**

सातारा जिल्ह्यातील खटाव येथील राजकुमार आनंदराव देशमुख यांनी गुरुवार दि.२८ रोजी श्री तुळजाभवानी मंदिर येथे देवीच्या चरणी एक लाख रुपयांची देणगी अर्पण केली. राजकुमार आनंदराव देशमुख हे आपल्या पत्नी गोदावरी देशमुख यांच्यासमवेत देवीच्या दर्शनासाठी तुळजापूर येथे आले होते. श्री तुळजाभवानी देवीचे दर्शन घेतल्यानंतर त्यांनी भक्तिभावाने एक लाख रुपयांची देणगी अर्पण केली. यावेळी श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान यांच्या वतीने राजकुमार देशमुख व गोदावरी देशमुख या दांपत्यांचा श्री तुळजाभवानी देवींची प्रतिमा आणि महावस्त्र भेट देऊन सपत्नीक सन्मान करण्यात आला. या प्रसंगी मंदिर संस्थानचे जनसंपर्क अधिकारी अभिजीत तेरखेडकर, रविराज गायकवाड तसेच मंदिर संस्थानचे कर्मचारी उपस्थित होते.



### स्वातंत्र्यवीर सावरकर जयंतीनिमित्त कळंब येथे अभिवादन

**कळंब, दि.२९ मे -**


स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त कळंब येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सावरकर विचारमंच यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात सावरकरांच्या विचारांना उजाळा देण्यात आला. कळंब नगर परिषद भाजप गटनेते हर्षद अंबुरे व ज्येष्ठ नागरिक खंडेराव देशमुख यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून पूजन केले. यावेळी सावरकरांच्या स्मरणार्थ जयघोष करण्यात आला. या कार्यक्रमास शिवाजीराव गिरे, प्रकाश धस, भैय्या बावीकर, प्रकाशकाक भडंगे, संजय जाधव, परशुराम देशमाने, अनिल कुलकर्णी, प्रफुल्ल पंचमहलकर, प्रवीण कांबळे, राजाभाऊ कोपे, श्रीकांत कळंबकर, अच्युत हारकर, ओमप्रकाश करवा, गोविंदराव पत्की, डॉ. अमित पाटील, जयंत पत्की, श्रीकांत हुलसुरकर, राजाभाऊ जोशी, सर्वेश जोशी आदी मान्यवर उपस्थित होते. भविष्यातही राष्ट्रवादी मूल्यांवर आधारित विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.



### प्रा. विद्या देशमुख यांना राज्यस्तरीय हिरकणी पुरस्कार

**धाराशिव, दि.२९ मे -**

प्रा. विद्या देशमुख यांना सामाजिक, साहित्यिक व शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल व्हॉइस ऑफ मीडिया इंटरनॅशनल फोरम आणि प्रवीण शिक्षण प्रसारक मंडळ, विजयनगर यांच्या वतीने राज्यस्तरीय हिरकणी पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार व्हॉइस ऑफ मीडिया इंटरनॅशनल फोरमचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे, महिला कार्याध्यक्ष वैशाली पाटील, संगम कोटलवार, प्राचार्य उमेश पाटील, सोनाली पाटील, सरपंच रमेश पाटील, ओमप्रकाश शेटे व डॉ. विनायकराव पाटील आदी मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. येडशी येथे इंग्रजी विषयाच्या प्राध्यापिका असलेल्या विद्या देशमुख यांनी अनेक कविता व कथासंग्रहांमधून त्यांनी साहित्य सेवा केली आहे. त्या उत्तम गझलकार म्हणूनही परिचित आहेत. त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालय तसेच परिसरातील नागरिकांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.



### अर्जुन जाधव यांचा सत्कार

**धाराशिव, दि.२९ मे -**

गटशिक्षणाधिकारी अर्जुन जाधव यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित कार्यक्रमात राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. राज्य उपाध्यक्ष सुखदेव भालेकर, जिल्हाध्यक्ष अनंत फुलसुंदर, राजेंद्र हजारे, विजय भालेकर, महादेव सालपे आणि विठ्ठल म्हेत्रे यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन अर्जुन जाधव यांचा गौरव करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी जाधव यांनी शिक्षण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याचा गौरव करत त्यांच्या प्रशासकीय कार्यपद्धतीचे कौतुक केले.

# इंधन दरवाढीविरोधात काँग्रेसचा संताप

**धाराशिव शहरात घोषणाबाजी; पेट्रोल-डिझेल दरवाढ तात्काळ मागे घेण्याची मागणी...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ मे -**

पेट्रोल, डिझेल व घरगुती गॅसच्या सातत्याने वाढणाऱ्या दरांविरोधात काँग्रेसच्या वतीने शुक्रवारी देशपांडे स्टॅण्ड येथे तीव्र आंदोलन करण्यात आले. केंद्र सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत आंदोलनकर्त्यांनी इंधन दरवाढ तात्काळ रद्द करण्याची मागणी केली. आंदोलनानंतर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाला सविस्तर निवेदन देण्यात आले.



इंधन दरवाढ रद्द करा, महागाई करणारे सरकार हाय हाय, सामान्य जनतेची लूट बंद करा, शेतकरी विरोधी सरकारचा निषेध असो अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. यावेळी काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केंद्र सरकारच्या आर्थिक धोरणांवर तीव्र टीका केली. निवेदनात म्हटले आहे की, मागील ११ दिवसांत पेट्रोल व डिझेलच्या किमतीत तब्बल ८ रुपये प्रति लिटर वाढ करण्यात आली असून त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक कंबरडे मोडले आहे. गेल्या १२ वर्षांत पेट्रोलच्या किमतीत सुमारे ३८ टक्के तर डिझेलच्या किमतीत ६२ टक्के वाढ झाल्याने शेतकरी, महिला, छोटे व्यावसायिक व मध्यमवर्गीय कुटुंबांचे आर्थिक गणित कोलमडल्याची भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. डॉ. मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखालील यूपीए सरकारच्या काळात आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर १०० डॉलर्स प्रति बॅरलपर्यंत पोहोचले होते. तरीदेखील पेट्रोल-डिझेलच्या किंमती नियंत्रणात ठेवण्यात आल्या होत्या. मात्र सध्या कच्च्या तेलाचे दर कमी असतानाही देशात पेट्रोलचे दर १०० रुपयांच्या घरात पोहोचल्याची टीका निवेदनात करण्यात आली. केंद्र सरकारने गेल्या १२ वर्षांत पेट्रोलियम उत्पादनांवरील कर व उत्पादन शुल्काच्या माध्यमातून तब्बल ४३ लाख कोटी रुपयांचा महसूल गोळा केला असल्याचा आरोप काँग्रेसने केला. तसेच अलीकडील दरवाढीनंतर तेल कंपन्यांनी काही तासांतच हजारो कोटी रुपयांची कमाई केल्याचा दावा करत ही नफेखोरी म्हणजे सर्वसामान्यांच्या खिशावर टाकलेला आर्थिक दरोडा असल्याची प्रतिक्रिया आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. पेट्रोल, डिझेल व घरगुती गॅसच्या वाढत्या किंमतींचा थेट परिणाम दैनंदिन जीवनावर होत असून वाहतूक खर्च वाढल्याने अन्नधान्य, भाजीपाला तसेच जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती सातत्याने वाढत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. उत्पन्न स्थिर असताना वाढती महागाई सामान्य नागरिकांचे जगणे कठीण करत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

डिझेल तुटवड्यामुळे राज्यातील अनेक पेट्रोल पंपांवर पुरवठा विस्कळीत झाला असून शेतीची कामे मोठ्या प्रमाणात खोळंबली आहेत. ट्रॅक्टर, पंप आणि मशागतीसाठी डिझेल अत्यावश्यक असल्याने शेतकरी वर्ग मोठ्या संकटात सापडल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

या आंदोलनात जिल्हाध्यक्ष उमेश राजेनिंबाळकर, खलील सय्यद, प्रशांत पाटील, शहाजी मुंडे, संग्राम मुंडे, अशोक बनसोडे, वसंत मडके, अभिषेक बागल, धनंजय राऊत यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# तुळजापूरातील अवैध मटका व्यवसाय बंद करा

**कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२९ मे -**





शहरातील वाढता अवैध मटका व्यवसाय तात्काळ बंद करून मटका बुक्की चालक, एजंट तसेच त्यांना संरक्षण देणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी समाजसेवक जयकुमार पांढरे यांनी पालकमंत्री प्रताप सरनाईक, पोलीस अधीक्षक रितू खोकर, आमदार राणा जगजितसिंह पाटील तसेच जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, शहरातील जुन्या बसस्थानकाच्या पाठीमागे तुळजाभवानी मंदिराकडे जाणाऱ्या प्रमुख मार्गावर खुलेआम मोठ्या प्रमाणात अवैध मटका व्यवसाय सुरू आहे. गर्दीच्या ठिकाणी रस्त्यावर टेबल टाकून सुरू असलेल्या या व्यवसायामुळे भाविक व नागरिकांची आर्थिक लूट होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

अवैध मटका व्यवसायामुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली असून युवक कर्जबाजारी होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. पोलीस प्रशासन केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याने शहरात उलटसुलट चर्चा सुरू असल्याचाही उल्लेख करण्यात आला आहे.

शहरातील सर्व मटका चालक, एजंट आणि त्यांना संरक्षण देणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा निवेदनातून प्रशासनाला देण्यात आला आहे.

## उमरग्यात घरफोडी : ट्रॅक्टरचे साहित्य चोरी; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२९ मे -**

उमरगा तालुक्यातील व्हंताळ येथे घराचे कडी-कोंडे तोडून ट्रॅक्टरचे साहित्य चोरी केल्याप्रकरणी दोघांविरुद्ध उमरगा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी सविता संजयराव जाधव (वय ५०, रा. व्हंताळ ता. उमरगा, सध्या रा. बाळेखेड उत्तर सोलापूर) यांच्या फिर्यादीनुसार, त्यांच्या व्हंताळ येथील शेत गट क्रमांक १७९ मधील घराचे व शेडचे कडी-कोंडे आरोपी राजाभाऊ श्रीमंत जाधव आणि पृथ्वीराज राजाभाऊ जाधव यांनी २१ एप्रिल ते २७ एप्रिल २०२६ दरम्यान तोडून नुकसान केले.

तसेच घरासमोरील ट्रॅक्टरचे पंजे व रोटाव्हेटर असा एकूण ४९ हजार रुपयांचा माल चोरी करून नेल्याचा आरोप करण्यात आला आहे. फिर्यादी व त्यांचे दिर शेतात गेले असता आरोपींनी शिवीगाळ करून जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

# दिल्लीतील हालचालीनंतर मंत्रिमंडळ विस्ताराच्या चर्चांना वेग

**आ. तानाजीराव सावंत यांच्या पुनरागमनाची चर्चा; धाराशिवच्या राजकारणात पुन्हा खळबळ...**

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२९ मे -**

दिल्लीतील राजकीय हालचालींनंतर राज्यातील संभाव्य मंत्रिमंडळ विस्ताराच्या चर्चांना पुन्हा वेग आला असून धाराशिव जिल्ह्याचे नाव पुन्हा एकदा सत्तेच्या राजकारणात चर्चेत आले आहे. माजी आरोग्यमंत्री तथा परंडा मतदारसंघाचे आमदार तानाजीराव सावंत यांना पुन्हा मंत्रीपद मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात असून राजकीय वर्तुळात विविध तर्क-वितर्कांना उधाण आले आहे.



राजकीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, नुकत्याच दिल्ली येथे महायुतीतील काही वरिष्ठ नेते आणि केंद्रीय पातळीवरील महत्त्वाच्या व्यक्तींमध्ये बैठक झाल्याची चर्चा आहे. या बैठकीत महाराष्ट्रातील संभाव्य मंत्रिमंडळ विस्तार, खातेवाटप तसेच नाराज आमदारांच्या समेटाबाबत चर्चा झाल्याचे बोलले जात आहे. मात्र यासंदर्भात अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

महायुती सरकार स्थापन झाल्यानंतर सुरुवातीपासूनच तानाजीराव सावंत यांना मंत्रिमंडळात स्थान मिळेल, अशी अपेक्षा समर्थकांकडून व्यक्त करण्यात येत होती. मात्र सत्तेतील समतोल आणि राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर त्यांचे नाव मागे पडल्याचे सांगितले जात होते. त्यानंतर सावंत समर्थकांमध्ये काही प्रमाणात नाराजीचे वातावरण निर्माण झाल्याचीही चर्चा होती.

आता बदलत्या राजकीय घडामोडींमुळे पुन्हा एकदा तानाजीराव सावंत यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. विशेष म्हणजे दिल्लीतील चर्चांनंतर परंडा मतदारसंघात मंत्रीपदाच्या चर्चांना उधाण आले असून कार्यकर्ते आणि समर्थकांमध्ये उत्सुकता वाढल्याचे दिसून येत आहे.

तानाजीराव सावंत यांना प्रत्यक्षात मंत्रीपदाची संधी मिळणार का, तसेच मिळाल्यास कोणते खाते त्यांच्या वाट्याला येणार, याकडे आता मराठवाड्यासह राज्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. आगामी काही दिवसांत या संदर्भातील राजकीय चित्र अधिक स्पष्ट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## दुधनाळमध्ये शिवमहापुराण कथेला भाविकांचा प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२९ मे -**

उमरगा तालुक्यातील दुधनाळ येथे अधिक मास तसेच श्री महादेव मंदिराच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित श्री शिवमहापुराण कथा सोहळा ला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. दि.२७ मे ते २ जूनदरम्यान सुरू असलेल्या या धार्मिक सोहळ्यासाठी धाराशिव, लातूर, सोलापूर तसेच कर्नाटक सीमाभागातून हजारो भाविक उपस्थित राहत आहेत.

पंडित प्रदीप मिश्रा आपल्या प्रभावी शैलीतून भगवान शिवाच्या महिम्याचे वर्णन करत असून शिवभक्ती, संस्कार, सदाचार आणि मानवसेवेचा संदेश देत आहेत. त्यांच्या प्रवचनामुळे भाविक मंत्रमुग्ध होत आहेत. कथास्थळी 'हर हर महादेव', 'जय श्री महाकाल'च्या जयघोषांनी वातावरण दुमदुमून गेले असून संपूर्ण परिसर भक्तीमय झाला आहे. आयोजन समितीकडून वाहनतळ, पिण्याचे पाणी, बसण्याची व्यवस्था, वैद्यकीय मदत व सुरक्षेचे नियोजन करण्यात आले आहे.

अधिक मासात आयोजित या शिवमहापुराण कथेमुळे दुधनाळ परिसरात भक्तीचा महासागर उसळला आहे.

## परंड्यात दोघांकडून धारदार शस्त्र जप्त

**परंडा, दि.२९ मे -**

परंडा येथील कृषी उत्पन्न बाजार समिती गेट परिसरात विनापरवाना धारदार शस्त्र बाळगणाऱ्या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी फैय्यज पठाण व आयाज पठाण (रा. परंडा) हे २८ मे रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती गेट परिसरात संशयास्पदरीत्या फिरताना आढळले. तपासणीदरम्यान त्यांच्या ताब्यात एक धारदार शस्त्र आढळून आले. या प्रकरणी पोउनि. जगदाळे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## उमरग्यात स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती साजरी



**भाजपतर्फे प्रतिमापूजन; राष्ट्रप्रेमाची प्रेरणा घेण्याचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२९ मे -**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पक्ष यांच्या वतीने त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमात ज्येष्ठ नेते डॉ. विलासराव इनामदार यांच्या शुभहस्ते सावरकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शारीरिक प्रमुख रामदास कुलकर्णी यांनी सावरकर यांच्या जीवनकार्यावर सविस्तर प्रकाश टाकला. अंदमान-निकोबार येथील सेल्युलर जेलमधील कठोर तुरुंगवास, देशासाठी केलेला त्याग आणि राष्ट्रभक्तीपूर्ण कार्याचा त्यांनी आढावा घेतला. कार्यक्रमास कपिल कुलकर्णी, संजय कोथळीकर, महेश देवा इनामदार, भालचंद्र कुलकर्णी यांच्यासह भाजपचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कपिल कुलकर्णी यांनी केले, तर आभार प्रदर्शन भालचंद्र कुलकर्णी यांनी मानले. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या विचारांचा जागर करून राष्ट्रप्रेमाची प्रेरणा घेण्याचे आवाहन यावेळी मान्यवरांनी केले.

# 'गहू खाता की ज्वारी?'; जनगणनेतील प्रश्नांनी नागरिकांची उडतेय तारांबळ

**प्रगणकांचे प्रश्न अन् नागरिकांची भन्नाट उत्तरे; डोकेवाडीत रंगले हशे...**

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२९ मे -**

केंद्र सरकारच्या जनगणना मोहिमेचा पहिला टप्पा सध्या सुरू असून प्रगणकांकडून घराघरांत जाऊन नागरिकांची माहिती संकलित केली जात आहे. गावातील किंवा शेजारच्या गावातील शिक्षक प्रगणक म्हणून काम पाहत असून, ते नागरिकांना तब्बल ३४ प्रश्न विचारत आहेत. मात्र या प्रश्नांमुळे अनेक ठिकाणी गमतीशीर प्रसंग घडत असून नागरिकांसह प्रगणकांनाही हसू आवरत नसल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.

डोकेवाडी येथे जिल्हा परिषद शाळेचे सहशिक्षक सोमनाथ तौर, लक्ष्मीकांत चव्हाण हे प्रगणक म्हणून नागरिकांकडून माहिती घेत होते. यावेळी गणेश आहेर, आनंदराव जालन, पद्मिन जालन आदी नागरिकांना विचारण्यात येणारे प्रश्न आणि त्यांची उत्तरे ऐकून परिसरात एकच हशा पिकत होता.

'तुम्ही गहू खाता की ज्वारी?', 'तांदूळ कमी वापरता की जास्त?' असे प्रश्न ऐकून अनेकांच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. एका नागरिकाने तर सकाळी चपाती खातो आणि रात्री भाकरी आता काय लिहायचं ते बघा, असे उत्तर दिल्याने प्रगणकही खळखळून हसले.

यापूर्वी २०११ मध्ये जनगणना झाली होती. तब्बल १५ वर्षांनंतर होत असलेल्या या प्रक्रियेमुळे नव्या पिढीसाठी हा अनुभव वेगळाच ठरत आहे. सध्या घरांची गणना आणि नागरिकांच्या राहणीमानाची माहिती संकलित केली जात आहे. त्यासाठी विचारले जाणारे काही प्रश्न नागरिकांना विचारात टाकणारे ठरत आहेत.

'घरात गाड्या किती?', 'चारचाकी आहे का?', 'घरात फरशी टाईलची आहे की कोबा टाकलाय?', 'स्वयंपाकघर सोडून खोल्या किती?', 'टीव्ही वापरता का?', 'अँटेना आहे की डीश?' अशा प्रश्नांनी नागरिकांची चांगलीच तारांबळ उडत आहे.

इतकेच नव्हे तर 'घरात स्वच्छतागृह आहे का?', 'सांडपाणी खड्ड्यात जाते की थेट गटारात?', 'घरावरील पत्रे जी.आय.ची आहेत का?' अशा प्रश्नांमुळे काही नागरिक गोंधळून जात आहेत. उत्तर खरं द्यायचं की खोटं? असा प्रश्नही काहींना पडत असल्याचे दिसून आले.



'गॅस वापरता की चूल?' या प्रश्नावर अनेकांनी गॅस आहे, पण महागाईमुळे चूलही वापरावी लागते, अशी वास्तववादी प्रतिक्रिया दिली. जनगणनेच्या या प्रक्रियेतून नागरिकांच्या राहणीमानाचे वास्तव समोर येत असतानाच, गावागावांत हास्याचे फवारेही उडताना दिसत आहेत.